# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# शिक्षण आणि समाज

**(Education and Society)**

**(समाजशास्त्र : SOE 007)**

**एम. ए. भाग–१**

**सेमिस्टर–१**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१०
**द्वितीय आवृत्ती :** २०१४
**तृतीय आवृत्ती :** २०१५
**चौथी आवृत्ती :** २०१६
सुधारित पाचवी आवृत्ती : २०१८
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १०००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-381-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### समाजशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष – **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
  सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**शिक्षण आणि समाज**
**एम. ए. भाग–१ :** SOE 007

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **श्री. व्ही. जी. पानस्कर**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर | १, ३ |
| **डॉ. बी. एन. केंद्रे**<br>समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | २ |
| **श्री. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली. | २, ३, ४ |

■ **संपादक** ■

**श्री. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**
(सेवानिवृत्त) विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे आम्ही हार्दिक स्वागत करतो. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्रात तुम्ही समाजशास्त्राचे एकूण चार पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी एक पेपर शिक्षण आणि समाज (SOE 007) असा आहे. या पेपरमध्ये एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट केले असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना शिक्षण आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचे यथार्थ आकलन होईल याची आम्हास खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक, दूर शिक्षण केंद्राचे संचालक, या विषयाचे समन्वयक व केंद्रातील कर्मचारी या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**श्री. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**
(सेवानिवृत्त) विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### समाजशास्त्र अभ्यासमंडळ

अध्यक्ष – **रिक्त**


- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली
- **डॉ. संजय हिंदुराव सनदे**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  विवेकानंद कॉलेज,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर
- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
| --- | --- | --- |
| १. | शिक्षणाचे समाजशास्त्र | १ |
| २. | शिक्षणाविषयीचे सैद्धांतीक दृष्टिकोन | २१ |
| ३. | शिक्षण आणि समाज | ४२ |
| ४. | शिक्षणाचा अलिकडील काळातील विकास आणि शिक्षणासमोरील आव्हाने | ६८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१३-१४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक : १**

# शिक्षणाचे समाजशास्त्र
## (Sociology of Education)

**घटक संरचना :**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

  १.३.१ शिक्षणाच्या समाजशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती

  १.३.२ शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास

  १.३.३ शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.१ प्रस्तावना (Introduction) :

शिक्षणाचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. समाजशास्त्राचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास सुरू झाल्यानंतर काही काळातच शिक्षणाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास सुरू झाला. इ.स. १८८३ मध्ये लीस्टर एफ वॉर्ड या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने डायनॅमिक सोशिऑलॉजी नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात प्रगतीचे अत्यंत जवळचे साधन म्हणजे शिक्षण होय हा विचार मांडला. साधारण इ.स. १९४५ पूर्वीच्या काळात म्हणजेच पहिल्या अवस्थेत या विषावर जे साहित्य निर्माण झाले त्याला शैक्षणिक समाजशास्त्र म्हणण्यात आले. या काळात शिक्षण तज्ज्ञानी शैक्षणिक समाजशास्त्र या शाखेच्या अभ्यासाची सुरवात केली. इ.स. १९४५ नंतर याबाबतचा दृष्टिकोन बदलला. शैक्षणिक समाजशास्त्र या संकल्पनेचे महत्त्व कमी होऊन तिचे स्थान शिक्षणाचे समाजशास्त्र या संकल्पनेने घेतले म्हणून या दोन्ही संकल्पनांचा अर्थ व स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणाची विभागणी तीन घटकात करण्यात आली आहे. पहिल्या घटकात विविध विचारवंतांनी केलेल्या व्याख्यांच्या आधारे शिक्षणाचे समाजशास्त्र या विषयाचे स्वरूप समजून घेता येईल. तसेच

शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक ही समजेल. तसेच या शाखेत ज्या घटकांचा अभ्यास केला जातो. त्यावरून त्या विषयाची व्याप्ती समजून येईल.

दुसऱ्या घटकात विविध देशात आणि भारतात शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास कसा झाला हे जाणून घेणार आहोत.

तिसऱ्या घटकात विविध मुद्यांच्या आधारे आपण शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व समजून घेणार आहोत.

## १.२ उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला शिक्षणाच्या समाजशास्त्राची ओळख करून घेता येईल.

- शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याख्या समजून घेता येतील.
- शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक समजून घेता येईल.
- शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विविध देशात आणि भारतात कसा विकास झाला हे जाणून घेता येईल.
- शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject matter) :

समाजशास्त्र हे आधुनिक काळात उदयास आलेले शास्त्र आहे. या विषयाच्या अनेक शाखा असून मूळ समाजशास्त्राची बरोबरी करू शकतील इतका या शाखांचा विकास झाला आहे. शिक्षण ही समाजातील एक महत्त्वाची उपव्यवस्था असून शिक्षण व समाज यांच्या परस्परसंबंधाबाबत अनेक विचारप्रवाह दिसून येतात. म्हणून शिक्षणाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

### १.३.१ शिक्षणाच्या समाजशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती (Nature and Scope of Sociology of Education) :

**स्वरूप :** समाज जीवनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करणारी शास्त्रे सामाजिक शास्त्रे म्हणून ओळखली जातात. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या शास्त्रांचा अभ्यास प्राचीन काळापासून सुरू आहे. त्या तुलनेत समाजशास्त्र हे आधुनिक काळातील शास्त्र असून त्याचा विकास २० व्या शतकात झाला. या विकासामुळेच या क्षेत्रात जे विशेषीकरण झाले त्यामुळे अनेक शाखा समाजशास्त्राच्या शाखा म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. उदा. ग्रामीण समाजशास्त्र, आदिवासींचे समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र, धर्माचे समाजशास्त्र, कुटुंबाचे समाजशास्त्र इ. पाश्चिमात्य देशात या सर्व शाखांचा खूपच विकास झाला. शिक्षणाचे समाजशास्त्र ही अशीच एक शाखा आहे.

काही विचारवंतांच्या मते शिक्षण हे समाज सुधारणेचे साधन आहे. आणि शिक्षणाचे समाजशास्त्र त्या कामी सहाय्य करते. काहीजण शिक्षणाची सामाजिक उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी ते मार्गदर्शन करते असे

मानतात. तर शिक्षणाचे नियोजन करणाऱ्यांना दिशा देण्याचे काम हे शास्त्र करते असेही एक मत आहे. या बरोबरच शिक्षण क्षेत्रात काम करणारे संशोधक आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी शिक्षणाचे समाजशास्त्र मदत करते. असाही एक मतप्रवाह आहे. या विविध दृष्टिकोनांच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या निवडक व्याख्यांचा अभ्यास करून त्याच्या अभ्यासाचे क्षेत्र आणि व्याप्ती सविस्तर मांडणे आवश्यक आहे.

- **शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याख्या (Definitions of Sociology of education) :**

शिक्षणाचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा असून तिच्यात शिक्षण प्रक्रियेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. शिक्षणाचे समाजशास्त्र व शैक्षणिक समाजशास्त्र या दोन भिन्न भिन्न शाखा आहेत. जॉर्ज पेन यांनी १९२८ मध्ये Principles of Educational Sociology हा ग्रंथ लिहून शैक्षणिक समाजशास्त्राचा पाया घातला म्हणून त्यांना शैक्षणिक समाजशास्त्राचा जनक म्हणतात. १९४५ नंतर शिक्षणाचे समाजशास्त्र ही शाखा समाजशास्त्रज्ञांनी विकसित केली. या दोन्ही शाखांचा अर्थ समजण्यासाठी त्यांच्या व्याख्या क्रमाने अभ्यासू.

- **शैक्षणिक समाजशास्त्राची व्याख्या** (Definition of Educational Sociology) **:**

**१) जॉर्ज पेन :** ''आमच्या मते शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे व्यक्तिला अनुभवसंपन्न करणाऱ्या व तिच्या अनुभवाना सुसंघटीत करणाऱ्या सामाजिक संबंधाचे व हे सामाजिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या संस्था, सामाजिक समूह व सामाजिक प्रक्रियांचे वर्णन व विवेचन करणारे शास्त्र होय.

By Educational Sociology, we mean the science which describes and explains the institutions social groups and social processes, that is social relationships, in which or through which the individual gains and organizes experiences **- George Payne**

या व्याख्येत जॉर्ज पेन यांनी व्यक्ति आणि तिचे शैक्षणिक पर्यावरण यातील आंतरक्रियेवर भर दिला आहे. वेगवेगळे अनुभव घेवून त्यानुसार वर्तणूक करण्याची जी प्रक्रिया व्यक्तिच्या बालपणी कुटुंबात सुरू होते आणि मित्र मंडळी समवेत शाळेत, शाळेबाहेर, इतकेच नव्हे तर प्रौढावस्थेतून जीवनाच्या अखेर पर्यंत सुरूच असते त्या संपूर्ण समाजीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास त्यांनी शिक्षणाच्या समाजशास्त्राचे क्षेत्र मानले आहे.

**२) एफ. जे. ब्राऊन** (F. J. Brown) यांच्या मते शैक्षणिक समाजशास्त्र हा व्यक्ति आणि तिचे सांस्कृतीक पर्यावरण यांच्या आंतरक्रियेचा अभ्यास आहे.

Educational Sociology is the study of interaction of the individual and his cultural environment Educational.

**३) आर.सी. अँजेल** (R. C. Angell) यांच्या मते शैक्षणिक समाजशास्त्र हा शाळेतील आणि शाळा व समुदाय यांच्यातील आंतरक्रियेच्या पद्धती व परस्परसंबंध यांचा अभ्यास आहे.

Educational Sociology is the study of patterns of social interactions and inter relationships within the school and between the school and community.

अँजेल यांच्या व्याख्येत शाळेला केंद्रस्थानी ठेवून शाळेतील व समुदायातील सामाजिक संबंधांच्या अभ्यासापुरताच मर्यादित असा शिक्षणाचा समाजशास्त्राचा अभ्यास विषय मानला आहे. व्यक्तिच्या समाजीकरणाची व्यापक प्रक्रिया जी कुटुंब, मित्रमंडळी, समुदाय आणि जनसंपर्क माध्यमाद्वारे होते तिला या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट केलेले नाही.

**शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याख्या** (Difinition of Sociology of Education)

**१) ए. के. सी ओटावे** यांनी आपल्या छोट्याशा व्याख्येत असे म्हटले आहे की, शिक्षणाचे समाजशास्त्र म्हणजे शिक्षण आणि समाज यांच्यातील संबंधांचा वैज्ञानीक अभ्यास होय.

Sociology of Education is scientific study of relations between education and society - A. K. C. Ottaway.

ओटावे यांचे मते शिक्षणाचे समाजशास्त्र शिक्षणाच्या विविध बाजूंचा म्हणजेच शिक्षणाची उद्दिष्टये, पद्धती, अभ्यासक्रम, संघटन व व्यवस्थापन यांचा अभ्यास तर करतेच शिवाय समाजातील राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक शक्तींचा प्रचलित शिक्षणाशी असणाऱ्या संबंधांचा अभ्यास करते. ओटावे यांनी औपचारिक शिक्षण प्रक्रियेचा सामाजिक संदर्भात अभ्यास यावर भर दिला आहे.

**२) बुकओव्हर डब्ल्यू. बी व गॉटलिब डी.** यांनी शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याख्या अशी केली आहे की, 'शैक्षणिक व्यवस्थेत अंतर्भूत असलेल्या शैक्षणिक प्रक्रिया व शालेय आकृतीबंध यांचे शास्त्रीय स्पष्टीकरण म्हणजे शिक्षणाचे समाजशास्त्र होय.

The sociology of Education is the Scientific analysis of the social processes and school patterns in the educational system. - **Brookover W. B. and Gottlieb D.**

**३) चंद्रकांत खंडागळे :** शिक्षण व्यवस्था व इतर समाजव्यवस्था यांच्यातील परस्परसंबंधांचा व परस्परप्रभावांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेला अभ्यास म्हणजे शिक्षणाचे समाजशास्त्र होय.

शिक्षणाच्या समाजशास्त्राबाबतच्या वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून या विषयाचे स्वरूप स्पष्ट होते. याबाबत शेवटी असे म्हणता येईल की, शिक्षणाचे समाजशास्त्र म्हणजे शिक्षण व्यवस्था व इतर समाजव्यवस्था यांच्यातील परस्परसंबंधाचा समाजशास्त्रीय दृष्ट्या केलेला अभ्यास आहे.

- **शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र या दोन संकल्पनातील फरक :**

शिक्षण हे समाजशास्त्रावर आधारीत असावे हा विचार सर्वात प्रथम विल्यम टी हॅरिस या अमेरिकन आयुक्ताने मांडला. शिकागो विद्यापीठातील प्रा. ए. डब्ल्यू, स्मॉल यांनी प्रत्येक शिक्षकास समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची ओळख आवश्यक आहे असे स्पष्ट केले. जॉन ड्युई या शिक्षणतज्ज्ञाने शाळा ही एक सामाजिक संस्था असून शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे हा विचार मांडला. त्यानंतर अमेरिकेतील अनेक विद्यापीठातून शैक्षणिक समाजशास्त्र या विषयाच्या अध्यापनाची सुरवात झाली. मात्र शैक्षणिक समाजशास्त्र ही शिक्षणशास्त्राची एक शाखा म्हणून विकसीत झाली. समाजशास्त्राचा सखोल अभ्यास

नसणाऱ्या शिक्षण तज्ज्ञांनी या शाखेचा पुरस्कार केला आहे. त्यात समाजशास्त्रीय संकल्पना, सिद्धांत आणि वस्तुनिष्ठ भाषा यांचा तसेच तार्कीक व व्यवहारीक माहितीचा अभाव आहे. शैक्षणिक समाजशास्त्रज्ञ शाळेला केंद्रबिंदू मानून विश्लेषण करतात. शैक्षणिक कृतीबाबत मार्गदर्शन करण्याकडे अधिक लक्ष देतात. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे साधन म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र असे मानले जात होते. शैक्षणिक समाजशास्त्राचा पुरस्कार करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांनी संशोधन तंत्राचा वापर अगदी कमी प्रमाणात केला होता. थोडक्यात शैक्षणिक समाजशास्त्र हे शिक्षणशास्त्राच्या अधिक जवळचे होते.

इ.स. १९४५ नंतर शैक्षणिक समाजशास्त्र या संकल्पनेचे महत्त्व कमी होऊन तिचे स्थान शिक्षणाचे समाजशास्त्र या संकल्पनेने घेतले. आर. सी. एन्जल यांनी त्याचा सर्वात प्रथम पुरस्कार केला. शिक्षणाचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा असून समाजशास्त्रज्ञानी तिचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे समाजशास्त्रीय संकल्पना, सिद्धांत व वस्तुनिष्ठ भाषा यांचा वापर त्यात केला आहे. संपूर्ण समाजाच्या संदर्भात शिक्षणाचा विचार त्यात केला आहे.

वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून शिक्षणाच्या समाजशास्त्राचे स्वरूप समजून येते.

- **शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याप्ती (Scope of Sociology of Education) :**

शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याख्यांच्या अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, समाजशास्त्राची मूलभूत तत्त्वे शिक्षणाच्या संदर्भात लागू होतात. त्यात शिक्षणाचा समाजातील इतर व्यवस्था बरोबर असणाऱ्या संबंधांचा अभ्यास केला जातो. शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याप्तीत शिक्षण व आप्तसंबंध व्यवस्था, सामाजिक स्तरीकरण, राजकीय संघटन, शिक्षण व्यवस्थेतील आंतरक्रिया, ज्ञानाबाबतचे दृष्टिकोन यांच्या अभ्यासाचा समावेश होतो. पुढील मुद्यांच्या विश्लेषणावरून शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट होईल.

**१) शिक्षण व आप्तसंबंध व्यवस्था :**

शिक्षण व आप्तसंबंध व्यवस्था ही समाजीकरणाची महत्त्वाची साधने आहेत. प्रत्येक समाज एका संकीर्ण प्रक्रियेद्वारे मुलामध्ये स्वत:ची अशी ओळख आणि त्यानुसार दर्जा व भूमिका पार पाडण्याची क्षमता निर्माण करण्याची व्यवस्था करीत असतो. आई वडीलांच्या प्रेमळ सहवासातून मुलांचे समाजीकरण होते आणि शाळा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे हस्तांतर करते. मुलांची बौद्धिक क्षमता विकसीत करण्याचे काम शाळा करते. आप्तसंबंध व्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था समाजात मूल्यव्यवस्थेचा विकास करतात.

आईवडील, पालक व मुले यांचे टिकाऊ संघटन म्हणजे कुटुंब होय. कुटुंबातच मुले नम्रपणा, प्रामाणिकपणा सहानूभूती व जबाबदारीची जाणीव इ. गुण संपादन करतात. हेच गुण त्याला समाजाचा जबाबदार सदस्य होण्यासाठी उपयुक्त ठरतात. मानसशास्त्रज्ञानी हे सिद्ध करून दाखविले आहे की, कुटुंबातील चांगले वातावरण मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास घडवून आणू शकते. मुलांना आपल्या

भावना मुक्तपणे व्यक्त करण्याची आपल्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण विकास साधण्याची संधी कुटुंबातच मिळते. कुटुंबातील जेष्ठ व्यक्तिच्याबद्दल मुलांच्या मनात असलेला आदरभाव समाजातील सर्व जेष्ठ व्यक्तिंच्या बाबतीतही व्यक्त होताना दिसतो. शिक्षण व आप्तसंबंध व्यवस्था यांचे परस्पर संबंध हा समाजशास्त्रज्ञांनी अभ्यासाचा विषय मानला आहे.

**२) शाळा–एक समाजव्यवस्था :**

बदलत्या समाजव्यवस्थेबरोबर समाजीकरणाच्या संस्थेचे कार्यही बदलत आहे. साध्या पारंपारीक समाजामध्ये कुटुंबव्यवस्था समाजीकरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाची संस्था होती. आजच्या संकीर्ण समाजात समजीकरणाची भूमिका कुटुंबाबरोबरच शाळा ही पार पाडत आहे.

कुटुंबानंतर मूल शाळेच्या सान्निध्यात येते. समाजाची एक प्रतीकृती म्हणून मुलांवर शाळेचा प्रभाव पडतो. त्याच्या आंतरीक गरजा व प्रेरणा प्रकट करण्याची संधी त्याला शाळेत मिळते. शिक्षकांचे वर्तन, व्यक्तिमत्त्व, चारित्र्य यांचे अनुकरण मुले करतात. कळतनकळत मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार प्राप्त होतो. मुलांच्या मनात प्रेम व आसक्ती निर्माण करण्यात जे शिक्षक यशस्वी होतात त्यांचे संभाषण, कृती, हावभाव यांचाही मुलांच्या मनावर प्रभाव असतो. क्वचित प्रसंगी शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनात परस्पराबद्दल तिरस्काराची अप्रिय भावना निर्माण होते. आणि मुले अशा शिक्षकांपासून दुरावतात. मुलावर आपल्या वर्गमित्रांचाही प्रभाव असतो. मुलांना शाळेतच शिस्त लागते. मात्र अती कठोर शिस्तीचा मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होतो. मुलांवर कसलेही नियंत्रण नसेल तर मुले स्वच्छंदी बनण्याची शक्यता असते. शाळेतील सांस्कृतीक कार्यक्रमातून मुलांच्या दृष्टिकोनाला चांगला आकार मिळतो. शाळा व कुटुंब यांचा समाजशास्त्रीय अभ्यास शिक्षणाच्या समाजशास्त्रात अभिप्रेत आहे.

**३) शिक्षण व सामाजिक स्तरीकरण व्यवस्था :**

कोणतीही समाजव्यवस्था टिकून रहाण्यासाठी तिच्यातील सभासदामध्ये कार्याचे वाटप करणे, योग्य व्यक्तीला योग्य पद देऊन कार्य करवून घेणे, या गोष्टी यामध्ये महत्त्वाच्या असतात. सामाजिक स्तरीकरणाच्या प्रक्रियेत गतिशिलतेला महत्त्वाचे स्थान आहे.

सामाजिक स्तरिकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. कारण कोणत्याही प्रकारचे कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्य ही शाळेतच शिकवली जातात. योग्य व्यक्तीची योग्य पदावर निवड करण्याची जबाबदारी शिक्षण व्यवस्थेचीच आहे. आधूनिक गुंतागुंतीच्या समाजात आणखी ही जबाबदारी शाळेवर वाढल्याचे दिसून येते. या सर्व प्रक्रियेचे अध्ययन शिक्षणाच्या समाजशास्त्रात केले जाते.

खुले किंवा मुक्त स्तरीकरण आणि बंदिस्त स्तरीकरण यांचा शिक्षणाशी जवळचा संबंध आहे. जात, धर्म आणि वर्गावर आधारीत समूहांचा सामाजिक गतिशिलतेवर प्रभाव दिसून येतो. जातीव्यवस्था व्यक्तिच्या स्थानावर आणि दर्जावरही मर्यादा आणते. कनिष्ठ जातींचे धंदे / व्यवसाय पूर्वापार चालत आलेले असतात.

आपल्या पूर्वजांनी केलेल्या व्यवसायाकडे मुलांचा कल झुकतो. मात्र जातीयतेच्या कटू अनुभवातून मुलांमध्ये अनपेक्षीत पूर्वग्रह आणि कमतरतेची भावना निर्माण होते. जातीव्यवस्थेमुळे मुलांच्या बौद्धिक विकासात अडथळे येतात. कांही शाळामधून मुलांवर विशिष्ट धार्मिक तत्त्वे बिंबविण्याचा प्रयत्न होतो. पण त्यामुळे मुलांचा दृष्टिकोन संकुचीत बनतो. दुसऱ्या धर्माबद्दल त्यांच्या मनात विरोधी भावना निर्माण होते.

सामाजिक वर्गाचाही मुलांवर प्रभाव दिसून येतो. धर्म आणि जातीवर आधारीत भेद आता कमी होत चालले आहेत. मात्र वर्गजाणीव वाढत चालली आहे. कनिष्ठ वर्गातील मुलांमध्ये गरीबीमुळे न्यूनतेची भावना निर्माण होते. त्या तुलनेत मध्यम वर्गातील मुलांनी चांगले यश संपादन केल्याचे दिसते. कांही राजकीय विचारसरणीमुळे पुन्हा भेदाभेदाची जाणीव जागृत होते. या सर्व बाबींचा विकासावर परिणाम होतो. या सर्व मुद्यांचा अभ्यास शिक्षणाचे समाजशास्त्र करते.

**४) शिक्षण व राजकीय व्यवस्था :**

आधुनिक काळात शासनाचे नियंत्रण असलेल्या खाजगी संस्था, कांही धार्मिक संस्था तसेच केंद्रशासन राज्यशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था शिक्षण प्रसाराचे काम करीत आहेत. जे. एस. मिल सारख्या विचारवंतांच्या मते सरकारने कांही आदर्श शिक्षण संस्था चालवाव्यात. अशा शिक्षण संस्था सुरू करण्याची प्रेरणा त्यातून समाजातील शिक्षण प्रेमींना मिळेल. एकपक्षीय शासन, साम्यवादी शासन शिक्षणातून आपल्या विचारसरणीचा प्रसार करीत असते. तरी सुद्धा लोकांच्या सामाजिक व राजकीय स्वातंत्र्यावर अतिक्रमण होणार नाही. अशा पद्धतीनेच शासनाचे शिक्षणावर नियंत्रण असते. कल्याणकारी राज्य शिक्षणात कमीत कमी हस्तक्षेप करते. लोकशाही शासनाच्या विकासाबरोबर शिक्षण क्षेत्राचा व्यापक विस्तार होत आहे. सर्वच शिक्षण तज्ज्ञांनी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी शिक्षणाची नितांत गरज आहे. आणि शिक्षण हे शासनाचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे असे सांगितले आहे.

ॲरिस्टॉटलच्या मते चांगले नागरीक निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. लोकशाही समाजाच्या विकासासाठी सर्व नागरीकांच्या विकासाला चालना मिळाली पाहिजे आणि त्यासाठी शिक्षण ही आवश्यक अशी पूर्व अट आहे. या सर्व बाबींचा अभ्यास शिक्षणाच्या समाजशास्त्रात केला जातो.

**५) शिक्षण व ज्ञानाबाबतचा दृष्टिकोन :**

समाजशास्त्रज्ञांनी ज्ञानाचे उगमस्त्रोत, टिकाऊपणा व मर्यादा या बाबतचा सामाजिक दृष्टिकोन समजून घेण्यात उत्सुकता दाखविली आहे. बदलत्या सामाजिक दृष्टिकोनानुसार शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. प्राचीन काळात ज्ञान आणि ज्ञानप्राप्तीची साधने मर्यादित होती. त्या काळात ज्ञानाबद्दल श्रद्धा आणि आदरभाव होता. शिक्षकाबद्दल भीतीयुक्त आदर होता. बहुतांशी ज्ञानसंपन्न व्यक्ती उच्च वर्गातील होत्या. ज्ञानाबाबतच्या दृष्टिकोनावरच विद्यार्थी व शिक्षक यांचे संबंध आधारलेले होते.

आधुनिक काळात ज्ञानाबाबतचा दृष्टिकोन खूपच बदलत आहे. किंबहुना पूर्वीच्या ज्ञानाच्या विरोधी

अशी तत्त्वे विकसित झाली आहेत. त्यातून कोणतेही ज्ञान अंतीम नसते याची सत्यता पटू लागली आहे. ज्ञान हे अमर्यादित असून ते अनेक मार्गानी मिळविता येते. धार्मिक व आध्यात्मिक अनुभवाना वैज्ञानिक विचारसरणीने आव्हान दिले आहे. ज्ञानासंबंधीच्या दृष्टिकोनात झालेल्या बदलाचा शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध, शिक्षकाशिक्षकातील संबंध, शिक्षकांची सामाजिक भूमिका, शिक्षण व संस्थाचालक यांचे संबंध यावर कसा प्रभाव पडतो याकडे समाजशास्त्रज्ञानी लक्ष केंद्रीत केले आहे.

**६) शिक्षण व्यवस्थेतील आंतरक्रिया :**

शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याप्तीचे एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे शिक्षणव्यवस्थेतील आंतरक्रिया हे होय. शिक्षणव्यवस्थेत शिक्षक, विद्यार्थी आणि समुदाय हे महत्त्वाचे घटक आहेत. शैक्षणिक समाजशास्त्रज्ञ या घटकामध्ये सातत्याने होणाऱ्या बदलाची कारणे व दिशा यांचे विश्लेषण करतात. या घटकातील आंतरक्रियांचे स्वरूप स्पष्ट केले तर शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या व्याप्तीचे अंतरंग यथार्थपणे समजून येईल.

**अ) शिक्षक व संस्थाचालक (प्रशासक) संबंध :** शैक्षणिक संस्थातील सामाजिक संघटनामध्ये शिक्षक प्रशासक व संस्थाचालक यांचे संबंध महत्त्वाचे असतात. सहाजिकच शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व आणि अध्यापन पद्धती यांवर संस्था चालकाशी असलेल्या संबंधाचा प्रभाव दिसून येतो. संस्थाचालक त्यांच्या अधिकारात चांगली कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना बक्षीस देतात आणि चुकीच्या कामाबद्दल शासनही करू शकतात. सरकारी शाळात अधिकारीच प्रशासक असतात तर सरकारी अनुदानावर चालणाऱ्या खाजगी संस्थात अध्यक्ष, सचिव, देणगीदार, प्रतिनिधी व्यवस्थापन करतात. काही संस्थात सचिवांच्या हातात सर्व अधिकार असतात. मात्र त्यांनी इतरांच्या मतांची कदर न करता निर्णय घेतले तर शिक्षकांच्या नीतीधैर्यावर विपरीत परिणाम होतो आणि लोकशाही पद्धतीने त्यांचे कामकाज असेल तर निकोप शैक्षणिक वातावरण निर्माण होते.

**ब) शिक्षकाशिक्षकातील संबंध :** सर्व शिक्षणसंस्थात आता अनेक शिक्षक काम करतात. त्यांच्यातील संबंध सहकार्याने मित्रत्त्वाचे असतील किंवा परस्पर विरोधी ही असून शकतील. सहकार्याच्या संबंधातून संघभावना, सदिच्छा निर्माण होते तर शत्रूत्वाचे संबंध असतील तर शैक्षणिक वातावरण दूषित बनते. शिक्षकातही धर्म, जात, भाषा, अर्हता, सेवाजेष्ठता यांच्या आधारे गटबाजी निर्माण होते. याचा परिणाम विद्यार्थीवर्गावर होण्याची शक्यता असते.

**क) विद्यार्थी–विद्यार्थी आंतरक्रिया :** विद्यार्थ्यांविद्यार्थ्यांतील आंतरक्रिया वय, वर्ग, लिंग अभ्यासाबाबतच्या सवयी, विविध गुणदर्शनातील नैपुण्य इ. घटकावर आधारीत असते. वर्गातील वातावरण चांगले असेल तर सर्व विद्यार्थ्यांत जवळीकता निर्माण होते. क्वचित प्रसंगी विद्यार्थ्यात वैरभावना निर्माण झाल्याचे दिसते. शैक्षणिक समाजशास्त्रज्ञ या सर्व बाबींचे विश्लेषण करतात.

**ड) शिक्षक व विद्यार्थी परस्परसंबंध :** शिक्षणव्यवस्थेत शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध सर्वात महत्त्वाचे आहेत. पूर्वीच्या काळात हे संबंध कौटुंबिक स्वरूपाचे होते. सध्याच्या काळात हे संबंध करारात्मक

बनले आहेत. पूर्वी प्रवेशाबाबतचे नियम, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, प्रत्यक्षात शिक्षणाबाबतच्या सर्व गोष्टी शिक्षकच ठरवीत होते. पण आता शासन, प्राचार्य, विषय तज्ज्ञ या गोष्टी ठरवितात. त्यामुळे वेळापत्रकानुसार आपल्या विषयाचे अध्यापन करणे एवढ्या मर्यादेत शिक्षक काम करतात. विशिष्ट वेतनश्रेणी पगार आणि कांही अटींवर शिक्षकांची नेमणूक होते. अध्यापन हा आता एक व्यवसाय बनला आहे. शिक्षक व विद्यार्थी यांच्या संबंधावर अनेक घटकांचा परिणाम होतो.

आपल्यापेक्षा वयाने जेष्ठ असलेल्या शिक्षकाबद्दल प्राथमिक व माध्यमिक शळेतील विद्यार्थ्यांत आदराची भावना दिसते. मात्र उच्च शिक्षणात विद्यार्थी व शिक्षक यांच्या वयात मोठे अंतर नसते. कांही समाजात परंपरेनेच शिक्षकांना चांगला दर्जा दिला जात होता. पण आधुनिक समाजात शिक्षकांचे स्थान व दर्जा पूर्वीसारखा राहिलेला नाही. ज्ञान मिळविण्याची अनेक माध्यमे समाजात उपलब्ध असल्यामुळे आता शिक्षकाविषयी आदर व निष्ठा पूर्वीसारखी दिसत नाही. यासाठी शिक्षकांनी सुद्धा आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे ही गरज बनली आहे.

पूर्वी समाजातील सर्व घटकात शिक्षकाबद्दल आदरभाव होता. मात्र आजच्या करारात्मक पद्धतीत शिक्षक देखील व्यवसायिक बनले आहेत. शिक्षकाची समाजातील भूमिका बदलत चालली आहे. अभ्यासक्रमाची समानता, परीक्षा पद्धती, मूल्यमापन पद्धती, दर्जेदार शिक्षण या सध्याच्या काळातील नवनवीन बाबीमुळे शिक्षकांची वैयक्तिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांबाबतची तळमळ या गोष्टी मागे पडत आहेत. क्रमिक पुस्तकांचा अभ्यास आणि परीक्षेची तयारी त्यातून यशसंपादन असे आजचे शिक्षण आहे. शिक्षण आणि विद्यार्थी यांच्याबदलत्या संबंधाचा सातत्याने आढावा घेण्याचे काम शिक्षणाचे समाजशास्त्रज्ञ करतात.

**७) शिक्षण–सामाजिक नियंत्रण व सामाजिक परिवर्तन :**

शिक्षणाच्या समाजशास्त्रात शिक्षण आणि सामाजिक नियंत्रण व सामाजिक परिवर्तन यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. शिक्षण प्रक्रियेद्वारे व्यक्तीच्या मनावर सामाजिक नियंत्रणे व मूल्ये बिंबवली जातात. त्यामुळे ही नियमने व मूल्ये व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनतात. म्हणजेच त्यांचे आंतरीकीकरण होते. त्यामुळे व्यक्ति त्या नियमनाना व मूल्यांना अनुसरून वर्तन करू लागते. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे कार्य आपोआपच साधले जाते. म्हणून शिक्षण व सामाजिक नियंत्रण यांच्यातील संबंध शिक्षणाच्या समाजशास्त्रात अभ्यासले जातात.

सामाजिक नियंत्रणाप्रमाणेच सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेशी ही शिक्षणाचा घनिष्ठ संबंध आहे. समाजात अपेक्षीत परिवर्तन घडवून आणणे हे शिक्षणाचे एक प्रधान कार्य आहे. असे ब्राऊनसारखे समाजशास्त्रज्ञ मानतात. अगदी प्राचीन काळापासून शिक्षणाचा सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी उपयोग केल्याचे दिसून येते. उदा. ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोने शिक्षणास आदर्श राज्यनिर्मितीचे साधन मानले होते. भारतात कोठारी आयोगाने देखील शिक्षण हे क्रांतीशिवाय परिवर्तन घडवून आणण्याचे साधन आहे असे आग्रहाने नमूद केलेले आहे. थोडक्यात समाजरचनेत अपेक्षीत बदल घडवून आणण्याच्या शिक्षणाची मदत घेतली जाते.

म्हणून शिक्षणाच्या समाजशास्त्रात शिक्षण व सामाजिक परिवर्तन यांच्या अभ्यासावर भर दिला जातो.

- **स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न** (Check your progress) :

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिक्षणाच्या समाजशास्त्राचा जनक म्हणून कोणास ओळखले जाते.

२) ए. के. सी. ओटावे यांनी शिक्षणाच्या समाजशास्त्राची केलेली व्याख्या सांगा.

३) एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे हस्तांतर करण्याचे कार्य कोणाकडून केले जाते.

४) ॲरिस्टॉटलच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट कोणते असले पाहिजे.

५) शिक्षण व्यवस्थेत कोणातील संबंध सर्वात महत्त्वाचे असतात.

**१.३.२ शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास** (Development of Sociology of Education)

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा उदय आणि विकास कसा झाला हे समजून घेताना १९ व्या शतकात शिक्षणाच्या क्षेत्रातली स्थिती कशी होती याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

- **१९ वे शतक – मानसशास्त्रावर अधिक भर :**

१९ व्या शतकात शिक्षणाच्या विकासात मानसशास्त्रावर अधिक भर दिला होता. त्यामुळे शिक्षणाचे स्वरूप व्यक्तिवादी बनले होते. विषय ज्ञानावर प्रभुत्व हे शिक्षणाचे मुख्य कार्य समजले होते. मात्र अभ्यासविषय औपचारिक आणि व्यक्ति जीवनाशी कमी संबंध असलेले होते. त्यामुळे अभ्यास विषय अध्यापन पद्धती आणि मूल्यमापनाच्या तंत्राची रचना व्यक्तिगत मानसशास्त्रीय संकल्पनावर आधारलेली होती.

- **शिक्षणाच्या समाजशास्त्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

काही पाश्चिमात्त्य शिक्षणतज्ज्ञ, तत्वज्ञ आणि समाजशास्त्रज्ञानी शिक्षणाच्या रचनेबाबत मानसशास्त्रावर भर देण्याऐवजी शांततामय व कार्यक्षम पद्धतीने सामाजिक ध्येये साध्य करण्यासाठी शिक्षण कसे असावे याबाबत लिखाण केले. ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, एमिल डुरखाईम यांनी त्याबाबत विचार मांडले. १९६१ साली स्पेन्सरने लिहिलेल्या "**कोणते ज्ञान अधिक मौल्यवान ?**" या निबंधातून शिक्षणाची सामाजिक कार्ये हा विषय चर्चेत आला. मान्टेस्क्यू, डुरखाईम व वेबर यासारख्या अभिजात लेखकांनी कायदा व शिक्षण यावर लिखाण केले. वेबरनी पारंपारिक समाजातील शिक्षण व स्तरीकरण व्यवस्थेचे स्पष्टीकरण केले. डुरखाईमनी शिक्षण व समाजशास्त्र यांच्यातील संबंधांचे महत्त्व यावर भर दिला. या विचारवंतांच्या लिखानामुळे शिक्षण व समाज आणि शिक्षणाची सामाजिक भूमिका याकडे समाजशास्त्रज्ञ व शिक्षक यांचे लक्ष वेधले.

अमेरिकेत वॉर्ड यांनी १८८३ साली Dynamic Sociology हे पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी शिक्षण

हे प्रगतीचे अत्यंत जवळचे साधन असून शिक्षणाची सामाजिक भूमिका यावर भर दिला. स्मॉल यानी समाजशास्त्राने अशी अपेक्षा केली आहे की शिक्षकानी स्वत:ला त्या मुलांचे नेते समजू नये तर समाजाचे शिल्पकार म्हणून काम करावे असे विचार मांडले. एमिल डुरखाईम यांनी सर्वप्रथम समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून शिक्षणाचा विचार करणे गरजेचे आहे हे निदर्शनास आणले. त्यांच्या मते शिक्षण ही स्थितीशील बाब नसून गतिशील व सातत्याने बदलत जाणारी प्रक्रिया आहे. त्यानी शिक्षणाच्या समाजशास्त्रज्ञानी पुढील क्षेत्रात संशोधन कार्य करावे असे सुचविले.

१) सद्यस्थितीतील शिक्षणातील सामाजिक वास्तव आणि त्याची समाजशास्त्रीय कार्ये यांची ओळख.

२) शिक्षण व सामाजिक आणि सांस्कृतीक बदलातील परस्परसंबंधांची ओळख.

३) विविध शिक्षण पद्धतीतील तुलनात्मक संशोधन.

४) शाळा आणि वर्ग यांचा समाजव्यवस्था म्हणून अभ्यास.

इ.स. १८९३ मध्ये डब्ल्यू. टी. हॅरिस या अमेरिकन शिक्षण आयुक्तानी असे म्हटले आहे की, कोणतेही शिक्षणाचे तत्त्वज्ञान त्याला समाजशास्त्राची बैठक असल्याशिवाय परिपूर्ण होऊ शकणार नाही. इ.स. १८९९ मध्ये जॉन ड्युई John Dewey यांनी अध्ययन व अध्यापनाच्या सामाजिक बाजूकडे लक्ष वेधले आणि शाळा ही समुदायाशी जोडलेली प्रभावी सामाजिक संस्था आहे यावर जोर दिला. त्यांनी पालकांना उद्देशून जी भाषणे केली ती The School and Society या ग्रंथात समाविष्ट आहेत. त्यांच्या मते शिक्षणप्रक्रियेच्या मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अशा दोन बाजू आहेत. समूहाच्या सामाजिक जाणीवेत सहभागी झाल्यानेच व्यक्तिचे सर्व शिक्षण होत असते.

अनेक समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ यांचे लिखाण व्यक्ति आणि शाळा याबाबतच्या नवीन संकल्पनांचा विकास होण्यास उपयुक्त ठरते. व्यक्तिबाबतच्या मानसशास्त्रीय संकल्पनेपेक्षा समाजशास्त्रीय संकल्पनेला महत्त्व आले. व्यक्ति आपल्या कुटुंबात शाळा, मित्रमंडळी समवेत कामाच्या ठिकाणी ज्या अंतरक्रिया करते त्यातून ती अनेक गोष्टी शिकते म्हणून शिक्षण प्रक्रिया ही केवळ व्यक्तिपुरती मर्यादित अशी वेगळी प्रक्रिया नसून ती सामाजिक प्रक्रिया आहे. आणि त्यात अनेक व्यक्तिंचे परस्परसंबंध गुंतलेले असतात. आता शाळा म्हणजे केवळ व्यक्तिच्या विकासाला चालना देणारी संस्था नसून समाजाच्या गरजांची पूर्तता करणारी संस्था आहे. हा दृष्टिकोन पुढे आला आहे. त्यामुळे शिक्षणाचे समाजशास्त्र या स्वतंत्र ज्ञानशाखेचा पाया भक्कम होण्यास मदत झाली.

● **शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास – २० वे शतक :**

२० व्या शतकाच्या प्रारंभकाळात शिक्षणाच्या सामाजिक कार्याना आणि शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या विकासाला मान्यता मिळाली. अमेरिका व ग्रेट ब्रिटनमध्ये या शाखेचा उल्लेखनीय विकास झाला.

**अमेरिका :** २० व्या शतकाच्या सुरवातीला तेथे कांही शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या होत्या. उदा. मोठ्या प्रमाणात आलेले परकीय नागरीक, ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतरीत झालेल्या पहिल्या

पिढीचे शिक्षण, वेगवेगळे वंशिक व धार्मिक समूह, वाढत्या औद्योगिकरणासाठी सुसंगत व्यवसायाभिमुख शिक्षणपद्धती, शैक्षणिक संधीची समानता इ. बाबत अनेक प्रश्न उभे राहिले होते. शिक्षणक्षेत्रातील या समस्याकडे शिक्षकांचे व समाजशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले. सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून शाळा व शाळातील वर्गाच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत हा विचार पुढे आला.

२० व्या शतकाच्या सुरवातीच्या तीन दशकात शैक्षणिक समाजशास्त्राबाबतचे विविध दृष्टिकोन विकसीत झाले. वॉर्ड, गुड, एलवूड यांनी शैक्षणिक समाजशास्त्र हे सामाजिक प्रगतीचे जवळचे साधन व समाजसुधारणेसाठी चालना देणारी कार्यवाहिनी आहे हे स्पष्ट केले. स्मिथ आणि झोरबॅक यांच्या मते शैक्षणिक समाजशास्त्र हे उपयोजित शास्त्र असून शैक्षणिक समस्या सोडविण्याचे एकमेव तंत्र आहे. जॉर्ज पेन यांनी शिक्षक, संशोधक आणि शिक्षणाबाबत आस्था बाळगणाऱ्या सर्वासाठी शैक्षणिक समाजशास्त्राचे शिक्षण आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

इ.स. १९१७ साली Introduction to Educational Sociology हे पहिले क्रमीक पुस्तक डब्ल्यू. ए. स्मीथ यांनी प्रकाशित केले. जॉर्ज पेन यांच्या अध्यक्षतेखाली न्यूयॉर्क विद्यापीठात शैक्षणिक समाजशास्त्र या विभागाची सुरुवात झाली. पेन यांनी इ.स. १९२३ साली National Society for the Study of Educational Sociology स्थापन केली. १९२८ साली Journal of Educational Sociology प्रकाशित केले. म्हणूनच जॉर्ज पेन यांना शिक्षणाच्या समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नेतृत्त्वाखाली शैक्षणिक समाजशास्त्र एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून अध्यापन व संशोधनाच्या क्षेत्रात विकसीत झाली. तरी सुद्धा त्या काळात शैक्षणिक समाजशास्त्र केवळ शिक्षणशास्त्राच्या उच्च शिक्षणापुरतेच मर्यादित होते. इ.स. १९३० नंतर कांही नवीन दृष्टिकोनांचा विकास झाला. कुक यांनी शिक्षणाबाबतचा समुदाय दृष्टिकोन मांडला. प्रचलीत समाजरचना आणि शिक्षणाची कार्ये यांचा अभ्यास शिक्षणाच्या समाजशास्त्राने करावा असे त्यांनी सुचविले. इ.स. १९३२ मध्ये वॉलर यांनी विद्यार्थ्यांच्या आणि समुदायाच्या संदर्भातील शिक्षकाची भूमिका विशद केली. उच्च शिक्षणातील शिक्षकांची भूमिका याबाबत विल्सन व कॅपलोव्ह यांनी विश्लेषण केले. त्याकाळात शिक्षणाचे समाजशास्त्र म्हणजे समाजाची औपचारिक शिक्षणव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेतील विविध सामाजिक समूहातील संबंधांची भूमिका यांचा अभ्यास हा दृष्टिकोन स्विकारण्यात आला.

समाजशास्त्रज्ञांनी शिक्षणक्षेत्राचा अभ्यास सुरू केला. शैक्षणिक समाजशास्त्र या विषयाचा अभ्यास समाजशास्त्र विभागात होऊ लागला आणि त्याच्या पारिभाषिक नांवातही बदल झाला. पूर्वी शिक्षण व त्यातील व्यवहारीक समस्या आणि त्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र असे मानले होते. पण नंतरच्या काळात समाजशास्त्र आणि शिक्षणाचे समाजशास्त्रीय पृथ:करण हा अभ्यासाचा केंद्रबिंदू बनला आणि या अभ्यासाचे शिक्षणाचे समाजशास्त्र असे नामाभिधान झाले. व्यापक समाजाच्या संदर्भात शैक्षणिक संस्थांचे समाजशास्त्रीय पृथ:करण हा समाज शास्त्राचा मुख्य उद्देश समाजशास्त्रज्ञानी मानला.

● **शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास : ग्रेटब्रिटन :**

ग्रेटब्रिटनमध्ये १९३९ पर्यंत शिक्षणतज्ज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांनी शिक्षणाच्या समाजशास्त्राबाबत आस्था दाखवली नव्हती. शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागात हा विषय शिकविला जात होता. तथापी, १९४४ नंतर ग्रेटब्रिटनने समानतावादाचे आपले राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याकडे लक्ष दिले आणि त्याचाच एक भाग म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करून शैक्षणिक संधीच्या समानतेची व्याप्ती वाढविली. त्यामुळे कनिष्ठ सामाजिक वर्गातील मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली. मात्र याबाबतच्या पहाणीवरून असे दिसून आले की, समाजातील सर्व वर्गासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या तरी उच्च आणि मध्यम वर्गातील मुलांच्या तुलनेत कनिष्ठ वर्गातील मुले शिक्षण घेण्याच्या बाबतीत फारच कमी होती आणि त्यांचे शैक्षणिक यशही मर्यादितच होते. या परिस्थितीत समाजशास्त्रज्ञ शिक्षणतज्ज्ञ व सरकारचेही या समस्येकडे लक्ष वेधले आणि या क्षेत्रात संशोधनाला गती मिळाली.

शिक्षण व सामाजिक वर्ग, वांशिक पार्श्वभूमी व सामाजिक गतिशिलता, लोकसंख्यात्मक बाबी यांचा अभ्यास सुरू झाला. शिक्षण कोण व कसे घेऊ शकेल आणि समानतावाद कसा साध्य होईल यावर अधिक प्रकाश टाकण्यात आला. पण शिक्षणव्यवस्था आणि आर्थिक संस्था व इतर उपव्यवस्था यांच्या संबंधाचा अभ्यास झाला नाही. प्रशिक्षित संशोधनाचा तुटवडा आणि आर्थिक पाठबळाचा अभाव हे त्यामागचे कारण होते. मात्र नंतरच्या काळात हे अडथळे दूर झाले आणि अशा दुर्लक्षित बाजूंचाही अभ्यास सुरू झाला.

● **भारतातील शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास :**

हा विकास दोन टप्प्यात अभ्यासता येतो.

अ) स्वातंत्र्यपूर्व काळ आणि ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ

**अ) स्वातंत्र्यपूर्व काळ :**

भारतात २० व्या शतकात प्रारंभीच्या दशकात समाजशास्त्राच्या अध्यापनाची सुरवात झाली. त्या काळात शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास हा मुद्दा पुढे आला नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत समाजशास्त्राचा विकासच मर्यादित होता. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी मुंबई आणि लखनौ या दोनच विद्यापीठात हा विषय सुरू होता. मुंबई विद्यापीठात १९२४ साली सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व नगरनियोजक प्रा. पेट्रिक गिडीस यांच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभागाची स्थापना झाली. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी १९२४ ते १९५९ या प्रदीर्घ काळात विभागप्रमुख या नात्याने समाजशास्त्राचे अध्यापन व संशोधन या क्षेत्रात मोलाची भर घातली. १९२१ साली कलकत्ता विद्यापीठात समाजशास्त्र विभाग सुरू झाला. डॉ. राधाकमल मुखर्जी व डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी तेथे उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर मुंबईच्या एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठात समाजशास्त्राचा पदवी अभ्यासक्रम सुरू झाला.

अलिगढ, बनारस व मुंबई विद्यापीठात शिक्षणशास्त्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात (एम.एड.) शिक्षणाचे

तात्वीक मानसशास्त्रीय व सामाजिक अधिष्ठान या पेपरचा समावेश झाला होता. १९२६ साली सेन यांनी सामाजिक पर्यावरणाचा मुलांच्या शिक्षणावरील प्रभाव या बाबतचा अभ्यास केला. जोगळेकर यांनी शिक्षण व सामाजिक वर्गातील आंतरक्रियांचा ऐतिहासिक संदर्भात अभ्यास केला. अर्थात असे अभ्यास फार थोडे होते. शिक्षणशास्त्र विभागाचे शिक्षकांच्या प्रशिक्षणाकडे अधिक लक्ष होते. शिक्षणाच्या सामाजिक बाजूचा अभ्यास तसा दुर्लक्षीत होता. समाजशास्त्र विभागांची मर्यादित संख्या आणि शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या पद्धतशीर अभ्यासाचा अभाव यामुळे स्वातंत्र्यापूर्वी या संदर्भात सकारात्मक जागृती नव्हती असेच म्हणावे लागते.

**ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ :**

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात अनेक शक्तीनी शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वच स्तरावर शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. घटनेतील सर्वासाठी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून प्राथमिक शिक्षणाचा व्यापक विस्तार झाला. सहाजिकच माध्यमिक व उच्च शिक्षणाचाही विस्तार सुरू झाला. अनेक विद्यापीठांची स्थापना होऊन पदवी व पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्राचे अध्यापन व संशोधन सुरू झाले. कांही समाजशास्त्रज्ञांनी या विषयाच्या उपशाखांच्या विकासासाठी योगदान दिले. शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या विकासाच्या अभ्यासाकडे कांहीनी लक्ष दिले. विद्यापीठांच्या शिक्षणशास्त्र विभागात पदव्युत्तर शिक्षण व पी.एच.डी. साठी मार्गदर्शन मिळू लागले. शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले.

सरकारने अनुसूचित जातीजमाती व इतर मागासवर्गीयांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत पुरविण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यामुळे समाजातील कनिष्ठ वर्गासह सर्वत्र शिक्षणाचा व्यापक प्रसार झाला आहे. तरी सुद्धा लहानसहान खेड्यातील, कनिष्ठ स्तरातील आणि झोपडपट्टीतील मुले या सुविधांचा लाभ घेण्यात मागे पडतात. ज्यांच्या कुटुंबात यापूर्वी कोणीही शिक्षण घेतले नव्हते अशा खेड्यातील शेतकऱ्यांची व मागासवर्गीयांची मुले प्रचलित शिक्षण पद्धतीत इतरासारखे यश मिळवू शकली नाहीत. ही मुले कला व वाणिज्य यासारख्या पारंपारिक अभ्यासक्रमाकडेच मोठ्या प्रमाणात दिसतात. इंग्रजी व हिंदी बरोबरच प्रादेशिक भाषेतून शिक्षण देण्याबाबतचा प्रश्नही आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच या क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्यांमुळे शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासाला चालना मिळाली आहे.

भारताने कल्याणकारी लोकराज्याचे ध्येय स्विकारले आहे. सामाजिक न्याय व समतेवर आधारीत समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी विज्ञान व तंत्रज्ञान यांची मदत घेतली जात आहे. आर्थिक न्याय व धर्मनिरपेक्षतेचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न चालू आहे. समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन आहे यावर भारतीयांचा विश्वास आहे. त्यासाठी देश पातळीवर कांही संस्थांची उभारणी केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.), राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) आणि भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (ICSSR) या संस्था शिक्षणाबाबतच्या

समस्यांचा अभ्यास व संशोधन यासाठी आर्थिक सहाय्य करीत आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या क्षेत्रात संशोधनाला चांगले प्रोत्साहन मिळाले आहे. राष्ट्रीय पातळीवर अनेक परिषदा व चर्चासत्रे आयोजित करून सामाजिक शास्त्रातील तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व नियोजन कर्ते, मानसशास्त्रज्ञ या सर्वात चर्चा घडवून आणल्या जात आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या विकासाला चांगला प्रारंभ झाला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतात शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकासाची सुरुवात झाली. अनेक संशोधन प्रकल्प व पी.एच.डी. चे प्रबंध या क्षेत्रात सादर झाले. माथुर आर. बी., सुमा चिटणीस, बी. व्ही. शाह, चन्ना करूणा यांनी या क्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे. १९६० ते १९८७ या काळात शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या विकासाला चांगली गती मिळाली आहे. अलाहाबाद, बेंगलोर, गुजराथ विद्यापीठ तसेच जामिया मिलीया इस्लामिया, शिवाजी विद्यापीठ, मुंबई, दिल्ली, एस.एन.डी.टी. व उदयपूर इ. अनेक विद्यापीठात शिक्षणाचे समाजशास्त्र या विषयाच्या अध्यापनाची सोय आहे.

**● स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) 'Dynamic Sociology' हे पुस्तक ............... यांनी लिहिले आहे.

२) अध्ययन आणि अध्यापनाच्या सामाजिक बाजूकडे ............... यांनी लक्ष वेधले होते.

३) १९२४ साली मुंबई विद्यापीठात .............. यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाची स्थापना झाली.

४) १९१७ साली Introduction to Educational Sociology हे पुस्तक ........... यांनी प्रकाशित केले.

५) ............... यांच्या मते शैक्षणिक समाजशास्त्र हे उपयोजित शास्त्र आहे.

### १.३.३ शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व (Significance of Sociology of Education) :

आधुनिक व संकीर्ण अशा बदलत्या समाजात शिक्षणाच्या समाजशास्त्राचा अभ्यास फार महत्त्वाचा तर आहेच शिवाय तो अनेक बाजूनी उपयुक्त आहे. त्याबाबतचे कांही मुद्दे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**१) शिक्षण व्यवस्था ही समाजाच्या केंद्रस्थानी आहे :**

आधुनिक समाजात शिक्षणव्यवस्था समाजाच्या केंद्रस्थानी राहून अत्यंत महत्त्वाची कार्ये पार पाडीत आहे. नवीन पिढीच्या सदस्यांचे समाजीकरण करून आवश्यक त्या बदलासाठी त्यांचे समायोजन साधण्याची तयारी करून घेण्याचे काम शिक्षणच करते. राजकीय व आर्थिक उपव्यवस्थांच्या गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देणे. भौतिक व सामाजिक वातावरणाचे नियंत्रण व नियोजन करण्यासाठी नवीन ज्ञानाचा

विकास व प्रसार करून सामुदायिक कल्याण व विकास साधण्याचे काम हे शिक्षणव्यवस्थाच करते. अशा तऱ्हेने आधुनिक माणूस व आधुनिक समाज समजून घेण्यासाठी शिक्षणव्यवस्था समजून घेणे अत्यावश्यक आहे. आधूनिक गुंतागुंतीच्या समाजात शिक्षणव्यवस्था ही केंद्रस्थानी आहे. कारण समाजातील सर्वच उपव्यवस्थांमध्ये होणारे बदल समजून घेण्याचे कार्य शिक्षणव्यवस्था करते.

**२) शिक्षण व्यवस्था ही समाजाच्या आधुनिकीकरणाचे एक महत्त्वाचे साधन आहे :**

सध्याच्या काळात भारतीय समाज आधुनिक बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नियोजन केले आहे. भारतीय समाजाने सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात आधुनिक मूल्यांचा स्विकार केला आहे. अर्थात नवीन पिढीत या मूल्यांचे संस्कार केले तरच त्याबाबतची उद्दिष्टे साध्य करणे शक्य आहे. नवीन ज्ञान व क्षमता असलेले, तांत्रिक कौशल्याने परिपूर्ण आणि सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेने भारलेले नागरीक निर्माण करणे हे भारतीय समाजापुढचे उद्दिष्ट आहे. ही महान कामगिरी पार पाडण्यासाठी भारत शिक्षणाचाच आधार घेऊ इच्छितो आणि त्याबाबत भारतीयांचा शिक्षणावर विश्वास आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शिक्षणाचे नियोजन करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी शिक्षणाच्या समाजशास्त्राचा अभ्यास आवश्यक आणि महत्त्वाचा आहे.

**३) शिक्षणव्यवस्थेने समाजाचा फार मोठा भाग व्यापला आहे :**

आधुनिक समाजात शिक्षण व्यवस्थेने सामाजिक व्यवस्थेचा फार मोठा भाग व्यापला आहे. भारतात शिक्षणव्यवस्थेचा आकार व समावेशकता यांचा लक्षणीय विस्तार झाला आहे. मोठ्या शहरातच नव्हे तर लहान खेड्यापर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला आहे. उच्च आणि मध्यमवर्गीयापर्यंत शिक्षण पोहोचलेले तर आहेच. पण त्याच बरोबर कनिष्ठ समजल्या गेलेल्या वर्गातही शिक्षणाचा प्रसार होत आहे. भारतीय लोकसंख्येचा फार मोठा हिस्सा शिक्षण व्यवस्थेत समाविष्ठ झाला असून १९९१-९२ च्या पहाणीनुसार शाळा, महाविद्यालये, तंत्रनिकेतने व विद्यापीठे यांच्या संख्येत प्रचंड मोठी वाढ झाली आहे. कोट्यावधी विद्यार्थी, लाखो शिक्षक, हजारो नियोजनकर्ते, संघटक, प्रशासक व कर्मचारी या शिक्षणव्यवस्थेत आहेत. खाजगी व सार्वजनिक पैशाची मोठी गुंतवणूक शिक्षणात झाली आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील या अवाढव्य व्यवस्थेचा वैज्ञानिक अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.

**४) शिक्षणव्यवस्थेचा तरूण पिढीबरोबर दिर्घकाळ संबंध रहातो :**

कुटुंबाबाहेरच्या सामाजिक संघटनामध्ये शिक्षणव्यवस्था ही पहिली व महत्त्वाची संघटना आहे. तिच्याशी बालकांचा, किशोरांचा व तरूणांचा दिर्घकाळ व व्यापक असा संबंध येतो या संबंधांच्या प्रभावाचा अभ्यास हा शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासाचा भाग बनतो. कारण समाजाला दिशा देणारी नवीन पिढी शिक्षणाद्वारे आपल्या समाजाचे आदर्श ठरवते. त्यामुळे व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून येतात.

### ५) बदलत्या शिक्षणव्यवस्थेला योग्य दिग्दर्शन करणे :

आधुनिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रचलित शिक्षणव्यवस्थेलाही स्वत:मध्ये मोठे बदल करून घ्यावे लागतात. शिक्षणाच्या विकासाबरोबर अनेक समस्या सुद्धा निर्माण झाल्या आहेत. उदा. कनिष्ठ वर्गातील बालकापर्यंत शिक्षणाचा विस्तार करणे. झोपडपट्टीतील बालकांचे शिक्षण, वाढती निरक्षरता, शिक्षणातील गळती व अपव्यय तसेच विविध जातीय व प्रादेशिक समूहांचे शैक्षणिक नियोजन करून त्यांना राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतून सामावून घेणे, विद्यार्थ्यातील असंतोष, शिक्षण प्रक्रियेत विविधता आणणे, अध्यापन व मूल्यमापनाच्या पद्धती, समाजातील विविध स्तरांच्या शैक्षणिक गरजा व उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या हेतूने शैक्षणिक संस्थांचे संघटन करणे. इ. समस्या सोडविण्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. अशावेळी शिक्षणाचे समाजशास्त्र सध्याच्या व कार्यपद्धतीचे मूल्यमापन करून आवश्यक असे बदल सुचविण्यासाठी फार उपयुक्त ठरते.

### ६) नवीन पद्धतीच्या शिक्षणव्यवस्थेच्या विकासास मदत :

शिक्षणाच्या समाजशास्त्रीय अभ्यासातून त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या शिक्षणपद्धतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन समृध्द होतो. असा समाजशास्त्रीय दृष्टीकोन आधुनिक व संमिश्र समाजासाठी योग्य शिक्षण पद्धती विकसीत करण्यासाठी उपयुक्त ठरतो. हे नवीन प्रकारचे शिक्षण समाजातील विविध प्रकारच्या समूहांच्या गरजा, अपेक्षा व मूल्ये आणि ध्येये सहानुभूतीपूर्वक पद्धतीने समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल. देशात स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवरचे समुदाय आहेत. आदिवासी, ग्रामीण, शहरी तसेच दारिद्र्य रेषेखालील आणि झोपडपट्टी व गलिच्छ वस्तीतील असे समूह आहेत. या सर्व समूहांच्या भूमिका परस्परपूरक होण्याची गरज आहे. थोडक्यात शिक्षणाचे समाजशास्त्र नवीन व समर्पक, समावेशक अशी शिक्षणपद्धती विकसीत करण्यासाठी उपयुक्त ठरते.

### ७) शिक्षणव्यवस्थेत समाविष्ठ झालेल्यांना सहाय्य :

समाजव्यवस्थेचा एक भाग म्हणून शिक्षणव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण, शिक्षणव्यवस्थेची अंतर्गत कार्यपद्धती, बाह्य सामाजिक वातावरणाचा तिच्यावरील परिणाम यांचा अभ्यास शिक्षणाच्या समाजशास्त्राने केला आहे. शिक्षणाचे समाजशास्त्र, शैक्षणिक नियोजनकर्ते, प्रशासक, शिक्षणतज्ज्ञ यांच्यासाठी उपयुक्त आहे. समाजव्यवस्थेची उद्दिष्ट्ये आणि गरजा आणि शिक्षणव्यवस्था यांची सांगड घालण्यासाठी एक अंतदृष्टी त्यांना अशा अभ्यासातून लाभेल.

### ८) शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात प्रभावी भूमिका :

शिक्षणाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका शिक्षकांच्या मार्फत पार पाडली जाते. परंतू काही कालांतराने शिक्षकांच्या ज्ञानात बदल होणे गरजेचे असते. कारण बदलत्या समाजातील बदलते ज्ञान शिक्षकाने जर आत्मसात केले नाही तर त्याचा विपरित परिणाम शिक्षण प्रक्रियेवर होतो. म्हणून शिक्षकांच्या ज्ञानामध्ये अद्यावत ज्ञानाची भर घालणारी व्यवस्था असणे गरजेचे असते. त्यामुळे बदलत्या ज्ञानाचा वापर शिक्षण व्यवस्थेमध्ये समाविष्ट करता येतो. यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी योग्य धोरण ठरवण्याचे अध्ययनही

या शाखेत केले जाते.

**९) समाजशास्त्राच्या विकासासाठी ही उपयुक्त :**

शिक्षणव्यवस्थेच्या कांही बाजूंचा अभ्यास समाजशास्त्राच्या विकासासाठी ही उपयुक्त आहे हे समाजशास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. मार्टन यांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समाजीकरणाचा आणि त्यांच्या औपचारिक व अनौपचारिक संबंधांचा अभ्यास केला होता. विद्यार्थ्यांच्या आकांक्षा, भूमिकेचा संघर्ष, सामाजिक गतिशिलता यांचा अभ्यास शिक्षणाच्या समाजशास्त्रात केला जातो. मूलभूत समाजशास्त्र विषयाच्या विकासासाठी या सर्व उपक्रमांची मदतच होते.

भारतीय समाज सध्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतीक क्षेत्रात होणाऱ्या आमूलाग्र परिवर्तनाला सामोरा जात आहे. अशा वेळी सर्वच स्तरावर समन्वय आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासाची गरज आहे.

● **स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न** (Check your progress) :

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आधुनिक समाजात कोणती व्यवस्था समाजाच्या केंद्रस्थानी असते ?

२) शिक्षणव्यवस्थेचा कोणत्या पिढीबरोबर दिर्घकाळ संबंध रहातो ?

३) भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचे साधन कोणते आहे ?

४) कोणत्या समाजाने राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात आधुनिक मूल्यांचा स्विकार केला आहे ?

५) वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समाजीकरणाचा अभ्यास कोणी केला होता ?

## १.४ सारांश :

या पहिल्या घटकात तुम्ही शिक्षणाचे सामजशास्त्र या विषयाची व्याख्या, व्याप्ती, विकास व महत्त्व अभ्यासले आहे. शिक्षण आणि समाज यांच्या संबंधातून ही समाजशास्त्राची उपशाखा विकसीत झाली आहे. या शाखेचा अभ्यासविषय आणि व्याप्ती व्यापक आहे. अमेरिका, ग्रेट ब्रिटन व भारतातही या शाखेचा विकास झाला असून हा अभ्यास विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक व शासन यांच्या दृष्टीने उपयुक्त व महत्त्वाचा आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर असा अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जॉर्ज पेन याना शिक्षणाच्या समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते.

२) शिक्षण आणि समाज यांच्यातील संबंधाचा वैज्ञानिक अभ्यास म्हणजे शिक्षणाचे समाजशास्त्र होय.

३) शाळा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे हस्तांतर करण्याचे कार्य करते.

४) ॲरिस्टॉटलच्या मते चांगले नागरीक तयार करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

५) शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंध शिक्षणव्यवस्थेत महत्त्वाचे असतात.

**रिकाम्या जागा भरा.**

१) वॉर्ड

२) जॉन ड्युई

३) डब्ल्यू ए. स्मिथ

४) स्मिथ, झोरबॅग

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आधुनिक समाजात शिक्षण व्यवस्था समाजाच्या केंद्रस्थानी असते.

२) शिक्षणव्यवस्थेचा तरूण पिढी बरोबर दिर्घकाळ संबंध रहातो.

३) भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाचे महत्त्वाचे साधन शिक्षण हेच आहे.

४) भारतीय समाजाने राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात आधुनिक मूल्यांचा स्विकार केला आहे.

५) मर्टन यांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समाजीकरणाचा अभ्यास केला होता.

## १.६ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ :

१) शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

२) शिक्षणाच्या समाजशास्त्राचा विकास विशद करा.

३) शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व याबाबत चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.


1) B. V. Shah / K. B. Shah : Sociology of Education, Rawat Publication.

2) S. S. Chandara / Rajendra K. Sharma : Sociology of Education, Atlantic Publications.

3) Papers in the Sociology of Education in India Edited by - M.S. Gore, I.P. Desai, Suma Chitnis.

4) M. S. Gore - Education and Modernization in India : Rawat Publications, Jaipur.

5) शिक्षणाची तात्त्वीक व समाजशास्त्रीय भूमिका : डॉ. न. रा. पारसनीस, नूतन प्रकाशन, पुणे.

6) मूलभूत समाजशास्त्र : चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❈ ❈ ❈

**घटक : २**

# शिक्षणाविषयीचे सैद्धांतिक दृष्टिकोन

## (Theoretical Prespectives on Education)

**प्रकरणाची प्रस्तावना (Block Introduction) :**

या प्रकरणात आपण शिक्षणाविषयीच्या विविध समाजशास्त्रीय सैद्धांतिक दृष्टिकोनाचा परिचय करून घेणार आहोत. प्रस्तुतचे प्रकरण या पुस्तकातील दुसरे प्रकरण असून शिक्षणाच्या समाजशास्त्रातील विविध सैद्धांतिक दृष्टिकोनासंबंधी आहे. शिक्षण ही एक सामाजिक उपव्यवस्था म्हणून तिच्या कार्याविषयीच्या सर्वांगीण बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणाची विभागणी चार घटकामध्ये करण्यात आली आहे. कोणत्याही सामाजिक व्यवस्थेचे व्यवस्थित ज्ञान मिळवण्यासाठी त्या व्यवस्थेविषयीचे विविधअंगी दृष्टिकोन जाणून घेणे गरजेचे असते. ते आपण या घटकात समजून घेणार आहोत. पहिल्या घटकामध्ये शिक्षणाविषयीच्या कार्यवादी दृष्टिकोनाचे विश्लेषण करण्यात आले आहे. शिक्षणाविषयीचा संघर्षवादी दृष्टिकोन आणि जहालवादी दृष्टिकोन प्रस्तुत प्रकरणाच्या दुसऱ्या घटकामध्ये समजून घेणार आहोत. तर तिसऱ्या घटकात शिक्षणाविषयीचा सांस्कृतिक पुनरूत्पादनाचा दृष्टिकोन समजून घेणार आहोत. चौथ्या घटकामध्ये स्त्रीवादी दृष्टिकोन अभ्यासणार आहोत.

### शिक्षणविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन

### (Functionalist Perspective on Education)

**घटक –संरचना :**

प्रस्तावना

उद्दिष्टे

विषय–विवेचन

शिक्षणाविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन

स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

सरावासाठी प्रश्न

चिंतन आणि कार्य

अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रस्तावना (Introduction) :**

कोणत्याही ज्ञानशाखेचे अध्ययन करण्यासाठी संबंधित ज्ञानशाखेतील उपलब्ध असणारे सैद्धांतिक दृष्टिकोन अभ्यासणे महत्त्वाचे असते. त्यामुळे ती एकंदर ज्ञान शाखा थोडक्यात समजून घेणे शक्य होते. आधुनिक समाजात शिक्षणाच्या समाजशास्त्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यामुळे शिक्षणव्यवस्था व शिक्षणप्रक्रिया या विषयी उपलब्ध असणारे सैद्धांतिक दृष्टिकोन अभ्यासणे गरजेचे आहे.

या घटकाद्वारे आपण शिक्षणाविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन समजून घेणार आहोत. प्रथम आपण कार्यवादी दृष्टिकोन म्हणजे काय हे समजून घेऊ. त्यानंतर कार्यवादी दृष्टिकोनाद्वारे शिक्षण व्यवस्थेविषयीचे विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेले विवेचन समजून घेणार आहोत. त्याचबरोबर या दृष्टिकोनावर इतर टिकाकारांनी केलेली टिका जाणून घेऊ.

**उद्दिष्टे (Objectives) :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला:

- शिक्षणाविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन काय आहे हे समजून घेता येईल.
- शिक्षणाची कार्ये समजावून घेता येतील.
- शिक्षणाच्या कार्यवादी दृष्टिकोनावरील टिका काय आहे हे जाणून घेता येईल.

**विषय विवेचन (Presentation of Subject-matter):**

शिक्षणाच्या कार्यवादी सिद्धांतामध्ये प्रामुख्याने दोन प्रश्न महत्त्वाचे मानले आहेत.

१. समग्र समाजाप्रति (society as a whole) शिक्षणाची कार्ये कोणती? यामध्ये कार्यवाद्यांनी समाज व्यवस्थेच्या गरजेविषयीचा दृष्टिकोन मांडला आहे. जसे सामाजिक एकात्मता आणि मूल्यांच्या एकमताचे संवर्धन यासाठीचे शिक्षणाचे योगदान यांचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे. यासंबंधीचे विवेचन केले आहे.

२. समाजव्यवस्था, शिक्षणव्यवस्था आणि समाजव्यवस्थेतील इतर घटक यांच्यात असणारे कार्यात्मक संबंध कोणते? या प्रश्नाद्वारे शिक्षण आणि समग्र समाज व्यवस्थेचे एकात्मीकरण घडून येण्यासाठी शिक्षण आणि आर्थिक व्यवस्था यांच्या संबंधाचे परीक्षण करणे.

सर्वसाधारणपणे शिक्षणाच्या कार्यात्मक विश्लेषणामध्ये समाजव्यवस्थेच्या संवर्धनात शिक्षणाचे कार्यात्मक योगदान यावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते.

**शिक्षणाविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन (Functionalist Perspective to Education):**

एमिल डुर्खीम या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने बदलत्या काळामध्ये समाजव्यवस्थेचे अस्तित्व टिकून राहाण्यासाठी शिक्षणव्यवस्थेचे योगदान महत्त्वाचे आहे असे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडले. डुर्खीमच्या

मते शिक्षणाचे समाजाप्रति महत्त्वाचे कार्य म्हणजे समाजाच्या मूल्यांचे व नियमनाचे संक्रमण करणे होय. समाज अस्तित्वात राहाण्यासाठी, समाजातील सभासदांमध्ये सामाजिक एकात्मता (social solidarity) टिकवून ठेवली नाही तर सामाजिक जीवन अशक्यप्राय आहे. जसे - भारतीय समाज व्यवस्था जरी सांस्कृतिक, धार्मिक, भाषीक विविधतेने नटलेली असली तरी प्रत्येक समूहाचे अस्तित्व कांही प्रमाणात मान्य करून एकसंघ भारतीय समाज अस्तित्वात राहाण्यासाठी काही समान मूल्ये, प्रमाणके समाजव्यवस्था टिकविण्यासाठी आवश्यक आहेत. जसे भारतीयांची राज्यघटना, सर्व भारतीयांसाठी समान कायदा, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि त्यांच्या संगोपनासाठी धर्मनिरपेक्ष शिक्षण इत्यादी.

म्हणजेच शिक्षणव्यवस्थेचे समाजातील महत्त्वाचे कार्य म्हणजे सर्व वेगवेगळ्या आचार-विचार असणाऱ्या व्यक्तींना समाज म्हणून एकत्रित ठेवून सामाजिक एकात्मतेची निर्मिती करणे होय. यामध्ये समाजाप्रति एकनिष्ठता व समाजाविषयी एकरुपतेची जाणीव आणि व्यक्तीपेक्षा सामाजिक घटकाला जास्त महत्व देण्याची भावना होय. एमिल डुर्खीमच्या मते, लहान मुलांना (Children) जर समाजाचा इतिहास शिकवला तर लहान वयातच मुलांना समाजात आपण आपल्यापेक्षा काहीतरी वेगळ्या घटकाचेही (समाज) सभासद आहोत ही जाणीव निर्माण होते. म्हणूनच समाजाचा इतिहास हा व्यक्तीस समाज समूहाचा जबाबदार सभासद होण्यास शिकवतो. म्हणून इतिहास शिकवणे हे समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. ज्यामुळे व्यक्तिगत जाणीवेपेक्षा सामाजिक जाणीव वाढीस लागण्यास मदत होते. म्हणून शिक्षणव्यवस्था ही व्यापक समाजहिताचा विचार ठेऊन तयार करण्यात आलेली असणे गरजेचे आहे. त्यामध्ये समाजातील सर्वांना समान संधी असणे आवश्यक आहे. एमिल डूर्खिमच्या मते गुंतागुंतीच्या औद्योगिक समाजांमध्ये शाळेची कार्ये ही कुटुंबव्यवस्था किंवा समवयस्क गट पार पाडू शकत नाहीत. कारण कुटुंबव्यवस्थेचे सभासदत्व हे आप्तसंबंधांवर आधारित असते तर समवयस्क गटाचे सभासदत्व हे वैयक्तिक संबंधावर आधारित असते. परंतु संपूर्ण समाजाचे सभासदत्व हे यावरील तत्त्वावर आधारित नसते. तर सामाजिक सभासदत्वासाठी इतराबरोबर सहकार्य भावना शिकणे गरजेचे असते. त्यामध्ये नातेवाईक किंवा मित्रच असणे गरजेचे नसते. यासाठी शाळाच सामाजिक प्रकारचे कौशल्य व्यक्तीस शिकवते. शाळेमध्ये मुलास इतर समुदायाच्या सभासदाबरोबर आंतरक्रिया करण्याची संधी मिळते. शाळेची मूल्य, नियमने व प्रमाणके वेगवेगळ्या सभासदामध्ये एक वेगळी भावना निर्माण करतात की ज्यामुळे व्यक्ती संकुचित स्वत: पुरता विचार न करता इतरांप्रती संवेदनशील होते. शाळा ही एक सामाजिक संस्था म्हणून समाजातील सभासदांमध्ये एकात्मतेची भावना तयार करते. त्यामुळे समाजाचे अस्तित्व टिकून राहण्यास मदत होते. शाळा ही समाजाची एक छोटी प्रतिकृती असते.

शिक्षण व्यक्तीस भविष्यातील व्यवसायासाठी विशिष्ट कौशल्ये पुरवते. अशाप्रकारची कौशल्ये हे औद्योगिक समाज व्यवस्थेत महत्त्वाची असतात. कारण ही कौशल्ये कुटुंबामध्ये व्यक्ती शिकू शकत नाही. कारण समाजव्यवस्थेत कार्याचे विभाजन हे विशेषीकरणाच्या आधारावर असते. औद्योगिक पूर्व समाजात कार्याच्या विभाजनाचा आधार हा गुंतागुंतीचा नसल्यामुळे व कार्याचे विशेषीकरण मोठ्या प्रमाणात झाले नसल्यामुळे कुटुंबाकडे असणारी कौशल्ये दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करणे सोपे होते. पालकांकडून

त्यांच्या पाल्याकडे अशी कौशल्ये सोपवणे शक्य असल्यामुळे औपचारिक शिक्षणाची गरज त्या समाजात फारशी जाणवली नाही. आधुनिक गुंतागुंतीच्या समाजामध्ये सामाजिक एकात्मता (Social Solidarity) ही विशेष कौशल्याच्या परस्परावलंबनावर आधारित आहे. म्हणजेच कोणतीही एखादी वस्तू तयार करण्यासाठी उद्योजकाला अनेक विशेषज्ज्ञांवर अवलंबून राहावे लागते. जसे एखादी कार तयार करण्यासाठी इंजिन काम करणारे वेगळे अभियंते असतात, लाईट बसवण्यासाठी इलेक्ट्रीकल्स मधील विशेषज्ञ असतात, गाडीचा साचा तयार करणारे वेगळे असतात. परंतु सर्वांमध्ये समन्वय असल्याशिवाय कार तयार होत नाही. या अशा प्रकारच्या समन्वयातून व्यक्ती सहकार्य आणि सामाजिक एकात्मतेची भावना शिकत असते.

अशाप्रकारे शाळेद्वारे साधारण मुलांमध्ये मूल्य संक्रमण होते ज्यामुळे सामाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असणारा एकजिनसीपणा निर्माण होण्यास मदत होते व मुलांना विशिष्ट कौशल्ये शिकता येतात. ज्यामुळे आवश्यक विविधता ही सामाजिक सहकार्य तयार करते. औद्योगिक समाजात अशाप्रकारे मूल्य एकात्मिकरण आणि विशेषीकरण याचे संयुक्तीकरण केले जाते की, ज्याद्वारे विशेषीतांच्या संयुक्तीकीकरणाद्वारे सेवा व वस्तू निर्माण केल्या जातात.

● **टॉलकॉट पार्सन्स (Talcott Parsons) :**

एमिल डुर्खिम यांनी मांडलेल्या शिक्षणाच्या कार्यवादी दृष्टिकोनाच्या आधारे अमेरिकन समाजशास्त्रज्ञ टॉलकॉट पार्सन्स यांनी आपला शिक्षणाचा कार्यवादी दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न १९५० मध्ये केला.

पार्सन्सच्या मते प्राथमिक समाजीकरणाच्या प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका महत्त्वाची आहे परंतु ती परिपूर्ण नाही. त्यानंतर समाजीकरणाची दुसरी महत्त्वाची संस्था म्हणजे शाळा होय. शाळा ही कुटुंब आणि समाज या दोहोंमधील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करते की ज्यामध्ये लहान मुलास समाजाचे सदस्य होण्यास मदत होते. कुटुंबात मिळालेला दर्जा हा अर्पित दर्जा (Ascribed Status) असतो आणि तो जन्माने मिळालेला असतो तर अर्जित दर्जा हा मिळवलेला (Achieved Status) असतो. अशाप्रकारे अर्पित दर्जा मिळवण्यासाठी व्यक्तीला विशेष असे काहीच करावे लागत नाही. तर अर्जित दर्जा मिळवण्यासाठी स्वत: कौशल्ये विकसित करून कर्तव्याने मिळवावा लागतो. या प्रक्रियेत शाळेची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. शाळा तरुण व्यक्तीस संक्रमणास तयार करते. शाळा मुलांच्या दर्जाचे मूल्यांकन व मूल्यमापन विशिष्ट पद्धतीने करतात की ज्यामध्ये भेदभाव करणे अवघड असते. विद्यार्थ्यांचा हा दर्जा त्यांच्या स्वकर्तृत्वाच्या आधारावर तपासला जातो. ज्यामध्ये लिंग, वंश, कुटुंब, धर्म या गोष्टींना कमी महत्त्व दिले जाते. अशाप्रकारे या प्रक्रियेत अर्पित दर्जाकडून अर्जित दर्जा मिळवण्याकडे प्रवृत्त केले जाते की, ज्यामुळे व्यक्ती वैश्विक मूल्यांचा आदर करण्यास शिकते. या प्रक्रियेत शाळा मुलांना सामाजिक मूल्यांची शिकवण देते. पार्सन्सच्या मते कोणत्याही समाजाला परिणामकारकरित्या चालू राहण्यासाठी मूल्यांचे मतैक्य असणे गरजेचे आहे.

शेवटी पार्सन्सच्या मते शिक्षणव्यवस्था ही व्यक्तीच्या भविष्यातील भूमिका निवडीतील महत्त्वाची यंत्रणा आहे. अशाप्रकारे शाळा ही भूमिका निवडीच्या प्रक्रियेतील महत्त्वाची संस्था आहे.

● **किंग्जले डेव्हीस आणि विल्बर्ट मूर (Kingsley Davis and Wilbert E. Moore) :**

पार्सन्सप्रमाणेच डेव्हीस आणि मूर हे शिक्षणव्यवस्था ही भूमिका वाटप करण्याची महत्त्वाची व्यवस्था आहे असे मानतात. परंतु त्याबरोबर शिक्षणव्यवस्थेला ते सामाजिक स्तरीकरणाच्या व्यवस्थेशी जोडतात. डेव्हीस आणि मूर यांच्या मते सामाजिक स्तरीकरण ही एक अशी व्यवस्था आहे, की ज्याद्वारे पात्र व कार्यक्षम व्यक्तींना योग्य स्थानी काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे समाज सामाजिक कार्यात्मकतेची गरज पूर्ण करू शकतो. यामध्ये हुशार व बुद्धिवंतांना बक्षीस व सवलती दिल्या जातात. म्हणून यामध्ये स्पर्धा तयार होते आणि स्पर्धेमुळे योग्य, सक्षम व्यक्तीची निवड समाजासाठी कार्यात्मक ठरते. शिक्षण व्यवस्था ही या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडते. डेव्हीसच्या मते शाळा, शिक्षण हे या कार्यक्षम व सक्षम असणाऱ्या व्यक्तीच्या निवड प्रक्रियेचे महत्त्वाचे ठिकाण आहे. याद्वारे व्यक्तीचे योग्य मूल्यमापन करून योग्य व्यक्तीस योग्य भूमिका वाटप करते. अशाप्रकारे शिक्षण हुशारी आणि समर्थतता या द्वारे व्यक्तीगत निवड श्रेणी देते. अशाप्रकारे कार्यात्मकरित्या समाजात महत्त्वाच्या असणाऱ्या भूमिका या व्यक्तीकडून पार पाडल्या जातात.

**टीका (Criticism) :**

शिक्षणाविषयीचा कार्यवादी दृष्टिकोन हा टिकाकारासाठी खुला आहे. त्यावरील महत्त्वाच्या टिका पुढीलप्रमाणे.

१. एमिल डूर्खीम यांनी आपल्या सिद्धांतामध्ये शिक्षण व्यवस्थेमार्फत संक्रमित केले जाणारे मूल्य व प्रमाणके हे सामाजिकच असतात असे स्पष्ट केले आहे. परंतु मूल्यांद्वारे व प्रमाणकाद्वारे सत्ताधारी अभिजन वर्गाच्या मूल्यांचे संक्रमीकरण होते याकडे दुर्लक्ष केले आहे.

२. कार्यवादी दृष्टिकोनासंदर्भात दुसरी महत्त्वाची टिका म्हणजे हा दृष्टिकोन संवर्धनात्मक आणि पूर्वग्रह दूषित असणारा आहे. कारण हा सिद्धांत प्रस्थापित समाज व्यवस्थेबाबतच दृष्टिकोन आहे तसा स्वीकारतो आणि त्याला सहाय्य करतो. त्यामुळे हा सिद्धांत शिक्षणाच्या अपकार्यात्मक (dyfunctional) बाजूवर प्रकाश टाकू शकत नाही.

● **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress) :**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. एमिल डूर्खिमच्या मते नवीन पिढीला समाज जिवंत ठेवायचा असेल तर काय शिकवले पाहिजे?

२. एमिल डूर्खिमच्या मते औद्योगिक-पूर्व समाजात श्रमविभाजनाची कौशल्य कोणत्या सामाजिक संस्थेद्वारे पार पाडले जात असत ?

३. आधुनिक समाजातील मुल्याचे संक्रमण नवीन पिढीस करणारी महत्त्वाची संस्था कोणती?

४. शिक्षणव्यवस्थेचे समाजाप्रति असणारे सर्वात महत्त्वाचे कार्य कोणते?

५. डेव्हीस आणि मूर यांच्या मते शिक्षणव्यवस्था ही कशाची महत्त्वाची व्यवस्था आहे?

६. पार्सन्सच्या मते समाजीकरणाच्या महत्त्वाच्या दोन संस्था कोणत्या?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check your progress) :**

१. समाज जिवंत ठेवायचा असेल तर नवीन पिढीला इतिहास शिकवला पाहिजे.

२. औद्योगिक-पूर्व समाजात श्रमविभाजनाचे कौशल्य पार पाडण्याचे कार्य कुटुंबसंस्था करीत असे.

३. आधुनिक समाजातील मूल्यांचे संक्रमण करणारी महत्त्वाची संस्था शिक्षणसंस्था किंवा शाळा आहे.

४. शिक्षण व्यवस्थेचे समाजाप्रति असणारे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे सामाजिक एकात्मतेची निर्मिती करणे होय.

५. डेव्हीस आणि मूर यांच्या मते शिक्षणव्यवस्था ही भूमिका वाटपाची महत्त्वाची व्यवस्था आहे.

६. पार्सन्सच्या मते कुटुंब व शाळा ह्या समाजीकरणाच्या महत्त्वाच्या संस्था आहेत.

**सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Excercise/Home Assignment):**

**खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.**

१. शिक्षणाचा समाजशास्त्रीय कार्यवादी दृष्टिकोन स्पष्ट करा?

२. डेव्हीस आणि मूर यांचा शिक्षणाचा समाजशास्त्रीय कार्यवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

३. पार्सन्सचा शिक्षणविषयक कार्यवादी दृष्टिकोन विषद करा.

**चिंतन आणि कार्य (Reflection and Action):**

शिक्षणाचा कार्यवाही दृष्टिकोन स्पष्ट करून समजून घेण्यासाठी क्षेत्रकार्य निवडून त्याबद्दल तथ्य संकलन करा व या सिद्धांताची तत्त्वे तपासा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings):**


- **Bernbaum, G 1977**: Knowledge and Ideology in the Sociology of Education.London. Macmillan.
- **Blackledge D and Hunt, B** 1985**:** Sociological Interpretation of Education, corm Helm, London.
- **Durkheim, E**: 1961: Moral Education. Glencoe. The free Press.
- **Davis K and Moore W E 1967**: Some principles of Stratification *in* Bendix and Lipset.

- **Harlembous M with Heald R M 1980:** SOCIOLOGY, Themes and Perspectives.Londen. Oxford University, Press.
- **Parsons, T 1961**. The School class as a Social System in Halsey, Floud and Anderson.


# शिक्षणाविषयीचा जहालवादी दृष्टिकोन

**(Radical Perspective on Education)**

**घटक – संरचना :**

प्रस्तावना

उद्दिष्टे

विषय विवेचन

    शिक्षणाविषयीची जहालवादी दृष्टिकोन

टिका

स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

चिंतन आणि कार्य

अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रस्तावना (Introduction) :**

शिक्षणाच्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनामध्ये कार्यवादी दृष्टिकोनानंतर शिक्षणाविषयी जहालवादी दृष्टिकोनाचे योगदान महत्त्वाचे आहे. कारण शिक्षणव्यवस्था समाजव्यवस्थेच्या विकासासाठी महत्त्वाची असल्याने वेगवेगळ्या दृष्टिकोनातून ती समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्थेमुळे समाज विकास होतो का? हा प्रश्न काही विचारवंतांनी आपल्या दृष्टिकोनातून मांडला आहे. त्यामध्ये इव्हॉन इलिच यांचे योगदान महत्त्वाचे आहे ते आपण या घटकामध्ये लक्षात घेणार आहोत.

**उद्दिष्टे (Objectives):**

- शिक्षण व्यवस्थेच्या कार्याबद्दलचे टिकात्मक विश्लेषण अभ्यासणे.
- औद्योगिक समाजातील शिक्षण व्यवस्था ही व्यक्ती व समाज यांच्या विकासास मदत कशी करते हे अभ्यासणे.
- शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन म्हणून जहालवादी दृष्टिकोन अभ्यासणे.

**विषय विवेचन (Presentation of Subject matter) :**

सदर घटकामध्ये आपण शिक्षणाविषयीचा इविनइलिच यांचा दृष्टिकोन अभ्यासणार आहोत.

**शिक्षणाविषयीचा जहालवादी दृष्टिकोन (Radical Perspective on Education) : इव्हान इलिच यांचा**

इव्हन इलिच हा अमेरिकन सिद्धांतकार आणि तत्त्वज्ञ होता. इलिच हा मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ नसला तरी त्यांचा सिद्धांत मार्क्सवादी विचारांच्या सैद्धांतिक दृष्टिकोनाशी जवळचा आहे. हा सिद्धांत प्रथमत: शिक्षणाच्या कार्यवादी आणि उदारमतवादी सिद्धांतावर टिकात्मक विवेचन करतो आणि दुसरे म्हणजे प्रगत औद्योगिक समाजातील शिक्षणव्यवस्थेच्या भूमिकेबद्दल जहाल टिका करतो की जे मार्क्सवादी विचाराच्या बाबतीत समविचारी दिसून येतो. जरी रूढ अर्थाने तो समाजशास्त्रज्ञ नसला तरी त्याने १९७१ मध्ये लिहिलेल्या 'Deschooling Society' या पुस्तकात शिक्षणाच्या समाजाशास्त्राला महत्त्वाचे योगदान दिले आहे.

इलिचने आपल्या दृष्टिकोनाची सुरुवात शिक्षणांमध्ये काय पाहिजे यापासून केली आहे. सर्वप्रथम शिक्षणात विशिष्ट कौशल्य शिकणे जसे टंकलेखन, परदेशी भाषा, सुतारकाम, तांत्रिक कार्य यांचा समावेश असावा. शिक्षण म्हणून फक्त कोणतेही कौशल्य मिळवण्याचे उद्दिष्ट नसावे. तर शिक्षण हे व्यक्तीचे पूर्णपणे अनुभवाचे उदात्तीकरण करणारे असावे की ज्यामध्ये व्यक्ती आपल्या बौद्धिक विकासासाठी अन्वेषण, नव निर्मितीचा वापर करून पूर्णपणे विकसित होईल. इलिच असे प्रतिपादन करतो की प्रभावी कौशल्य शिकवणे दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे प्रभावी कौशल्य देऊ शकत नाही.

दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे प्रभावी कौशल्य शाळा देऊ शकत नाहीत, की जे शिक्षणाचा मुख्य आदर्श आहे परंतु सध्या त्याच्या विरोधातच घडत आहे. त्यासाठी इलिचच्या मते जो दैनंदिन जीवनात हे कौशल्य वापरतो त्यानेच हे कौशल्य शिकवले पाहिजेत. ज्यामुळे ती कौशल्य प्रभावीपणे संक्रमीत करता येतील. त्याचबरोबर इलिचच्या मते शिक्षणाचा मुख्य हेतू हा समाजाच्या भविष्याविषयी आहे. आजचे शिक्षण शिक्षणाच्या आदर्शांना लागू होत नाही. त्यांच्या मते शाळा ही दमनात्मक (repressive) संस्था आहे की जी मुलांना लादलेली तत्त्वप्रणाली शिकवते. ज्यामध्ये निम्न प्रतिभा आणि क्रियाशीलता दिसून येते. सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षण करणारी विचारप्रणाली पाळावयास लावते. यालाच

त्यामुळे त्यांनी छुपा अभ्यासक्रम (hidden Curriculam) असे म्हटले आहे. हा अभ्यासक्रम मुलांना आपण का शिकतो किंवा यातून आपल्याला काय ज्ञान मिळते यामध्ये विसंगती निर्माण करतो. कारण यामध्ये फक्त सूचनावजा वर्चस्ववादाची शिकवण यशस्वी होण्यासाठी दिली जाते. पण खरे शिक्षण सूचनांद्वारे मिळत नसते तर प्रत्यक्षात शिकणाऱ्याचा शिक्षण प्रक्रियेत मूक्त सहभाग असणे गरजेचे आहे. थोडक्यात इलिचच्या मते 'आर्थिक गोष्टी शिकवण्यासाठी केवळ शिकवण्याचीच गरज नसते' (most learning requires no teaching). शाळा ह्या सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी व कामगार व कनिष्ठ स्तरावरील लोकांचे जीवन आहे तसेच ठेवण्यासाठी वर्चस्ववादी विचारांच्या व्यक्ती निर्माण करतात. जरी शिक्षणव्यवस्था ही श्रमविभाजनासाठी सक्षम व कार्यक्षम व्यक्तींची निवड करून भूमिका वाटप करणारी असली तरी या बाबत इलिच म्हणतो शाळा ही विद्यार्थ्याला स्वत: आणि इतर बाबतीत शिकणे व शिकवणे याबाबत संभ्रम तयार करते.

इलिचच्या मते, 'शिक्षणव्यवस्था ही आधुनिक औद्योगिक समाजाच्या सर्व प्रश्नाचे मूळ आहे'. शाळा ही सर्वात प्रथम मन नसणारे, सहज शिक्षण घेणारे नागरिक बनवण्याची महत्त्वाची आणि मुख्य व्यवस्था आहे. शाळेमध्ये व्यक्ती स्वत:चे विचार करण्याची क्षमता विसरून दुसऱ्या व्यवस्थेची नियमने, अधिकार शिकतो. त्यामुळे त्या व्यक्तीमध्ये अलगीकरण, व्यक्तीवाद वाढतो. त्याचबरोबर संस्थेच्या नियमनाचा उपभोग करून घेण्याची प्रवृत्ती शिकत असतो. अशा शिक्षणातून बाहेर आलेली व्यक्ती उपलब्ध साधनाचा उपभोग घेते व त्यातच समाधान मानते. यामुळे उपभोगवादी असणाऱ्या औद्योगिक समाज व्यवस्थेची गरज पूर्ण होते. त्यातच ही व्यक्ती आपले ध्येय मानते. त्याचबरोबर व्यक्ती जाहिराती बघण्यातच जास्त वेळ घालवतो व त्यानुसारच आपण काय होणार आहोत ठरवतो व औद्योगिक समजात तयार होणाऱ्या सेवा व वस्तू यांचा उपभोग घेतो. सेवा घेण्यासाठी डॉक्टर, वकील, अभियंता यांचा वापर करण्यास व्यक्ती शिकते. कारण शिक्षणात हेच शिकवले जाते की उच्च पदस्थ व्यावसायिक हे त्या क्षेत्रातील उच्च आहेत. आपणास त्यामुळे काहीच समजत नाही म्हणून त्यांच्या सेवा मानधनावर घेतो. याबाबत इवन इलिच म्हणतो की, आधुनिक औद्योगिक समाजातील शिक्षणव्यवस्था मानवी जीवनाचा आनंद आणि परिपूर्ती असणारी चौकट देऊ शकत नाही. कारण सर्व शिक्षण यंत्रणा उद्योगातून निघणाऱ्या वस्तूंच्या उपभोगातच समाधान मानण्याचे शिकवत असतात. जोपर्यंत आपण उद्योगाच्या विधियुक्त योजनांद्वारे लादलेले शिक्षणावरील नियंत्रण लक्षात घेणार नाही तोपर्यंत क्रियाशील नागरिक तयार करू शकणार नाही.

यासाठी इव्हॉन इलिच याने एक जहालवादी पर्याय सूचवला आहे आणि तो म्हणजे शाळाविरहीत समाज. म्हणजेच सध्यकालीन शिक्षण व्यवस्था बरखास्त करणे किंवा पूर्णपणे बदलणे होय. यामुळे मानवी जीवनास आवश्यक असणारे मूल्य, कौशल्य, आनंदीपणा निर्माण होईल आणि सध्याच्या अकार्यक्षम शिक्षण व्यवस्थेतून सर्वांची मुक्ती होईल. यावर दोन पर्याय ही त्यांनी सूचवलेले आहेत. ते म्हणजे कौशल्याचा विनीमय 'Skill Exchange'. ज्यामध्ये जे व्यक्ती प्रत्यक्षात ही कौशल्य वापरतो त्याकडून शिकणे. दुसरे म्हणजे शिकण्याचे जाळे. 'Learning Web' ज्यामध्ये समान शिक्षणविषयक हितसंबंध

असणाऱ्या व्यक्ती एकत्र येतील व आपल्या अनुभवांची एकमेकांशी देवाणघेवाण करतील. यातून सृजनशिल अन्वेषणात्मक शिक्षण मिळेल. याद्वारे इलीच असा निष्कर्ष काढतो की, यामुळे उपभोगवादी समाजाचे पुनरूत्पादन करणाऱ्या अवयव नष्ट करणे शक्य होईल आणि नवीन समाजाची निर्मिती होऊन खऱ्या अर्थाने मानवाची मुक्ती साधली जाईल.

### टिका (Criticism) :

शाळा ही समाजाच्या सर्व सहाय्याचे केंद्र मानले आहे. बावेल आणि गिन्टीसच्या मते इलिच याने सद्य स्थितीतील शिक्षण व्यवस्थेचे पूर्णपणे उच्चाटन होणे गरजेचे आहे असे मानून मूलभूत चूक केली आहे. त्याच्या मते समाजाच्या समस्यांचे केंद्र शाळेत नसून आर्थिक व्यवस्थेत आहे तर याचे पूर्णपणे उच्चाटन होणे गरजेचे आहे. Deschooling हे फक्त व्यवसायिकरित्या अकार्यक्षम व्यक्तीच तयार करेल. त्यामुळे समाजात बदल घडून येणे शक्य होणार नाही. मार्क्सवाद्यांच्या मते, आर्थिक पायाभूत संरचनेतील क्रांतीकारक बदलच समाजव्यवस्थेत बदल घडवून आणू शकतात.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress) :

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. इव्हॉन इलिचच्या मते 'शिक्षण फक्त कौशल्य मिळवणारे नसावे' तर काय असावे?

२. इव्हॉन इलिच याने सर्वप्रथम कोणत्या दोन शिक्षणविषयीच्या दृष्टिकोनावर टिका केली आहे?

३. इव्हॉन इलिचच्या मते शाळा काय आहे?

४. इव्हॉन इलिचच्या मते 'छुपा अभ्यासक्रम' म्हणजे काय?

५. इव्हॉन इलिचने शिक्षणव्यवस्थेला सूचवलेले पर्याय कोणते?

### स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check Your Progress) :

१ इलिचच्या मते शिक्षण फक्त कौशल्य मिळवणारे नसावे तर व्यक्तीच्या अनुभवाचे पूर्णपणे उदात्तीकरण करणारे असावे.

२ इलिच यांनी शिक्षणाच्या कार्यवादी आणि उदारमतवादी दृष्टिकोनावर टिका केली आहे.

३ इलिचच्या मते शाळा ही दमनात्मक संस्था आहे जी लादलेली तत्त्वप्रणाली शिकवते.

४ छुपा अभ्यासक्रम म्हणजे ज्या अभ्यासक्रमाद्वारे कमी क्रियाशिलता व कल्पकतेच्या शिक्षणाबरोबरच सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करणारी विचारप्रणाली शिकवतो.

### सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Excercise/Home Assignment) :

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. इव्हॉन इलिच यांनी मांडलेला शिक्षणाच्या समाजशास्त्रातील जहालवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

२. इव्हॉन इलिचच्या जहालवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन करा.

**चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :**

सद्याच्या शिक्षण व्यवस्थेची ध्येये काय आहेत हे समजून घ्या.

**अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :**


- **Illich I 1973**: Deschooling Society.Harmondsworth. Penguin Books.
- **Maizels J 1970**: Karl Marx: Selected Writing. Oxford. Oxford University, Press.
- **Harlembous M with Heald R.M (1980):** SOCIOLOGY, Themes and Perspectives.Londen. Oxford University, Press.


## शिक्षणाविषयीचा संघर्षवादी दृष्टिकोन

## (Conflict Perspective on Education)

**घटक – संरचना :**

प्रस्तावना

उद्दिष्टे

विषय विवेचन

शिक्षणाविषयीचा संघर्षवादी दृष्टिकोन

टीका

स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

चिंतन आणि कृती

अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रस्तावना (Introduction) :**

शिक्षणाच्या समाजातील भूमिकेविषयी वेगवेगळे विचारप्रवाह आहेत. काही विचारवंतांच्या मते शिक्षण समाजात विकास घडवून आणण्याचे कार्य करते तर काहींच्या मते शिक्षण समाजातील ठराविक वर्गाच्याच विकासाला चालना देते. प्रस्तुत दृष्टिकोनाच्या मते शिक्षण भांडवलदाराकडून भांडवल वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे संक्रमण करते. ज्यामुळे भांडवलदारांना आपल्या भांडवलवाढीसाठी कायदेशीर मान्यता मिळते. या घटकामध्ये तुम्ही लुईस अल्थुसर यांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहात.

**उद्दिष्ट्ये (Objectives):**

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास :

- शिक्षणाचा संघर्षवादी दृष्टिकोन काय आहे हे समजून घेता येईल.
- शिक्षणाच्या संघर्षवादी दृष्टिकोनाविषयी लुईस अल्थुसर यांच्या कार्याचा आढावा घेता येईल.
- शिक्षणाच्या कार्यवादी दृष्टिकोनाचे टिकात्मक परिक्षण जाणून घेता येईल.

**विषय विवेचन (Presentation of Subject - matter) :**

प्रस्तुत घटकामध्ये लुईस अल्थुसरचा शिक्षणविषयक दृष्टिकोन मांडण्यात आला आहे. त्याद्वारे आपणास शिक्षणाचे समाजशास्त्रीयदृष्ट्या अध्ययन करता येईल.

**शिक्षणविषयीचा संघर्षवादी दृष्टिकोन (Conflict Perspective on Education) :**

शिक्षणाच्या कार्यवादी सिद्धांताप्रमाणे मार्क्सवादी दृष्टिकोनातील सिद्धांतकारांनी सुद्धा पाश्चिमात्य औद्योगिक समाजातील शिक्षणव्यवस्थेबाबत आपला वेगळा सैद्धांतिक दृष्टिकोन मांडला आहे.

यामध्ये प्रामुख्याने शिक्षण व्यवस्था ही आर्थिक संरचनेच्या आधारावर कशी चालते हे स्पष्ट केले आहे. याचबरोबर यामध्ये सत्ता, विचारप्रणाली, शिक्षण आणि भांडवली समाजातील उत्पादन संबंध यांच्यातील संबंधाचे अन्वेषणही केले आहे. यातून आपणास हे लक्षात येईल की शिक्षणाचा संघर्ष सिद्धांत कार्यवादी दृष्टिकोन आणि उदारमतवादी दृष्टिकोनास पर्याय शोधतो.

- **लुईस अल्थूसर – मजुरांच्या शक्तीचे पुनरूत्पादन (Louis Althusser - The Reproduction of Labour Power) :**

फ्रेंच तत्त्ववेत्ता अल्थूसर याने शिक्षण व्यवस्थेचा मार्क्सवादी दृष्टिकोनातून सर्वसाधारण ढाचा (General Framework) सादर केला आहे. शिक्षण एक अधिसंरचनेचा भाग म्हणून पर्यायाने संरचनेने आकारलेले असते. आहे. म्हणून शिक्षण व्यवस्था ही प्रस्थापित सत्ताधारी वर्गाचे आर्थिक हितसंबंध व उत्पादनाचे संबंध जपण्याचे कार्य करते. सत्ताधारी वर्गाला टिकून राहाण्यासाठी आणि श्रीमंत बनण्यासाठी 'कामगारांच्या शक्तीचे पुनरूत्पादन' होणे गरजेचे आहे. कामगारांच्या पिढ्यान्‌पिढ्या या कामगार म्हणून राहिल्या तरच भांडवल वाढते हे भांडवलदारांना माहितच आहे आणि ते त्यावरच अवलंबून असतात. कामगारांच्या शक्तीचे पुनरुत्पादनाच्या दोन प्रक्रिया आहेत.

पहिले म्हणजे आवश्यक कार्यक्षम कामगार वर्गाच्या कौशल्याचे पुनरूत्पादन आणि दुसरे सत्ताधारी वर्गाच्या विचारप्रणालीचे केले जाणारे समाजिकीकरणाचे या दोन प्रक्रियेद्वारे तांत्रीकदृष्ट्या कार्यक्षम असणाऱ्या कामगारांमध्ये शरण येण्याची प्रवृत्ती विकसित केली जाते. या समाजात शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही अशा स्वरूपाच्या कामगारांचे पुनरुत्पादन करणे हीच असते.

अल्थुसरच्या मते कोणताही वर्ग आपली सत्ता फक्त कामगारांच्या शारीरिक श्रमाच्या वापरामुळे दीर्घकाळ टिकवू शकत नाही. तर वैचारिक नियंत्रण हे सत्ता टिकवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. जर व्यवस्थेतील व्यक्ती सत्ताधाऱ्यांना अटळ, नैसर्गिक, आवश्यक समजत असेल आणि त्यांचे खरेपण जाणून घेण्यास इच्छुक नसेल तर सत्ताधाऱ्यांना सत्ता टिकवणे सोपे असते. सत्ताधाऱ्यांना माहित असते की, बळाचा वापर हे सत्ता टिकविण्यासाठी प्रबळ माध्यम नाही तर सत्ता टिकविण्यासाठी सत्ताधारी वर्गाच्या विचार प्रणालीचे पुनरूत्पादन हे एकच महत्त्वाचे माध्यम आहे. यामध्ये शिक्षणव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची आहे.

म्हणून सत्ताधाऱ्याविषयी शरणागती बाळगण्याची वृत्ती विकसित करण्यासाठी सत्ताधारी विविध "Ideological State Apparatuses' ज्यामध्ये जनसंपर्क माध्यमे, कायदा, धर्म आणि शिक्षणाचे पुनरउत्पादन करतात. ISA द्वारे सत्ताधारी वर्ग सामान्यांमध्ये चुकीची वर्ग जाणीव तयार करतात व ती कशी योग्य आहे हे पटवून देतात. ज्यामुळे सामान्यांचा दर्जा आहे तसा राहतो. जसे पूर्वी सत्ताधारी जास्तीत जास्त धर्माचा वापर करत असते आणि आता औद्योगिक समाजात ते शिक्षण व्यवस्थेचा वापर करत आहेत.

अल्थूसरच्या मते शिक्षण फक्त सत्ताधारी वर्गाच्या विचारप्रणालीचे संक्रमण करते असे नाही तर ते भांडवलशाहीचे समर्थन आणि कायदेशीर कसे आहे हे ही स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते. त्याचबरोबर शिक्षण हे श्रमविभागणीतील उच्च वर्गाला आवश्यक, अनुकूल वर्तन आणि प्रवृत्ती याचे पुनर्त्पादन करते. त्याचबरोबर कनिष्ठ वर्गाला उच्च वर्गाकडून होणारी पिळवणूक सहन करणे व स्वीकारणे शिकवते. शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला या सर्व बाबींचे योग्य शिक्षण दिले जाते.

**टीका (Criticism) :**

अल्युसरने भांडवलशाही समाजातील शिक्षण व्यवस्थेच्या विश्लेषण विषयीचा मार्क्सवादी दृष्टिकोन हा अतिसामान्यपणे मांडला आहे. दुसरी महत्त्वाची टिका म्हणजे अल्थूसरचा कोणताही वाद-विवाद पुराव्याने सिद्ध करता येणारा नाही. जसे अल्थूसर स्वत: म्हणतो की हा दृष्टिकोन अतिशय प्राथमिक स्वरूपाचा आहे.

● **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न.**

१. मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या आधारे समाजातील सर्व संस्थाचा पाया कोणत्या घटकावर अवलंबून असतो?

२. लुईस अल्थूसरच्या मते कामगारांच्या शक्तीच्या पुनरुत्पादनाच्या दोन प्रक्रिया कोणत्या?

३. कोणत्याही सत्ताधारी वर्गाला सत्ता दिर्घकाळ टिकवण्यासाठी काय महत्त्वाचे आहे?

४. सत्ताधाऱ्याविषयी शरणागती बाळणग्यासाठी सत्ताधारी काय करतात?

**स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check Your Progress) :**

१. मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार समाजातील सर्व संस्थांचा पाया आर्थिक घटकावर आधारित असतो.

२. अल्थुसरच्या मते कामगारांच्या शक्तीच्या कौशल्याचे पुनर्त्पादन आणि सत्ताधारी वर्गाच्या विचारप्रणालीचे समाजीकरण.

३. कोणत्याही सत्ताधारी वर्गाला सत्ता दिर्घकाळ टिकवण्यासाठी वैचारिक नियंत्रण गरजेचे आहे.

४. सत्ताधाऱ्याविषयी शरणागती बाळगण्यासाठी सत्ताधारी सामान्यामध्ये चुकीची वर्ग जाणीव निर्माण करतात.

**सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Excercise/Home Assignments) :**

**खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.**

१. शिक्षणाच्या समाजशास्त्रातील संघर्षवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

२. शिक्षणाच्या समाजशास्त्रातील संघर्षवादी दृष्टिकोनकारांची पूर्वीच्या दृष्टीकोनावरील टिका स्पष्ट करा.

**चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :**

शिक्षणाच्या समाजशास्त्रातील संघर्षवादी दृष्टिकोन समजून घेण्यासाठी सध्याच्या शिक्षणव्यवस्थेचे या दृष्टिकोनातून परिक्षण करा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :**


- **Althusser, L 1972**: Ideology and Ideological State Apparatuses in Cosin.
- **Maizels J 1970**: Karl Marx: Selected Writing. Oxford. Oxford University, Press.
- **Harlembous M with Heald R.M (1980) :** SOCIOLOGY, Themes and Perspectives. Londen. Oxford University, Press.

# शिक्षणाविषयीचा सांस्कृतिक पुनरुत्पादन दृष्टिकोन
## (Cultural Reproduction Perspective on Education)

**घटक – संरचना :**

प्रस्तावना

उद्दिष्ट्ये

विषय - विवेचन

शिक्षणाविषयीचा सांस्कृतिक पुनरुत्पादन दृष्टिकोन

स्वय-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

चिंतन आणि कृती

अधिक वाचनासाठी पुस्तके

**प्रस्तावना (Introduction) :**

प्रस्तुत घटकामध्ये तुम्ही पिअर बोर्देउ यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन समजून घेणार आहात. यामध्ये एकच शिक्षणव्यवस्था सामाजिक कारणामुळे कशी भेदभाव तयार करते हे समजून घेणार आहात. त्याचबरोबर सदर दृष्टिकोनावर केली जाणारी टिका देखील समजून घेणार आहात.

**उद्दिष्टे (Objectives) :**

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला :

शिक्षणाविषयीचा सांस्कृतिक पुनरुत्पान दृष्टिकोन समजून घेता येईल.

पिअर बोर्देउचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन समाजशास्त्रीय दृष्टिकोन समजून घेता येईल.

**विषय विवेचन (Presentation of Subject - matter) :**

कोणत्याही समाजव्यवस्थेत स्वीकारलेली शिक्षणव्यवस्था ही कार्यात्मक पातळीवर समानरित्या कार्य करते का? हा प्रश्न समजून घेण्यासाठी सदरचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा आहे.

भारतासारख्या वेगवेगळेपणा परंपरा, भाषा, धर्म, जाती असणाऱ्या देशात जरी शिक्षणव्यवस्था एकच असली तरी शिक्षण व्यवस्थेचे समाजाप्रति असणारे कार्य सर्व समाजात एकाच पद्धतीने बिंबवले जात नाही हे सत्य आहे. कारण शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असणारी संस्कृती व पार्श्वभूमी सर्व घटकाकडे समान नाही. म्हणून शिक्षणव्यवस्थेच्या या सामाजिक भूमिकेविषयीचे समाजशास्त्रीय विवेचन आपण या घटकात अभ्यासणार आहोत.

**शिक्षणाविषयीचा सांस्कृतिक पुनर्रुत्पादनाचा दृष्टिकोन (Cultural Reproduction Perspective on Education)**

- **पिअरर बोर्देऊ (Pierre Bourdieu) :**

या प्रस्तुत दृष्टिकोनामध्ये एक समाज म्हणून समाजातील सत्तेचे स्वरूप आणि वितरण वाटपातील शाळेतील ज्ञान या संकल्पनेचा अर्थ आणि संघटन यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. समाज व्यवस्थेतील प्रभावी सत्ताधारी वर्गाची शिक्षण व्यवस्थेतील ज्ञान हा घटक स्पष्ट करण्याची सत्ता होय. जर शाळेतील ज्ञान जास्तीत जास्त सत्ताधारी वर्गाविषयी असेल तर नैसर्गिकरित्या सत्ताधारी वर्गातील मुलेच याचा फायदा जास्त घेतात. त्यामुळे सत्ताधारी नसणाऱ्या वर्गातील मुले भेदभावास बळी पडतात. कारण त्यांची संस्कृती त्या शिक्षणाला समजणारी नसते.

बोर्देऊच्या मते शिक्षणव्यवस्थेची महत्त्वाची भूमिका म्हणजे 'सांस्कृतिचे पुर्नरुत्पादन' करणे होय. दुरखिमच्या मते समाजाच्या सर्व मूल्यांचे संक्रमण होणे अपेक्षित आहे परंतु असे होत नाही. तर येथे 'प्रभावी सत्ताधारी वर्गाच्या संस्कृतीचे पुर्नरुत्पादन' होते. या सत्ताधारी वर्गाकडे या संस्कृतीला अर्थ देण्याची व लादण्याची सत्ता असते. त्यामुळे ते कायदेशीररित्या सर्वांवर ती लादतात. सत्ताधारी वर्ग स्वत:ला योग्य वाटणारी संस्कृती पाळतात व दुसऱ्यावर ते लादतात कारण त्यांच्याकडे सत्ता असते हीच संस्कृती सत्ता असल्यामुळे शाळेद्वारे इतरांवरही लादतात.

बोर्देऊ या प्रभावी संस्कृतीलाच 'सांस्कृतिक भांडवल' असे म्हणतो. कारण ही संस्कृती त्यांना शिक्षणामार्फत लोकांपर्यंत पोहोचवल्यानंतर त्याचे रूपांतर त्याचे भांडवल वाढवण्यात होते. अशा स्वरूपाच्या सांस्कृतिक भांडवलाचे असमान वाटप समाजात आढळून येते. त्यामुळे त्याच्याकडे अशा स्वरूपाचे भांडवल आहे असे व्यक्ती त्याचा फायदा घेऊ शकतात. इतरांना याचा फायदा होत नाही, हे स्पष्ट आहे. म्हणजेच ज्या व्यक्ती उच्च वर्गातील आहेत त्यांना त्याचा अप्रत्यक्षपणे फायदा होतो तर कनिष्ठ वर्गातील लोकांना त्याचा फायदा होत नाही. कारण उच्च वर्गातील व्यक्तीचे समाजिकरण उच्च संस्कृतीत होते. शिक्षण घेण्यासाठी ज्याची योग्य पार्श्वभूमी आहे अशानांच शिक्षणाचा जास्त फायदा होतो. अशाप्रकारे बोर्देऊच्या मते उच्च वर्गातील लोकांचे शिक्षणात यशस्वी होण्याचे प्रमाण कनिष्ठ वर्गातील लोकांपेक्षा जास्त आहे.

शिकवण्याच्या पद्धतीबाबत स्पष्टीकरण देताना बोर्देऊ म्हणतो की, उच्च वर्गातील मुलाची संस्कृती, वागण्याची पद्धती, राहणीमान या गोष्टीचा प्रभाव श्रेणी देणाऱ्या शिक्षकावरही पडत असतो. कारण कनिष्ठ वर्गातील मुलांना तांत्रिक गोष्टीविषयीचे ज्ञान उच्च वर्गातील मुलाएवढे नसते. उच्च वर्गातील मुले ही व्याकरण, भाषेची बोली यामध्ये सामान्यापेक्षा सरस असतात. शिक्षकसुद्धा या गोष्टीकडेच जास्त लक्ष देत असल्यामुळे त्याचा साहजिकच फायदा या उच्च वर्गातील मुलांना होतो. हा कनिष्ठ वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी उपजत अडथळा निर्माण होतो. यावर बोर्देऊ स्पष्टपणे प्रतिपादन करतो की, या सर्व बाबींमुळे शिक्षण व्यवस्थेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारण शिक्षण व्यवस्था ही कनिष्ठ स्तरावरील लोकांना उच्च शिक्षणापर्यंत न पोहचू देण्याचे कार्य करते. कनिष्ठ वर्गाची पार्श्वभूमी ही त्यांना शिक्षण व्यवस्थेपासून बाहेर

पडण्यास मदत करते. बोर्देऊ म्हणतो की शाळा ही सामाजिक समानता निर्माण करणारी महत्त्वाची व्यवस्था आहे. त्यालाच कायदेशीर रूप दिले जात आहे. म्हणजेच प्रत्यक्षात शिक्षण हे 'प्रस्थापित' समाजव्यवस्थेचे पुर्नउत्पादन करणारी व्यवस्था आहे.

- **स्वयं –अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress) :**

१. बोर्देऊच्या मते शाळेतील ज्ञान समाजातील कोणत्या वर्गाविषयी जास्त असते?

२. बोर्देऊच्या मते सांस्कृतिक भांडवल म्हणजे काय?

३. बोर्देऊच्या मते समाजातील कोणता वर्ग शिक्षणात यशस्वी होतो?

**स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check Your Progress) :**

१. बोर्देऊच्या मते शाळेतील ज्ञान समाजातील सत्ताधारी वर्गाविषयी जास्त असते.

२. सांस्कृतिक भांडवल म्हणजे सत्ताधारी वर्गाकडे असणाऱ्या संस्कृतीलाच अर्थ देण्याची व लादण्याची सत्ता होय.

३. बोर्देऊच्या मते समाजातील उच्च वर्ग शिक्षणात यशस्वी होतो.

**सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Assignment) :**

१. शिक्षणाच्या समाजशास्त्रीय सांस्कृतिक पुनरूत्पादनाचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

२. सांस्कृतिक पुनरूत्पादनाचा दृष्टिकोन कसा समाजशास्त्रीय आहे स्पष्ट करा.

३. बोर्देऊचा या शिक्षणविषयक सांस्कृतिक पुनरुत्पादनाचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

**चिंतन आणि कृती (Reflection and Action) :**

बोर्देऊच्या शिक्षण विषयक सांस्कृतिक पुनरुत्पादनाचा दृष्टिकोन समजून घेण्यासाठी उच्चशिक्षित व्यक्तीचे सामाजिक सांस्कृतिक जीवन समजून घेण्याचा प्रयत्न करा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :**


- **Bourdieu, P and Passeron J 1977 :** Reproduction in Education, Society and Culture. London. Sage Publication.
- **Young M 1961**: The Rise of Meritocracy. Harmondsworth. Penguin Books.
- **Harlembous M with Heald R.M 1980:** SOCIOLOGY, Themes and Perspectives.Londen. Oxford University, Press.

# स्त्रीवादी दृष्टिकोन

शिक्षणाविषयीचा कार्यवादी, संघर्षवादी किंवा जहालवादी आणि सांस्कृतिक पुनरुत्पादन हे तीन दृष्टिकोन अभ्यासल्यानंतर आता आपण आणखी एक महत्त्वाचा दृष्टिकोन अभ्यासणार आहोत व तो म्हणजे स्त्रीवादी दृष्टिकोन होय.

स्त्रीवादी दृष्टिकोन हा अलीकडील काळातील एक महत्त्वाचा दृष्टिकोन मानला जातो. आजपर्यंत मानवाचा जो इतिहास लिहिला गेला तो पुरुषानी लिहिला असून तो पुरुषाच्या दृष्टिकोनातून किंवा पुरुषाला प्रधान मानून लिहिलेला आहे. आणि स्त्रियांची पूर्णपणे उपेक्षा केलेली आहे. म्हणून मानवी इतिहासाचे आपले ज्ञान हे एकांगी आहे. इतिहासाचे सम्यक व यथार्थ आकलन होण्यासाठी स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून स्त्रियांच्या दृष्टिकोनातून इतिहासचे पुनर्लेखन आवश्यक आहे, अशी भूमिका मांडणारी एक विचारधारा उदयास आली. या विचारधारेला स्थूलमानाने स्त्रीवाद असे म्हणतात. स्त्रीवादी दृष्टिकोन किंवा विचारधारा ही पाश्चात्य समाजात उदयास आली असून १९६० नंतर ती जागतिक स्तरावर लोकप्रिय होण्यास सुरूवात झाली.

स्त्रीवादी दृष्टिकोनातून मानवी जीवनाच्या विविध अंगांचा पुनर्विचार व पुनर्लेखन केले जाऊ लागले आहे. शिक्षण हे ही मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग असल्याने स्त्रीवादी दृष्टिकोनाचा प्रभाव शिक्षणावर देखील पडलेला आहे. या ठिकाणी आपण स्त्रीवादी दृष्टीकोनातून शिक्षणाचा विचार करणार आहेत. त्यासाठी प्रथम स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप थोडक्यात समजून घेऊ.

- **स्त्रीवादाचा अर्थ :**

Feminism या इंग्रजी शब्दास मराठीत स्त्रीवाद म्हणतात. Feminism हा शब्द लॅटीन भाषेतील Femina या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ woman असा आहे. त्यामुळे women किंवा स्त्रिया यांच्या दृष्टिकोनातून एखाद्या गोष्टीचा विचार करणे याला उद्देशून १७ व्या शतकाच्या अखेरीस womanism हा शब्द रूढ झाला. Womanism हा शब्द लैंगिक समानतेचा सिद्धांत व स्त्रियांची हक्काची चळवळ या अर्थाने वापरला जाऊ लागला. पुढे १९८० च्या दशकात womanism ऐवजी feminism हा शब्द रुढ झाला. एलिस रॉसी (Alice Rossi) या विदुषीने २७ एप्रिल १८९५ रोजी The Anthenaeum या नियतकालीकातील एका लेखात Feminism हा शब्द सर्वप्रथम वापरला.

''लिंगभेद न मानता स्त्रीपुरुष समतेवर विश्वास ठेवणारा वाद किंवा विचारसरणी म्हणजे स्त्रीवाद'' असा अर्थ सुरवातीस घेतला गेला. आज स्त्रीवाद हा शब्द स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार करणारी एक विचारसरणी आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळवून देण्यासाठी केली जाणारी चळवळ म्हणजेच स्त्रीमुक्तीची चळवळ या अर्थाने वापरला जातो -

**स्त्रीवादाच्या व्याख्या -**

'स्त्रीवाद म्हणजे काय हे समजण्यासाठी स्त्रीवादाच्या कांही व्याख्या विचारात घेऊ

**१) जॅकी स्टेसी** (Jackie Stacey) यांनी Introducing Women studies मध्ये ''अनटॅगलींग फेमिनिस्ट थिअरी'' नावाचा लेख लिहिला. त्यात त्या म्हणतात, विशेष अनुभवांचे विश्लेषण करून स्त्रियांचे दुय्यमत्व समजावून घेऊन ते बदलण्याची दिशा दाखविणारे लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देऊन त्याला राजकीयदृष्ट्या संक्रमीत करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी या विषयी मार्ग सुचविणे

जीवनाच्या सर्व क्षेत्रात होणारे स्त्रियांचे शोषण व दुय्यमत्व नष्ट करणे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद ही एक विद्याशाखा आहे.

**२) रुथ ब्रँडवीन** (Ruth Brandwin) एक परिप्रेक्ष्य वैचारिक रचना व मूल्यधारीत अशी श्रद्धेची व्यवस्था असणारा जगाकडे पाहण्याचा पर्यायी दृष्टिकोन म्हणजे स्त्रीवाद होय.

आजपर्यंतचा इतिहास हा पुरुषांनी पुरुषांना केंद्रस्थानी ठेवून लिहिला. आता स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून इतिहासाचे पुनर्लेखन करणे हा एक स्त्रीवादी लेखनाचा नवीन पर्यायी दृष्टिकोन आहे.

**३) लिंडा गार्डन** (Linda Gardon) स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय.

**४) इमेल्ड व्हेलहन :** स्त्रीवाद हा अनेक स्तरावरील ज्ञानसमुच्चय आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रातील स्त्रियाविषयीची असमानता व पिळवणूक नष्ट करणे हा त्याचा उद्देश आहे.

- **स्त्रीवादाचा विकास :**

स्त्रीवादाचा अर्थ व व्याख्या पाहिल्यानंतर स्त्रीवादाचा विकास थोडक्यात समजावून घेऊ.

मेरी वुलस्टोन क्राप्ट या फ्रेंच स्त्रीने १९७२ मध्ये (Vendication of rights for women) (स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन) हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये तिने फ्रेंच राजक्रांतीचे विश्लेषण केले, तिच्या मते फ्रेंच राज्यक्रांतीने दिलेले स्वातंत्र्य, समता, बंधुत्व हे हक्क केवळ पुरुषासाठी होते, त्यामुळे हे हक्क स्त्रियांनाही मिळाले पाहिजेत अशी मागणी तिने केली. तिने आर्थिक संपन्नतेचा स्त्रियांवर नकारात्मक परिणाम होतो असे दाखवून दिले. पतीच्या श्रीमंतीमुळे स्त्रीला सुख मिळते. मात्र स्त्री आपले हक्क, स्वातंत्र्य नीतीमत्ता व आरोग्य गमावून बसते. स्त्री ही देखील मानवच आहे. मानव म्हणून तिला स्वत:चा विकास करण्यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात समान हक्क मिळाले पाहिजेत अशी माणगी केली. इंग्लंडमधील थोर तत्वज्ञ J. S. Mill यांनी १८६९ मध्ये (The Subjection of women) (स्त्रियांची पराधिनता) हा ग्रंथ लिहून स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच सर्व शैक्षणिक कायदेशीर, राजकीय, आर्थिक, प्रशासकीय हक्क मिळाले पाहिजेत अशी भूमिका मांडली. यातून इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतदानाचा, निवडणूक लढविण्याचा अधिकार मिळावा म्हणून चळवळ सुरू झाली, ही चळवळ पुढे अमेरिकेतही पसरली. सर्वच मानव समाजात लिंगाच्या आधारे भेदभाव होतो. जीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरुषांनी स्त्रियांवर वर्चस्व मिळवून पुरुष प्रधान व्यवस्था निर्माण केली व स्त्रियांच्या तुलनेत गौण किंवा दुय्यम स्थान दिले. स्त्री ही पुरुषावलंबी बनली. पुरुषांनी स्त्रियांवर बंधने लादून त्यांना जणू आपल्या गुलामगिरीत ठेवले. या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी अमेरिकन स्त्रियांनी संघटीतपणे चळवळ केली यालाच स्थूलमानाने स्त्रीमुक्ती चळवळ असे म्हटले गेले. या चळवळीद्वारे स्त्रियांनी राजकीय सत्तेवर दबाव आणणे सुरू केले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील पारतंत्र्यात असलेले अनेक देश स्वतंत्र झाले. त्या देशातही स्त्रीमुक्तीची चळवळ सुरू झाली. परिणामी स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच सर्व हक्क देण्याची घटनात्मक व कायदेशीर तरतूद करण्यात आली. अशा प्रकारे स्त्रीवाद ही एक केवळ विचारसरणी न रहाता एक चळवळ व राजकीय बांधीलकी बनलेली आहे.

- **स्त्रीवादाचा शिक्षणविषयक दृष्टिकोन :**

स्त्रीवाद ही एक विचारसरणी किंवा दृष्टिकोन असला तरी त्यामध्ये वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आहेत. उदा. उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी किंवा समाजवादी स्त्रीवाद, जहालवादी स्त्रीवाद, उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद इत्यादी या सर्व प्रवाहांची उद्दिष्टे व कार्यप्रणाली भिन्न भिन्न आहे. तथापि, त्या सर्वामध्ये स्त्री मुक्ती हा समान धागा आहे. स्त्रीवादी दृष्टिकोन मानवी जीवनाच्या विविध अंगांचे एका वेगळ्या पद्धतीने म्हणजेच स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून विश्लेषण व स्पष्टीकरण करतो. या ठिकाणी आपण स्त्रीवादाच्या पुरस्कर्त्यांचा शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन समजावून घेणार आहोत. या संदर्भात पुढील मुद्दे मांडता येतात.

१) स्त्रीवाद्यांच्या मते ज्ञानाची निर्मिती केवळ पुरुषच करतो हे खरे नाही. मानवी जीवनाच्या विविध अंगांचे ज्ञान व माहिती मिळविण्यामध्ये स्त्रियांचे योगदान मोठे आहे. तथापी, पुरुषप्रधान संस्थेत स्त्रियांच्या ज्ञाननिर्मिती व ज्ञानसंपादन या कार्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. मानवी ज्ञानाच्या निर्मितीत स्त्रियांचा असलेला वाटा जगासमोर आला पाहिजे असा आग्रह स्त्रीवाद्यांचा आहे.

२) पुरुषप्रधान व्यवस्थेत कामाचे विभाजन हे लिंगभेदावर केले गेले. त्यानुसार अध्ययन, अध्यापन हे कार्य बहुसंख्य मानव समाजात पुरुषांचेच मानले व अनेक समाजात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला गेला. उदा. भारतीय समाजात प्राचीन काळापासून मनुस्मृती सारख्या ग्रंथाच्या आधारे स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला. स्त्रियांनी पुरुषावलंबी राहून जीवन जगावे, त्यामुळे त्यांना शिक्षण घेण्याची गरज नाही असा मतप्रवाह जोपासला गेला. परिणामी स्त्रिया केवळ शैक्षणिकदृष्ट्याच नव्हे तर सर्वच बाबतीत मागासलेल्या राहिल्या.

३) कांही समाजात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार दिला. तथापि त्यांचे शिक्षणाचे क्षेत्र अत्यंत मर्यादित ठेवले. स्त्रियांनी केवळ घरकाम बालसंगोपन यांचेच शिक्षण घ्यावे, फार फार तर त्यांच्या जोडीला गायन, नृत्य, शिवणकाम इ. शिक्षण घ्यावे. यावर भर दिला गेला. मेरी क्राफ्ट यांनी त्यामुळेच रुसोच्या Philosophy of Education या ग्रंथावर कठोर टिका केली आहे. कारण रुसोने या ग्रंथात विवेकाधिष्ठीत शिक्षण हे पुरुषांना द्यावे आणि कला, काव्य, शृंगार यांचे शिक्षण स्त्रियांना द्यावे असा भेदभाव केलेला आहे. म्हणून क्राफ्ट यांनी सहशिक्षणाचा पुरस्कार करून स्त्री व पुरुष दोघांनाही समान शिक्षण दिले पाहिजे असे मत मांडले आहे.

४) स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे असे स्त्रीवादाचे पुरस्कर्ते म्हणतात. या संदर्भात J. S. Mill म्हणतात की, स्त्रियांची पराधीनता नष्ट करण्यासाठी तिला स्वावलंबी बनविले पाहिजे व त्यासाठी तिला सर्व प्रकारचे शिक्षण घेण्याचा हक्क दिला पाहिजे.

५) दिर्घकाळ स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने त्या मागासलेल्या राहिल्या आहेत. त्यांचे मागासलेपण दूर करण्यासाठी त्यांना केवळ पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क देणे पुरेसे नाही तर कांही विशेषाधिकार व सवलती दिल्या पाहिजेत असेही कांही विचारवंत म्हणतात. यामध्ये स्त्रीवादी विचारवंतांचा भरणा अधिक आहे. यातूनच अनेक देशात स्त्रियांना शिक्षण विषयक सोयीसवलती दिल्या जाऊ लागल्या

आहेत. भारतासारख्या देशात स्त्रियांना शिक्षणसंस्थांमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रासारख्या कांही राज्यात इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत केले आहे. अनेक विद्यापीठामध्ये स्त्री अभ्यासकेंद्रे निर्माण झाली आहेत. जपान, भारत या देशात स्वतंत्र महिला विद्यापीठे स्थापन झालेली आहेत.

६) जहालवादी दृष्टीकोनुसार स्त्रियांनी वंशसातत्य किंवा प्रजोत्पादन, वैवाहिक व कौटुंबिक बंधने झुगारून देऊन आपल्या व्यक्तिमत्त्वांचा विकास करण्यासाठी अधिकाधिक शैक्षणिक प्रगती करावी असे आवाहन केले जाते. कांही उदारमतवादी स्त्रीवाद्यांना मात्र हा जहाल दृष्टीकोन मान्य नाही. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे, अर्थाजन करावे, त्याचबरोबर कौटुंबिक व वैवाहिक कर्तव्ये पार पाडावीत असे सुचविले जाते. मात्र कौटुंबिक, वैवाहिक जीवनात पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क स्त्रीला मिळावेत ही मूळ भूमिका उदारमतवादी कायम ठेवतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) फेमिनिझम ही संज्ञा सर्वप्रथम कोणी वापरली?

२) स्त्रीवादाचा अर्थ स्पष्ट करा.

३) सब्जेक्शन ऑफ वुमेन हा ग्रंथ कोणी लिहिला?

४) मेरी क्राफ्ट यांनी रुसोच्या कोणत्या ग्रंथावर टीका केली आहे?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) एलिस रॉसी यांनी फेमिनिझम ही संज्ञा सर्वप्रथम वापरली.

२) स्त्रियांचे दुय्यमत्त्व व त्यासाठी करावा लागणारा संघर्ष म्हणजे स्त्रीवाद होय.

३) जे. एस. मिल्ल यांनी सब्जेक्शन ऑफ वुमेन हा ग्रंथ लिहिला.

४) मेरी क्रॉप्ट यांनी रुसोच्या Philosophy of Education या ग्रंथावर टीका केली.

**स्वाध्याय**

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) स्त्रीवादाचा अर्थ, व्यख्या व विकास स्पष्ट करा.

२) स्त्रीवादाचा शिक्षणविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

❊ ❊ ❊

**घटक : ३**

# शिक्षण आणि समाज

## (Education and Society)

**घटक –संरचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय-विवेचन

३.२.१ शिक्षण आणि समाजीकरण

३.२.१.१ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न.

३.२.२ शिक्षण आणि सामाजिक स्तरीकरण

३.२.२.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.२.३ शिक्षण आणि आधुनिकीकरण

३.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.४ शिक्षण सामाजिक गतिशीलता आणि सामाजिक परिवर्तन

३.२.४.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**३.० उद्दिष्टे (Objectives) :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

- समाजीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाची भूमिका कशी असते हे समजून येईल.
- शिक्षणामुळे समाजाच्या स्तररचनेत कसा बदल होतो याचे आकलन होईल.

- शिक्षणामुळे समाजाच्या आधुनिकीकरणाला कशी चालना मिळते हे स्पष्ट होईल.
- सामाजिक गतिशिलता आणि सामाजिक परिवर्तन या प्रक्रियावर शिक्षणाचा प्रभाव कसा असतो हे समजून घेता येईल.

### ३.१ प्रस्तावना (Introduction) :

शिक्षण-समाज आंतरसंबंध या तिसऱ्या प्रकरणात आपण शिक्षण आणि समाजाच्या परस्परसंबंधाचा व परस्पर प्रभावाचा अभ्यास करणार आहोत. शिक्षणाचा समजातल्या इतर व्यवस्थाबरोबरचा संबंध कसा असतो याची चर्चा या प्रकरणात होईल.

प्रस्तुत प्रकरणाची विभागणी चार घटकामध्ये करण्यात आली आहे. पहिल्या घटकामध्ये शिक्षण आणि समाजीकरण यांचा सबंध समजून घेणार आहेत. कुटुंबापासून प्रसारमाध्यमापर्यंत समाजीकरणाची अनेक माध्यमे असली तरी शिक्षण हे सर्वात चांगले माध्यम कसे आहे हे आपणास समजून येईल. दुसऱ्या घटकामध्ये भारतीय समाजाच्या पारंपारिक स्तररचनेवर शिक्षणाचा कसा प्रभाव पडतो हे समजून घेणार आहोत. तिसऱ्या घटकामध्ये शिक्षणामुळे समाजाचे आधुनिकीकरण कसे घडून येते हे समजून घेणार आहोत. तर चौथ्या घटकामध्ये शिक्षण व सामाजिक गतिशीलता आणि शिक्षण व सामाजिक परिवर्तन या बाबतची माहिती घेणार आहोत. भारतासारख्या एकेकाळी धर्म व जातीचा प्रभाव असणाऱ्या समाजात शिक्षणामुळे गतिशीलता कशी निर्माण झाली. तसेच कोणत्याही समाजाच्या परिवर्तनामध्ये अनेक घटकांचा प्रभाव असला तरी सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून शिक्षणाची भूमिका कशी असते हे समजून घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject-matter):

शिक्षण समाज आंतरसंबंध याबाबतचा अभ्यास करताना समाजातील विविध प्रक्रिया आणि व्यवस्थाबरोबरचा शिक्षणाचा संबंध कसा असतो याचे विवेचन केले आहे. त्यात समाजीकरण, सामाजिक स्तरीकरण, आधुनिकीकरण सामाजिक गतिशीलता व सामाजिक परिवर्तन या संदर्भात शिक्षणाच्या भूमिकेचे स्पष्टीकरण केले आहे.

**३.२.१ शिक्षण आणि समाजीकरण** (Education and Socialization) :

शिक्षणाच्या समाजशास्त्रात शिक्षण व समाजीकरण यातील आंतरसंबंधाच्या अभ्यासाला महत्त्व दिले आहे. शिक्षण म्हणजे समाजीकरण आणि समाजीकरण म्हणजे व्यक्तीला सामाजिक प्राणी बनविण्याची प्रक्रिया होय. समाजात सहभागी होण्याची क्षमता व्यक्तिला कशी प्राप्त होते आणि आपले स्थैर्य कायम ठेवून समाजव्यवस्थेचे कार्य सुरळीतपणे चालू राहण्यासाठी समाज आपल्या सदस्यांना विशिष्ट पद्धतीची वर्तणूक करण्यासाठी कशी प्रेरणा देतो या दोन बाबी समाजीकरणाच्या अभ्यासातून स्पष्ट होतात. या प्रक्रियेत व्यक्तिला ज्या समाजात आपले जीवन जगावयाचे असते त्या समाजाचा परिचय होतो. व्यक्तिच्या 'स्व' कल्पनेचा विकास होतो आणि तिचे व्यक्तिमत्त्व घडते. या प्रक्रियेत व्यक्ति आपली संस्कृती आत्मसात

करते. समाजाचे सातत्य आणि स्थैर्य, व्यक्तिच्या वर्तनावरील नियंत्रण, संस्कृतीचे संक्रमण या सर्व गोष्टी समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळे शक्य होतात.

- **समाजीकरणाच्या व्याख्या :**

समाजीकरणाचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी काही व्याख्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१) हॅरी जॉन्सन :** 'सामाजिक भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य शिकणाऱ्याला प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे समाजीकरण होय.'

(Socialization is learning that enables the learner to perform social roles, culture is what is learnt in socialization – Harry Johnson.)

**२) गस्किन व गस्किन** यांच्या मते ज्या प्रक्रियेद्वारा व्यक्ति सामाजिक वर्तनप्रकार, मूल्ये व इतरांच्या अपेक्षा आत्मसात करते व समाजातील आपल्या विशिष्ट भूमिका पार पाडण्यास समर्थ बनते त्या प्रक्रियेस समाजीकरण म्हणतात.

(Socialization is process by which an individual learns the behaviours values and expectations of others that enables him to take on particular roles in society.- Guskin and Guskin.)

**३) चंद्रकांत खंडागळे :** ज्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती आपल्या समाजाच्या श्रद्धा, मूल्ये, नियमने, वर्तनप्रकार इत्यादी आत्मसात करून समाजाचा क्रियाशील सदस्य बनते त्या प्रक्रियेस समाजीकरण म्हणतात.

वरील व्याख्यावरून असे म्हणता येईल की, मानवी मूल जन्माला येते तेव्हा अनुवंशिकतेने लाभलेली जैविक वैशिष्ट्ये त्याच्याजवळ असतात. मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होण्यासाठी त्याच्यावर संस्कार होणे आवश्यक असते. ही जी मानसिक सामाजिक प्रक्रिया आहे तिला समाजीकरण म्हणतात.

- **समाजीकरणाची उद्दिष्टे :**

ब्रुम व सेल्झनिक यांनी समाजीकरणाची चार उद्दिष्टे सांगितली आहेत.

**१) शिस्तीचे संस्कार करणे :** शिस्त म्हणजे स्वयंनियंत्रण होय. समाजाच्या अपेक्षानुसार स्वत:च्या वर्तनावर नियंत्रण ठेवून वागणे म्हणजे शिस्तबद्ध वर्तन होय. समाजीकरणात शिस्तीच्या नियमांचे आंतरीकरण केले जाते. विविध सामाजिक मूल्यांचे शिक्षण दिल्यामुळे व्यक्तिला जी शिस्त लागते. ती व्यक्तिच्या वैवाहीक, व्यवसायिक व जीवनाच्या इतर क्षेत्रातही उपयुक्त ठरते.

**२) आकांक्षा रुजविणे :** व्यक्तिच्या मनात प्रामाणिकपणा, सदवर्तन, नितीमत्ता ही मूल्ये रूजवली जातात. वेगवेगळ्या आकांक्षा व्यक्तीच्या मनात निर्माण केल्या जातात.

**३) सामाजिक भूमिकांचे शिक्षण :** समूहात व्यक्ति ज्या स्थानावर असते त्या स्थानाशी सुसंगत अशा भूमिका व्यक्तिला पार पाडाव्या लागतात. समाजीकरणाद्वारे विविध भूमिका व्यक्तिंना शिकवून

विशिष्ट कार्यासाठी तयार केले जाते.

**४) कौशल्ये शिकविणे :** समाजाचा सभासद म्हणून जीवन जगण्यासाठी आवश्यक कौशल्ये व्यक्तिला शिकविली जातात. तसेच कांही व्यावसायिक कौशल्ये देखील शिकविली जातात.

वरील उद्दिष्ट्ये साध्य झाल्यामुळेच संस्कृतीचे संक्रमण, समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि समाजाचा क्रियाशील सदस्य होण्याची पात्रता ही सर्व व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या कार्याची पूर्तता होते.

- **समाजीकरणाची साधने** Agencies of Socialization) **:**

व्यक्तिचे बालपण, तारूण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व या वयाच्या सर्व अवस्थामध्ये समाजीकरणाची प्रक्रिया निरंतर सुरूच असते. कुटुंब, नातेवाईक, शेजारी, शाळा, जनसंपर्क माद्यमे आणि शासन अशी समाजीकरणाची अनेक माध्यमे आहेत. आधुनिक काळात शिक्षण हे समाजीकरणाचे महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षण आणि समाजीकरण यांचा आंतरसंबंध अगदी निकटचा व परस्परावलंबी आहे.

- **शिक्षण व समाजीकरण** (Education and Socialization) **:**

प्रत्येक समाज आपल्या सदस्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करीत असतो. अनेक माध्यमातून व्यक्तिला शिक्षण मिळते. कुटुंब, नातेवाईक, शेजारी, समवयस्क यांच्याकडून मिळणारे शिक्षण अनौपचारिक स्वरूपाचे असते. मात्र व्यक्तिच्या परिपूर्ण समाजीकरणासाठी औपचारिक शिक्षणाची गरज असते. म्हणूनच डुरखाईमने असे म्हटले आहे की, समाजीकरण हे शाळेचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षणातूनच नव्या पिढीचे पद्धतशीर समाजीकरण होते. पद्धतशीर समाजीकरण हा शब्दच शाळेबाहेरच्या म्हणजे कुटुंबासारख्या माध्यमातून होणारे समाजीकरण आणि शाळेत होणारे समाजीकरण यातील फरक दशवितो.

आधुनिक समाजशास्त्रीय दृष्टिकोनानुसार केवळ व्यक्तीच्या वैयक्तिक गरजेतून शिक्षणाची निर्मिती झाली असे नाही. तर व्यक्ति ज्या समाजाची सदस्य असते त्या समाजाच्या गरजेतून निर्माण झाली आहे. काळाच्या ओघात समाजातील वयोवृद्ध सदस्य हे जग सोडून जातात, पण समाजाचे अस्तित्त्व कायम रहाते. कारण समाजात नव्याने जन्माला आलेले सदस्य त्यांची जागा घेतात. या नव्या पिढीचे समाजातील प्रचलित नियमने, मूल्ये व संस्कृतीनुसार समाजीकरण करावे लागते. समाजाचे स्थैर्य आणि सातत्य यासाठी नव्या पिढीकडे समाजाच्या सांस्कृतीक वारशाचे संक्रमण करणे आवश्यक असते. या सामाजिक गरजेतूनच संकीर्ण समाजात औपचारिक शिक्षण व्यवस्थेचा उदय होतो. लहान आकाराच्या साध्या समाजाचा सांस्कृतिक वारसा साधा व मर्यादित असतो. त्यामुळे पालक आणि कुटुंबातील जेष्ठ सदस्यांकडून त्याचे हस्तांतर नवीन पिढीकडे अनौपचारीक पद्धतीने होऊ शकते. मात्र विशाल आकाराच्या संकीर्ण समाजाचा सांस्कृतीक वारसा म्हणजे नियमने, मूल्ये, कौशल्ये व तंत्रज्ञान या सर्वच बाबी तितक्याच संकीर्ण स्वरूपाच्या असतात आणि कुटुंबासारख्या एखाद्या संस्थेकडून त्याचे हस्तांतर होणे शक्य नसते. त्यामुळे विशेषीत स्वरूपाच्या औपचारिक शिक्षणसंस्था निर्माण करून सांस्कृतीक वारशाचे हस्तांतर करावे लागते. म्हणजेच

समाजाच्या गरजेतून शिक्षण व्यवस्थेचा उदय होतो.

शिक्षण हे शिक्षकाकडून दिले जाते आणि विद्यार्थी ते ग्रहण करतात. मात्र बारकाईने त्याचे परिक्षण केल्यानंतर असे दिसून येते की, अध्यापन आणि अध्ययन ही स्वतंत्र व व्यक्तिगत अशी एकाकी प्रक्रिया नाही तर ती शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियात्मक प्रक्रिया आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या एकमेकाबद्दल कांही अपेक्षा असतात. अशा परस्पर अपेक्षातून त्यांच्या वर्तनाला आकार मिळतो. इतर व्यक्तिबरोबरच्या आंतरक्रियेतूनच विद्यार्थी अनेक गोष्टी शिकतात अशा प्रकारे शिक्षण ही एकेरी प्रक्रिया नाही तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परस्पर आंतरक्रियेतून निर्माण होणारी सामाजिक प्रक्रिया आहे.

शिक्षणाच्या कार्याचा अभ्यास करताना असे दिसून येते की, समाजीकरण आणि भूमिकांची निवड, स्विकृती ही शिक्षणाची कार्ये प्रामुख्याने सामाजिक आहेत.

- **समाजीकरण :**

समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे नवीन पिढीकडे हस्तांतर करण्याचे काम करून शिक्षण समाजीकरणाचे कार्य करीत असते. प्रत्येक समाज आपल्या सदस्यानी जी मूल्ये, नियमने श्रद्धा, दृष्टिकाने, वर्तणूक, ज्ञान, तांत्रिक व सामाजिक कौशल्ये आत्मसात करावीत अशी अपेक्षा करतो त्याचे हस्तांतर शिक्षण करते. विद्यार्थी त्यांच्या अभ्यासक्रमातून आणि विविध शालेय उपक्रमातून जे जे कांही शिकतात ते सर्व समाजाच्या सांस्कृतीक वारशाचे भाग असतात म्हणजेच शाळेत शिक्षक जे शिकवितात आणि विद्यार्थी जे शिकतात ते सर्वसाधारणपणे सामाजिक स्वरूपाचे असते.

विकसनशील बदलत्या समाजामध्ये शिक्षण नवीन पिढीचे समाजीकरण करून त्यांचे असे नियंत्रण करते की, त्यामुळे समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात होणाऱ्या बदलाशी समायोजन करण्याची त्या पिढीची पूर्वतयारी होते. मात्र असे समायोजन व्यक्तिगत इच्छेनुसार होत नाही. तर समाजासाठी जे बदल आवश्यक असतात त्यासाठीचे ते समायोजन असते.

शिक्षण नवीन पिढीच्या सदस्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणते. मात्र शिक्षण तेथे व्यक्तिगत इच्छा आकांक्षांचा विचार न करता समाजाच्या अपेक्षांचा विचार करून त्या दृष्टीने नवीन पिढीचे समाजीकरण घडवून आणते.

- **भुमिकांची निवड व स्वीकृती :**

विशाल आकाराच्या संकीर्ण समाजात समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक व्यवसाय आणि पदे निर्माण करावी लागतात. अशा व्यवसायात पदार्पण करू इच्छिणाऱ्या व्यक्तिंना विशेष शिक्षणाची आवश्यकता असते. काही सामान्य पदे आणि व्यवसाय यासाठी जुजबी शिक्षण पुरेसे ठरते. मात्र उच्च दर्जाचे विशेषीकरण झालेले व्यवसाय आणि पदासाठी तितक्याच उच्च दर्जाच्या विशेषीत ज्ञानाची, कौशल्यांची, शिक्षणाची व प्रशिक्षणाची गरज असते. त्यांच्या सहाय्यानेच समाजातल्या विविध संस्थांचे कामकाज कार्यक्षमतेने चालते. ज्यांनी आवश्यक असे शिक्षण व प्रशिक्षण घेतले आहे अशा व्यक्तिंची त्या त्या पदावर निवड केल्यामुळेच ते शक्य होते. अशाप्रकारे शिक्षण, प्रशिक्षण आणि विविध पदावर व्यक्तिंची निवड होण्यासाठी पूर्वतयारी

शिक्षणातूनच होत असते. विविध पातळीवर परीक्षा व मूल्यमापन पद्धतीच्या सहाय्याने शिक्षण व्यक्तिंची विशेष पदावर काम करण्याची पात्रता निश्चित करते. त्यांना तसे प्रमाणपत्रही दिले जाते. शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता यांच्या आधारावरच लोकांना समाजाच्या विविध क्षेत्रातील निरनिराळ्या पदावर काम करण्याची संधी मिळते.

ज्ञानदान व कौशल्य निर्मिती ही शाळेची मूलभूत कार्ये आहेत. भाषा, विज्ञान, गणित, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, आरोग्यशास्त्र इ. विविध विषयातील ज्ञान व कौशल्य संपादन करून त्याचा व्यवहारात उपयोग करण्यास विद्यार्थी शिकतात. कुशलतेने व्यवहार करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण होते. अशा तऱ्हेने शिक्षण-समाजीकरणास सहाय्य करते.

**३.२.१.१ स्वयंअध्यनासाठीचे प्रश्न (Check your progress)**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या प्रक्रियेत व्यक्ती आपली संस्कृती आत्मासत करते?

२) व्यक्तीच्या परिपूर्ण समाजीकरणासाठी कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता असते?

३) शाळेची मूलभूत कार्ये कोणती आहेत?

४) समाजीकरण हे शाळेचे महत्त्वाचे कार्य आहे असे कोणी म्हटले आहे?

**३.२.२ शिक्षण व सामाजिक स्तरीकरण (Education and Social Stratification) :**

समाज हा विविध समूहांच्या श्रेणी रचनेवर संघटीत झालेला असतो. कोणत्याही समाजातील सर्व व्यक्ती व समूह एकाच समान पातळीवर असत नाहीत. कोणत्या ना कोणत्या स्वरुपाची विषमता सर्व समाजात दिसून येते. समाजात सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे वाटप विषम पद्धतीने झालेले असते. त्यातून समाजात वेगवेगळा दर्जा असणारे स्तर निर्माण होतात. त्यांची श्रेष्ठ कनिष्ठ अशी रचना होते. समाजातील एखादा स्तर सर्वांपेक्षा श्रेष्ठ, दुसरा त्याहून कमी तर तिसरा फारच कमी अशी अनेक स्तरात समाजाची विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. समाजात आर्थिक निकषावरून श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब अशीही विभागणी असते. थोडक्यात समाजातील विविध स्तरांची दर्जाच्या आधारे झालेली उतरंडीसारखी रचना म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय.

सामाजिक स्तरीकरण या संकल्पनेचा अर्थ व स्वरूप समजून घेण्यासाठी त्याबाबत समाजशास्त्रज्ञानी केलेल्या काही व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

**१) एलि चिनॉय :** श्रेष्ठ आणि कनिष्ठ, श्रीमंत आणि गरीब, सत्ताधारी आणि सत्ताविहीन यांच्यातील तफावत किंवा भेद हा सामाजिक स्तरीकरणाचा गाभा आहे.

Contrasts between higher and lower, rich and poor, powerful and powerless constitute the substance of social stratification - Fly Chiony.

**२) यंग आणि मॅक :** बहुतांश समाजामध्ये लोक एकमेकांचे काही श्रेणीमध्ये वर्गीकरण करतात आणि तयार झालेल्या श्रेणीची उच्चपासून निम्न पर्यंत क्रमवारी ठरविली जाते. या वर्गीकरणाच्या प्रक्रियेला सामाजिक स्तरीकरण म्हणतात. क्रमवारी ठरविलेल्या वर्गांना स्तरीकरण संरचना म्हणतात.

In most societies people classify one another in to categories and rank these categories from higher to lower. The process of defining such catetories is called social stratification and the resulting set in ranked categories in called stratification structure. The categories are called Strata, Popularly known as classes. - Young and Mack.

**३) चंद्रकांत खंडागळे :** ''समाजाच्या सदस्यांची श्रेष्ठ कनिष्ठ स्तरात केलेली विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय.''

वरील व्याख्यावरून सामाजिक स्तरीकरणाबाबतचे कांही मुद्दे सांगता येतात ते असे की, विषमता हा स्तरीकरणाचा प्रमुख आधार असतो. विविध सामाजिक स्थाने आणि भूमिकांचे कांही समाजमान्य निकषांच्या आधारे मूल्यमापन केले जाते. त्यानुसार दर्जा व पारितोषिकांचे वितरण होते. त्यानुसार विविध दर्जाचे अनेक स्तर अस्तित्त्वात येतात. विषमतेवर आधारीत अशी ही व्यवस्था त्या त्या समाजाच्या रचनेचा भाग बनते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे या व्यवस्थेचे संक्रमण होते.

- **सामाजिक स्तरीकरणाची परिमाणे** (Dimensions of Social Stratification) :

सुप्रसिद्ध जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्सवेबर यांनी वर्ग, पक्ष आणि दर्जासमूह ही तीन परिमाणे सांगितली आहेत. ती संपत्ती, सत्ता व प्रतिष्ठा या घटकांशी संबंधीत आहेत. समाजातील सर्वांनाच हे घटक हवेसे वाटतात पण त्यांचे विषम वितरण हा स्तरीकरणाचा आधार असतो. त्याबातचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे–

**१) मिळकत व संपत्ती** (Income and welath) : लोकाना कामाबद्दल मिळणारा मोबदला किंवा वेतन म्हणजे मिळकत होय. तर ज्याचे पैशामध्ये रुपांतर होऊ शकते अशा मौल्यवान गोष्टी म्हणजे संपत्ती होय. व्यक्तीचा सामाजिक वर्ग संपत्तीवरून ठरतो. वेबरच्या मते समान आर्थिक दर्जा असणाऱ्यांचा एक वर्ग बनतो. त्यातून उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि कनिष्ठ वर्ग असे आर्थिक दर्जावरून स्तर निर्माण होतात. कार्लमार्क्सच्या मते आर्थिक दर्जावरून स्तर निर्माण होतात. समाजात बूर्ज्वा म्हणजे भांडवलदार आणि प्रॉलेटेरियर म्हणजे कामगार किंवा श्रमिक असे दोन प्रमुख वर्ग असतात. त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी असल्यामुळे त्यांच्यात वर्गसंघर्ष अटळ आहे असे त्यांचे मत होते. आर्थिक घटक हा वर्गाचा एक प्रमुख निकष असला तरी तो एकमेव नाही. भारतासारख्या देशात धर्म, जात, वंश या बाबीसुद्धा त्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. मात्र कार्लमार्क्सने स्तरीकरणाच्या दृष्टीने संपत्ती हा महत्त्वाचा घटक मानला होता.

**२) सत्ता** (Power) : मॅक्सवेबर यांच्या मते इतरांचा प्रतिकार किंवा विरोध असतानाही आपल्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी घडवून आणण्याची व्यक्ति किंवा व्यक्तिच्या समूहांची क्षमता म्हणजे सत्ता होय. शासकीय अधिकारी, राजकारणी, उद्योगपती, व्यापारी, जमीनदार यांच्या हातात सत्ता केंद्रीत झालेली

असते. सत्तेचे वाटप सुद्धा समान पद्धतीने होत नाही. त्यामुळे सत्ताधारी व सत्ताविहीन असे स्तर निर्माण होतात.

**३) प्रतिष्ठा** (Prestige) : एखाद्या व्यक्तिला किंवा समूहाला समाजातील इतर सदस्यांकडून जी समाजमान्यता, मानसन्मान किंवा आदर मिळतो त्याला प्रतिष्ठा म्हणतात. प्रत्येक समाजात प्रतिष्ठेचे निकष वेगवेगळे असू शकतात. सरंजामदारी पद्धतीत राजघराण्यातील व्यक्तिंना अधिक प्रतिष्ठा मिळते. भारतात पूर्वी धार्मिक कार्ये करणाऱ्यांना प्रतिष्ठा मिळत होती. व्यक्तिचा व्यवसाय आणि प्रतिष्ठा यांचा परस्परसंबंध असतो. शास्त्रज्ञ, अभियंते, प्राध्यापक, डॉक्टर्स यांना जेवढी प्रतिष्ठा मिळते तेवढी इतर व्यवसायातील लोकांना मिळत नाही. शिक्षण, वर्तणूक, एकूण जीवनशैली यावरूनही व्यक्तीची प्रतिष्ठा ठरते.

व्यक्तिला अर्पित व अर्जित अशा दोन्ही निकषावरून प्रतिष्ठा मिळते. मात्र समाजात प्रतिष्ठेचे वितरणही विषम असेच दिसून येते. त्यामुळेच स्तरीकरण घडून येते.

- **सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार** (Forms of Social Stratification) :

स्तरीकरण व्यवस्थेच्या अंतर्गत व्यक्तिला किंवा समूहाना आपला सामाजिक दर्जा बदलण्याची संधी मिळते किंवा नाही यावरून स्तरीकरणाचे दोन प्रकार होतात.

**१) बंद स्तरीकरण** (Closed stratification) : ज्या स्तरीकरण व्यवस्थेत व्यक्तिला आपला सामाजिक स्तर बदलता येत नाही. आपल्या आई वडीलांमुळे मिळालेल्या स्थानावरच जन्मभर रहावे लागते म्हणजेच सामाजिक गतिशीलतेचा अभाव असतो. त्याला बंद स्तरीकरण म्हणतात. व्यक्तिचा दर्जा जन्मानेच निश्चित होतो. उदा. भारतातील जातीव्यवस्था हे बंद स्तरीकरणाचे उदाहरण आहे. व्यक्तिला स्वत:च्या प्रयत्नाने जन्मजात दर्जा बदलण्याची संधी नसते. म्हणजेच ते बंद स्तरीकरण होय.

**२) मुक्त स्तरीकरण** (Open stratification) : ज्या स्तरीकरण व्यवस्थेत व्यक्तिला आपला सामाजिक स्तर बदलण्याची सोय व संधी असते. स्वत:ची पात्रता व कौशल्ये यांच्या सहाय्याने सामाजिक दर्जा बदल घडवून आणण्यास वाव असतो. म्हणजेच सामाजिक गतिशीलतेला अनुकूलता असते तेव्हा त्याला खुले स्तरीकरण म्हणतात. वर्ग व्यवस्था हे खुल्या स्तरीकरणाचे उत्कृष्ठ उदाहरण आहे. आधुनिक समाजातील सामाजिक वर्ग हे संपत्ती शिक्षण, व्यवसाय अशा आधारावर ठरतात.

- **सामाजिक स्तररचना व शिक्षण** (Social Stratification and Education) :

समाजाची स्तरीकरण व्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था यात परस्पर संबंध दिसून येतो. पारंपारिक भारतीय समाजातील स्तररचना धर्म आणि जातीवर आधारलेली होती. त्यामुळे विविध जाती समूहाना जन्मानुसार मिळालेले व्यवसायच आयुष्यभर करावे लागत होते. कनिष्ठ जातीचे व्यवसाय हलक्या प्रतीचे, कमी मिळकतीचे आणि कष्टाचे होते. मात्र मध्यम व उच्च जातींचे व्यवसाय प्रतिष्ठेचे व निश्चित मिळकतीचे होते. कांही कनिष्ठ जातीना तर अस्पृश्य समजले जात होते. लोकांच्या व्यवसायांचा प्रभाव त्यांचा समूह, वर्तणूक, आकांक्षा, शिक्षण, जीवनशैली व दृष्टीकोन या सर्वावर दिसून येतो.

आधुनिक काळात जातीव्यवस्थेचा प्रभाव कमी होऊन वर्गव्यवस्थेचा उदय झाला. व्यक्तिला जातीनुसार प्राप्त झालेल्या दर्जाऐवजी व्यवसाय, मिळकत, शिक्षण व कौशल्ये क्षमता यांच्या जोरावर समाजात चांगला दर्जा प्राप्त करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. तरीसुद्धा प्रत्यक्षात कनिष्ठ जातीचे लोकच हलक्या प्रतिचे व्यवसाय करताना दिसतात आणि उच्च वर्गातील लोकच विशेष फायदेशीर व प्रतिष्ठीत व्यवसायात दिसतात. या दोन्हीत कांही अपवाद असले तरी वर्गव्यवस्थेत ही कष्टकरी लोकांचे जीवन हालाखीचेच असते.

समाजाची स्तरीकरण व्यवस्था आणि शिक्षणव्यस्था यांचा आंतरसंबंध पूर्वीपासनच दिूसन येतो. भारतात पूर्वी ब्राह्मणांना धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात श्रेष्ठ स्थान आणि संधी मिळाली होती. ब्राह्मणेत्तर असा बहुजन समाज शिक्षणापासून दिर्घकाळ वंचितच राहिला होता.

**ब्रिटिश काळ :** ब्रिटिशांनी आपल्या राजवटीत भारतात नवीन राजकीय, आर्थिक, तांत्रिक व शैक्षणिक व्यवस्था प्रस्थापित केली. यंत्रउत्पादनपद्धती, उद्योगधंदे व बाजारपेठा यांच्या प्रभावामुळे स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्ता विस्कळीत झाली. इंग्लंडमध्ये यंत्रावर तयार झालेल्या वस्तु भारतात मिळू लागल्या. त्यामुळे कारागीर, बलुतेदार, आलुतेदार यांचे व्यवसाय ओस पडले. शेतीवरचा भार वाढत चालला. ब्रिटीशानी कांही खाण उद्योग, चहा, कॉफी, ज्यूट, उत्पादन, कापडगिरण्या सुरू केल्या. त्यात कामगार, तंत्रज्ञ, कारकून, पर्यवेक्षक, व्यवस्थापक, हिशेबनीस अशी पदे निर्माण झाली. लोकांना आपले परंपरागत व्यवसाय सोडून देऊन ती पदे मिळविण्याची संधी प्राप्त झाली. जातीसंस्थेच्या बंधनातून मुक्त होऊन नवीन व्यवसायात शिरकाव करण्यासाठी लोक धडपड करू लागले. याशिवाय विशिष्ट असे इंग्रजी शिक्षण घेऊन डॉक्टर, वकील, इंजिनिअर असे नवे प्रतिष्ठीत व्यवसाय करण्याची संधी मिळाली.

ब्रिटिशांनी राज्य कारभाराची जी नवीन पद्धती सुरू केली त्याचाच एक भाग म्हणून अनेक राज्ये निर्माण करून त्यांना कांही सत्ता व अधिकार दिले. रेल्वे, पोस्ट, तारसेवा, छपाईयंत्र यामुळे लोकांचे परस्परसंबंध वाढत राहीले. काही प्रमाणात जाती संस्थेची बंधने शिथील झाली. कायदे, पोलीस यंत्रणा, न्यायदान व्यवस्था यामुळे जात पंचायतींचा प्रभाव कमी होत गेला.

ब्रिटिशांनी खुल्या इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ केला. धर्म, जात, वंश, लिंग यावर आधारीत भेद न मानता शिक्षण सर्वांसाठी खुले केले. इंग्रजी शिक्षणातूनच भारतात शिक्षक, प्राध्यापक, सरकारी अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर, वकील यांचा एक मध्यमवर्ग उदयास आला. याच काळात खेड्यापाड्यातील कनिष्ठ जातींचे लोक आपले वडीलोपार्जीत व्यवसाय सोडून देऊन शहांकडे रोजगारासाठी जाऊ लागले. ब्रिटिशांच्या शिक्षणामुळे परिवर्तनाच्या एका नव्या पर्वाचा भारतात प्रारंभ झाला असला तरी पुन्हा या शिक्षणाचा अधिक लाभ शहरातील मध्यम आणि उच्च वर्गातील लोकांनाच झाला. ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभारात कांही भारतीयांना सहाय्यक म्हणून काम देता येईल अशा पद्धतीचे शिक्षण सुरू केले. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार ब्रिटिशांच्या काळात झाला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रौढ मतदान पद्धती, केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे मोठी राजकीय जागृती झाली. औद्योगिकरण, नवीन संस्थांची निर्मिती यामुळे शैक्षणिक पात्रतेनुसार नोकऱ्या मिळू लागल्या. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सर्व राज्यानी शिक्षणप्रसाराला चालना दिली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व आरक्षणाची तरतूद केली. गरीब विद्यार्थी आणि मुलींच्या शिक्षणासाठी सोयी निर्माण केल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा संख्यात्मक व गुणात्मक विकास झाला.

- **शिक्षणाचा स्तरीकरण व्यवस्थेवरील प्रभाव :**

समाजाच्या स्तरीकरण व्यवस्थेचा जसा शिक्षण व्यवस्थेवर प्रभाव पडतो. त्याप्रमाणेच शिक्षणाचा देखील स्तरीकरण व्यवस्थेवर प्रभाव दिसतो. त्याबाबतचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे –

- **शिक्षण बंदीस्त स्तरीकरणास मुक्त करते :**

बंदीस्त स्तरीकरण व्यवस्थेत व्यक्तिला जन्मावरून दर्जा प्राप्त होतो. ज्या जाती समुदायात व्यक्तिचा जन्म होता त्या जातीचा दर्जाच व्यक्तिला मिळतो. अनुवंशिकतेने मिळणाऱ्या या दर्जात व्यक्तिला आयुष्यभर बदलच करता येत नाही. अशा व्यवस्थेत शिक्षण घेण्याचा हक्कसुद्धा कांही जातीनाच असतो. उदा. भारतात ब्रिटीशांच्या काळापूर्वी शिक्षण ही केवळ ब्राह्मणांचीच मक्तेदारी होती. स्त्रिया आणि अस्पृश्य जातीना शिक्षण घेण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे एक संघटीत सामाजिक विषमता देशात निर्माण झाली होती. मात्र आधुनिक शिक्षण हे सर्वासाठी खुले व धर्म निरपेक्ष असून त्यातून व्यक्तिस्वातंत्र्य, समता व वैज्ञानिक दृष्टकोन आणि आधुनिक मूल्ये यांचे संस्कार व्यक्तिवर होतात. सामाजिक भेदाभेद व असमानता या बाबतची जाणीव जागृती होऊन असे भेद नाकरून त्यांना विरोध करण्याची क्षमता व्यक्तित निर्माण होते. थोडक्यात आधुनिक शिक्षणामुळे लोकांना खुल्या स्तरीकरण व्यवस्थेत शिरकाव करण्याची संधी मिळते.

- **शिक्षण व आंतरजातीय बंधने व मर्यादा :**

पारंपरिक भारतीय समाजात व्यक्तिला आपल्या जातीपेक्षा कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींच्या व्यक्ति बरोबर खाण्यापिण्याची, संबंध ठेवण्याची परवानगी नव्हती. त्याबाबत जातीसंस्थेचे नियम कडक होते. आधुनिक शिक्षणामुळे या नियमात मोठ्या प्रमाणात शिथिलता आली आहे. कनिष्ठ जातीचे अनेक लोक आता वरिष्ठ जातीच्या लोकासमवेत काम करतात. हे चित्र प्रामुख्याने नागरी समाजात आढळते. ग्रामीण भागात अजूनही याबाबतची विषमता कांही प्रमाणात टिकून आहे. मात्र खेड्यातील लोक जेव्हा शहराकडे स्थलांतर करतात तेव्हा तेथील परिस्थितीशी त्यांचे समायोजन होते. अशाप्रकारे शिक्षणामुळेच लोक जातीजातीतील भेदभावापासून मुक्त होण्यास मदत होते.

- **शिक्षण व व्यावसायिक गतिशीलता :**

ब्रिटिशपूर्व काळात भारतातील व्यवसाय अनुवंशिक व जातीवर आधारीत होते. एका जातीत परंपरेने

केला जाणारा व्यवसाय दुसऱ्या जातीचे लोक करीत नव्हते. जाती प्रमाणेच व्यवसायाबाबतही श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना होती. उच्च जातींचे व्यवसाय पवित्र समजले जात होते. तर कनिष्ठ जातींचे व्यवसाय अपवित्र समजले होते आणि त्या त्या व्यवसायाचा दर्जा व्यक्तिना मिळत असे.

भारतीय समाजाची व्यवसायिक स्थिती आता मोठ्या प्रमाणावर बदललेली आहे. औद्योगिकरण, व्यापारीकरण व नागरीकरणामुळे अनेक व्यवसायिक संधी निर्माण झाल्या आहेत. त्याबाबत आता जातीसंस्थेच्या बंधनांचा संबंध कमी झाला आहे. कल्याणकारी राज्याच्या धोरणामुळे आता सरकारच लोकांना मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या देऊ शकते. जातीच्या श्रेष्ठत्वावरून कोणालाही सरकारी नोकरी दिली जात नाही. आधुनिक तंत्राचा वापर केल्यामुळे काही व्यवसायांचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी हलक्या प्रतीचे समजले गेलेले व्यवसाय आता वरिष्ठ व मध्यम जातीचे लोकही करू लागले आहेत. सध्या व्यवसायाचे श्रेष्ठत्व पवित्र अपवित्रतेच्या श्रद्धेवरून ठरविले जात नाही. तर त्या व्यवसायासाठी कोणते शिक्षण व प्रशिक्षण घ्यावे लागते आणि त्यातून होणारी आर्थिक प्राप्ती महत्त्वाची समजली जात आहे. या व्यवसायासाठी आवश्यक असणारे शिक्षण कोणत्याही जातीची व्यक्ति घेऊ शकते. कनिष्ठ जातींचे सदस्य आवश्यक असे शिक्षण घेऊन विशिष्ट व्यवसायात पदार्पण करू शकतात. थोडक्यात अनेक व्यवसाय जाती व्यवस्थेच्या बंधनातून मुक्त झाले असून त्यामुळे व्यक्तिंची सामाजिक गतिशीलता वाढत चालली आहे.

आता मोठ्या संख्येने लोक शिक्षण घेऊन नवनवीन व्यवसायात शिरकाव करीत आहेत. शहरातील लोकांना तसेच उच्च व मध्यमवर्गीयांना याचा अधिक फायदा झाला असला तरी ग्रामीण भागात व कनिष्ठ जातीना तितका लाभ झाला नाही. त्यामुळे तेथे समस्तर सामाजिक गतिशलता तेथे अनुभवास येते. आता उच्च जातीच्या कांही लोकांनी मध्यम व कनिष्ठ समजले जाणारे व्यवसाय सुरू केले आहेत. तर कनिष्ठ जातीच्या कांही लोकांना मध्यम व श्रेष्ठ समजले जाणारे व्यवसाय करण्याची संधी मिळाली आहे. थोडक्यात शिक्षणामुळे समाजात समस्तर व स्तंभीय गतिशीलता निर्माण होते.

- **शिक्षणामुळे जातिव्यवस्थेत झालेला बदल :**

पूर्वी लोकांनी आपल्या जातीचे व्यवसाय धर्म आणि कर्म म्हणूनच स्विकारले होते. पण शिक्षणाचा प्रसार जसजसा होत गेला तसतसे कनिष्ठ व बलुतेदार जातीचे लोक नवीन व्यवसायात पदार्पण करण्यासाठी धडपड करू लागले. त्यांचे जमीनधारक प्रभावी जातीवरचे अवलंबत्वही कमी होऊ लागले.

जातपंचायतीची बंधने आणि प्रभाव पूर्वीसारखा राहिलेला नाही. मात्र बदलत्या परिस्थितीत आपल्या जातीबांधवानाही कांही फायदे मिळाले पाहिजेत, या हेतूने प्रत्येक जातीतील सुशिक्षित लोकांनी मंडळे, संघटना स्थापन केल्या आहेत. राज्य व देश पातळीवर त्यांचे मेळावे व परिषदा आयोजित केल्या जातात. आपल्या जातीत शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यातून लोकांना उच्च व चांगला व्यवसाय आणि अधिकाराच्या नोकऱ्या प्राप्त व्हाव्यात यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. शिष्यवृत्त्या, विद्यार्थी वसतिगृहे, शैक्षणिक साधन सामुग्री, स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी इ. व्यवस्था केली जात आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, समाजात श्रेष्ठ दर्जा मिळविण्यासाठी मिळकत, संपत्ती, आवश्यक असतात. आधुनिक काळात शिक्षण घेऊन या सर्व बाबी मिळविता येतात. शिक्षणामुळे समाजाच्या पारंपारिक स्तररचनेत मोठे बदल झाले आहेत. शैक्षणिक संधीच्या समानतेबरोबरच समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात समानतेचा पुरस्कार केला जात आहे.

**३.२.२.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न.**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) समाजात कोणकोणत्या बाबीचे वाटप विषम पद्धतीने झालेले असते.

२) वर्ग, पक्ष आणि दर्जासमूह ही स्तरीकरणाची परिमाणे कोणी सांगितली आहेत.

३) भारतातील जातीव्यवस्था हे कोणत्या प्रकारचे स्तरीकरण आहे.

४) समाजाच्या पारंपारिक स्तररचनेत कशामुळे बदल झाले आहेत.

**३.२.३ शिक्षण आणि आधुनिकीकरण :**

आधुनिकीकरण ही एक गुंतागुंतीची सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. **डेव्हिड पाँपेनो** यांच्या मते, ''पारंपरिक औद्योगिकीकरण पूर्व समाजातील संस्थांचे औद्योगिकरण झालेल्या समाजातील संस्थाप्रमाणे सामाजिक रूपांतरण घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय.''

**चंद्रकांत खंडागळे** यांच्या मते ''मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात इष्ट व विवेकी परिवर्तन घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय.''

औद्योगिकरणाची सुरवात प्रथम युरोपीय देशात झाली. त्यामुळे तेथील लोकांच्या जीवनशैलीत एकूणच समाजात कांही महत्त्वपूर्ण बदल घडून आले. पूर्वेकडच्या देशातील कांही उच्च व मध्यमवर्गीय स्तरातील लोकांनी युरोपीय किंवा पाश्चिमात्य जीवनपद्धतीचे अनुकरण करण्यास सुरवात केली. त्याचा उल्लेख करण्यासाठी प्रथम युरोपीकरण आणि पाश्चिमात्त्यीकरण या संकल्पना वापरल्या जाऊ लागल्या पण पुढे त्याऐवजी आधुनिकीकरण ही संकल्पना वापरात आली.

या संदर्भात द. ना. धनागरे यांनी असे म्हटले आहे की, 'इतर परिवर्तन प्रक्रिया प्रमाणे आधुनिकीकरण ही देखील एक परिवर्तन प्रक्रिया आहे. त्यात प्रामुख्याने जीवनपद्धती व आचार विचारामध्ये बदल घडून येतो. हे परिवर्तन युरोपीकरण, पाश्चिमात्त्यीकरणाप्रमाणे समाजातल्या उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित रहात नाही. संचारमाध्यमाद्वारे समाजातल्या सर्व थरातील व्यक्तिंवर त्यांचा प्रभाव पडतो. त्यातून नवीन कल्पना व मनोवृत्तीचा प्रसार होतो. हा बदल सर्व समावेशक असतो. इतकेच नव्हे तर आधुनिकीकरण प्रक्रियेत सातत्याने परिवर्तन घडत रहाते व त्याद्वारे व्यक्तिव्यक्तिंची सामाजिक व मानसिक गतिशीलता हाच समाजाचा स्थायीभाव बनतो. तसेच हा बदल लादला जात नाही. तर स्वेच्छेने स्विकारला जातो. आधुनिकीकरण प्रक्रियेचा गाभा धर्मनिरपेक्ष असतो.

- **आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये :**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची कांही वैशिष्ट्ये दिसून येतात. उदा. सामाजिक गतिशीलता, सामाजिक विभेदन, संरचनात्मक विभेदन व बदल, दर्जापद्धतीत बदल, नागरीकरण सामाजिक व राजकीय चळवळी, व्यापक व बहुविध शिक्षण आंतरराष्ट्रीय सहकार्याचा विकास ही सर्व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची वैशिष्ट्ये आहेत. राष्ट्राराष्ट्रातील परस्परसंबंधांचा विकास करण्याच्या हेतूने युनोसारख्या संस्था निर्माण झाल्या आहेत.

- **आधुनिकीकरणाची साधने :**

औद्योगिकरण, नागरीकरण, धर्मनिरपेक्षता, नवीन सामाजिक वर्गाचा उदय, पाश्चिमात्यीकरण, लोकशाहीकरण इत्यादी आधुनिकीकरणाची साधने आहेत.

- **शिक्षण व आधुनिकीकरण :**

आधुनिकीकरणाची अनेक साधने दिसून येतात. योगेंद्रसिंग यांच्या मते भारतातील आधुनिकीकरणाचे शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळेच लोकांमध्ये राष्ट्रवाद, उदारमतवाद आणि स्वातंत्र्याविषयीच्या आकांक्षा गतिमान झाल्या आहेत. शिक्षणातूनच भारतात प्रबोधीत बुद्धीवादी वर्गाचा उदय झाला. उच्चशिक्षित तरूणांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व केले त्याच बरोबर सामाजिक व सांस्कृतीक क्षेत्रातील सुधारणासाठी अथक परिश्रम घेतले.

आधुनिकीकरण ही व्यापक स्वरूपाची संकल्पना असून समाजातील गुणात्मक व परिणामात्मक बदलाचे विश्लेषण व मूल्यमापन त्यात केले जाते. मध्ययुगीन संस्कृतीपासून आधुनिक संस्कृतीपर्यंत समाजात झालेल्या बदलाचे वर्णन त्यात केले जाते. परंपरांच्या पलिकडे जाऊन प्रगतीसाठी ते प्रयत्नशील असते. कांही समाजास्त्रज्ञांच्या मते आधुनिकीकरण हे युरोपीय व अमेरिकन प्रतिमानावर आधारलेले आहे. औद्योगिकरण पाश्चिमात्यीकरण, नागरीकरण, युरोपीकरण यांच्या तुलनेत आधुनिकीकरण ही संकीर्ण प्रक्रिया असून तिचे परिणामसुद्धा संकीर्णच आहेत. बौद्धीक क्षेत्रात भौतिक व सामाजिक घटनांचे बुद्धीप्रमाण्यवादी दृष्टीकोनातून स्पष्टीकरण त्यात अभिप्रेत आहे. प्रत्यक्षज्ञानवाद, प्रयोगवाद व बुद्धीप्रामाण्यवाद ही आधुनिकीकरणाची देणगी आहे. धार्मिक क्षेत्रात धर्मनिरपेक्षतेच्या स्वरूपात आधुनिकीकरण प्रगट होते. तात्वीक दृष्टिकोनातून ते मानवतावादी विचार व्यक्त करते. व्यक्तिंच्या आणि संस्थांच्या कार्यपद्धतीत त्यामुळे गतिशीलता, विशेषीकरण आणि विभेदीकरण निर्माण होते. राजकीय क्षेत्रात ते लोकशाहीकरणाचा पुरस्कार करते.

आधुनिकीकरणाचे शिक्षणासंबंधीचे वैशिष्ट्य सांस्कृतीक स्वरूपाचे आहे. संस्कृतीच्या क्षेत्रात शिक्षणामुळे ज्या महत्त्वाच्या बाबी दृष्टोपतीस येतात. त्याबाबत ए. आर. देसाई यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, आधुनिकीकरणामुळे सांस्कृतीक व्यवस्थेच्या प्रमुख घटकामध्ये विभेदीकरण वाढत जाते. साक्षरतेचा आणि धर्म निरपेक्ष शिक्षणाचा प्रसार होतो. बौद्धीक क्षेत्रात संस्थात्मक व्यवस्था निर्माण होते. बौद्धीक बैठकीवर आधारलेल्या विशेषीत भूमिकांचा विकास होतो प्रगती आणि सुधारणा यावर आधारीत नवीन

सांस्कृतीक दृष्टीकोनाचा उदय होतो. बदलत्या सामाजिक परिस्थितीशी समायोजन साधण्याच्या दृष्टीने व्यक्तिमत्त्व विकासाचे नवीन मार्ग उपलब्ध होतात. स्वत:चा विकास आणि त्यासाठी गतिशिलतेची प्रेरणा मिळते. इतरांचा आदर करण्याबाबतची जागरूकता निर्माण होते. आधुनिकीकरणामुळे समाजापुढे कांही आव्हाने देखील निर्माण होतात. सातत्याने बदलत रहाणाऱ्या समस्या व गरजा यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने संस्थात्मक रचनेचा विकास करण्याची क्षमता देखील समाजात निर्माण होते.

- **शिक्षणाद्वारे आधुनिकीकरण :**

शिक्षण हे आधुनिकीकरणाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. आधुनिकीकरणामुळे लोकांच्या श्रद्धा व मूल्ये आणि दृष्टीकोनात बदल होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते. परदेशात विकसीत झालेल्या तंत्रज्ञानाचा आपल्या देशातील गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने स्विकार करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण होतात. देशातील गरजा आणि समस्यांची सोडवणूक करण्याची जबाबदारी घेणाऱ्या संस्था व संघटनांचा उदय होतो.

आधुनिकीकरणाच्या संदर्भात शिक्षणाचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) परंपरांना पर्याय :** शिक्षणाच्या प्रसाराबरोबर समाजातील जुन्या रूढी परंपरांचा स्विकार करण्याची पद्धती मागे पडत जाते आणि त्याऐवजी कोणती नावीन्यपूर्ण उद्दिष्टे साध्य करता येतील याचे मार्गही शिक्षणाद्वारे उपलब्ध करून दिले जातात. शिक्षणामुळेच व्यक्तिच्या ज्ञानाच्या व मनाच्या कक्षा विस्तारीत होतात. नवनवीन प्रयोग करण्याची प्रेरणा लोकांना शिक्षणातूनच मिळते.

**२) समाजीकरण :** समाजीकरण म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे समाजीकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे. समाजीकरणाद्वारे समाजात नवनवीन कल्पना व मूल्ये प्रस्तावित केली जातात. आधुनिकीकरणाच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या बाबी टाकून देण्याबातचा दृष्टिकोन शिक्षणातूनच तयार होतो.

**३) राष्ट्रीय जाणीव जागृती :** शिक्षणातून आदर्शात्मक शब्दोचारांची निर्मिती होते. विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम निर्माण होण्यास त्यांची मोठी मदत होते. राष्ट्रीय जाणीव जागृतीचा विकास होण्यास त्यातून चालना मिळते. लोक आपल्या गरजा आणि प्रश्न यांचा राष्ट्रीय दृष्टीकोनातून विचार करू लागतात. देशहिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुद्यावर राष्ट्रीय सहमती निर्माण करण्यासाठी शिक्षणच प्रोत्साहन देत असते.

**४) उच्चशिक्षित अभिजन :** उच्च शिक्षण घेऊन समाजात श्रेष्ठ स्थान मिळविण्याचा राजमार्ग सर्व लोकांसाठी खुला होते. सर्वसामान्य लोकही सुशिक्षित लोकांचा आदर्श समोर ठेवतात आणि त्यांचे अनुकरण करतात. परंपरांगत पद्धतीचा त्याग करून आपले जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील रहातात. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या लोकांचा आधुनिक श्रेष्ठजनामध्ये समावेश झाल्याचे दिसून येते.

**५) समस्या सोडविणारे नेतृत्व :** केवळ शिक्षण व्यवस्थेतूनच शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, प्रशासक आणि व्यवस्थापनतज्ज्ञ निर्माण होतात. वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान आणि कौशल्य त्यांना शिक्षणातूनच मिळते.

आधुनिकीकरणासाठीचे व्यापक प्रकल्प राबविण्यासाठी विविध क्षेत्रात, विविध पातळीवर तंत्रज्ञ, नियोजनकर्ते आणि व्यवस्थापकांची गरज असते. समाजाच्या सर्व क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांशी सोडवणूक करण्यासाठी दूरदर्शी नेतृत्वाची गरज असते. शिक्षण व्यवस्थेतूनच या सर्वांची जडणघडण होत असते.

**६) गतिशीलतेस चालना :** लोकांच्या मनोवृत्तीमध्ये आणि विचारामध्ये ताबडतोबीने बदल होत नसले तरी शिक्षणाच्या माध्यमातून लोकांमध्ये अपेक्षीत बदल घडवून आणता येतात. पारंपारिक समाजातील स्तररचनेत शिक्षणामुळेच अनेक बदल घडून आले आहेत. शिक्षणामुळे समस्तर आणि स्तंभीय गतिशीलतेला चालना मिळते.

शिक्षणामुळे व्यक्तिला समाजातील अधिकाधिक उच्च आणि प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या व्यवसायात पदार्पण करून आपला आर्थिक व सामाजिक दर्जा वाढविता येतो आणि अधिक वरच्या सामाजिक वर्गात प्रवेश करून आपला जीवनस्तर उंचवता येतो. शिक्षणामुळे व्यक्तिंच्या अभिवृत्ती आणि मूल्यातही परिवर्तन घडून येते. व्यक्तिमत्त्व विकासोन्मुख बनते. आणि अशी व्यक्ती वरचा सामाजिक दर्जा मिळविण्यासाठी सातत्याने धडपड करते. अनेक व्यक्तिंच्या बाबतीत शिक्षणामुळे असा बदल घडून आला तर एकंदर समाजातच व्यापक प्रमाणावर सामाजिक गतिशीलता घडून येते.

सुयोग्य नियोजन आणि कार्यक्षम अंमलबजावणी यांच्या सहाय्याने शिक्षण आधुनिकीरकरणाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी अर्थपूर्ण सहभाग घेऊ शकते. नवीन तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यासाठी आणि त्याच्या कार्यवाहीसाठी आवश्यक मनुष्यबळ शिक्षणातूनच तयार होते. समाजाच्या आधुनिकीकरणामध्ये शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते.

### ३.२.३.१ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न.

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आधुनिकीकरण प्रक्रियेचा गाभा धर्मनिरपेक्ष असतो असे कोणी म्हटले आहे?

२) राष्ट्राराष्ट्रातील परस्परसंबंधाचा विकास करण्याच्या हेतूने कोणती संस्था स्थापन झाली आहे?

३) शिक्षण हे भारतातील आधुनिकीकरणाचे प्रभावी साधन आहे. असे कोणाचे मत आहे?

४) पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या लोकांचा कशात समावेश होतो?

### ३.२.४ अ) शिक्षण आणि सामाजिक गतिशीलता (Education and Social Mobility)

सामाजिक स्तरीकरणाचे बंद स्तरीकरण आणि खुले स्तरीकरण असे दोन प्रकार दिसून येतात. खुल्या स्तरीकरणात गतिशीलतेला वाव असतो. म्हणजेच व्यक्तिला आपला सामाजिक दर्जा बदलण्याचे स्वातंत्र्य, संधी आणि सोयही असते. म्हणून खुल्या स्तरीकरणात व्यक्ति आपला सामाजिक स्तर किंवा वर्ग बदलू शकते. व्यक्तिने आपला सामाजिक स्तर बदलण्याच्या क्रियेला गतिशीलता असे म्हणतात.

Mobility या इंग्रजी शब्दाकरीता मराठीत गतिशीलता हा शब्द वापरला जातो. विल्यम स्कॉट यांनी

Mobility हा शब्दाचा अर्थ भौतिक  किंवा भौगोलिक किंवा सामाजिक स्थानातील सापेक्ष बदल किंवा हालचाल असा सांगितला आहे. सामाजिक गतिशीलता या संकल्पनेच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मॅक्स वेबर :** समाजातील व्यक्तिंचे किंवा गटांचे समाजातील एका स्थानापासून किंवा स्तरापासून दुसऱ्या स्थानापर्यंत किंवा स्तरापर्यंत झालेले परिवर्तन म्हणजे सामाजिक गतिशीलता होय.

**२) हॉर्टन आणि हट :** व्यक्तिची एका सामाजिक दर्जाकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे जाण्याची क्रिया म्हणजे सामाजिक गतिशीलता होय.

**३) ड्रेसलर आणि विलीस :** समाजाच्या एका स्तरातून दुसऱ्या स्तरात होणारी व्यक्तिंची हालचाल म्हणजे सामाजिक गतिशीलता होय.

वरील व्याख्यावरून असे म्हणता येईल की व्यक्तिच्या मूळ सामाजिक स्थानात किंवा सामाजिक दर्जात बदल होणे म्हणजे गतिशीलता होय. व्यक्तिप्रमाणेच स्तरीकरण व्यवस्थेतील एखाद्या समूहाचे समाजिक स्थान किंवा सामाजिक दर्जा बदलणे म्हणजे गतिशीलता होय.

- **सामाजिक गतिशीलतेचे प्रकार (Types of Social Mobility) :**

सामाजिक गतिशीलतेचे चार प्रकार दिसून येतात.

**१) समस्तर सामाजिक गतिशीलता** (Horizontal Social Mobility) : जेव्हा एखाद्या व्यक्तिच्या किंवा समूहाच्या सामाजिक स्थानात किंवा दर्जात बदल होतो पण त्याअनुषंगाने त्या व्यक्तिचा किंवा समूहाचा सामाजिक स्तर किंवा सामाजिक वर्गमात्र बदलत नाही तेव्हा समस्तर सामाजिक गतिशीलता असे म्हणतात. क्षितीज समांतर गतिशीलता असा शब्द ही त्या संदर्भात वापरला जातो. एखाद्या वकीलाने प्राध्यापक म्हणून नोकरी स्विकारली तर त्याच्या व्यवसायिक स्थानात बदल होतो. मात्र या दोन्ही व्यवसायांना समाजात समान प्रतिष्ठा असते त्यामुळे तेथे व्यक्तिचा सामाजिक वर्ग किंवा स्तर बदलत नाही.

**२) स्तंभीय सामाजिक गतिशीलता** (Vertical Social Mobility) : जेव्हा सामाजिक वर्गांच्या श्रेणी रचनेत व्यक्ति किंवा समूहांची वरच्या स्तरातून खालच्या स्तरात किंवा खालच्या स्तरातून वरच्या स्थरात अशी हालचाल होते तेव्हा स्तंभीय गतिशीलता घडते. स्तंभीय गतिशीलतेचे दोन प्रकार होतात.

**अ) उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलता** (Upward Social Mobility) : कनिष्ठ किंवा खालच्या सामाजिक स्तरातून किंवा वर्गातून त्यापेक्षा वरच्या किंवा श्रेष्ठ दर्जा असलेल्या सामाजिक स्तरात किंवा वर्गात व्यक्ति किंवा समूहाने प्रवेश करणे म्हणजे उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलता होय. एखादी व्यक्ति कनिष्ठ सामाजिक वर्गातून मध्यम वर्गात किंवा मध्यम वर्गातून उच्च वर्गात आपल्या कर्तृत्वाने जाऊन पोहोचते तेव्हा उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलता म्हणतात. एखादा प्राथमिक शिक्षक स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन जिल्हाधिकारी झाला तर त्याचा सामाजिक स्तर उंचावतो आणि उर्ध्वगामी गतिशिलता घडते.

**ब) अधोगामी सामाजिक गतिशीलता** (Downward Social Mobility) : एखादी व्यक्ति किंवा समूह वरच्या सामाजिक दर्जावरून खालच्या सामाजिक दर्जावर घसरली म्हणजेच कनिष्ठ पातळीवर आली तर अधोगामी सामाजिक गतिशीलता घडते. एखाद्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याला लाचलुचपतीच्या गुन्ह्याबद्दल तुरुंगवासाची शिक्षा झाली आणि त्यानंतर उपजिवीकेसाठी त्यांच्यावर हलकीसलकी कामे करण्याची वेळ आली तर अधोगामी सामाजिक गतिशीलता घडून येते.

**३) आंतरपिढी गतिशीलता** (Intergenerational Mobility) : स्तंभीय गतिशीलता दोन किंवा अधिक पिढ्यांच्या काळात घडून येऊ शकते. एखाद्या कुटुंबाचा दोन किंवा अधिक पिढ्यांचा दर्जा बदलून पूर्वीच्या तुलनेत वरच्या किंवा खालच्या वर्गात समावेश होऊ शकतो. उदा. सफाई कामगाराचा मुलगा संगणक अभियंता होऊ शकेल. वडील शेतमजूर असतील पण मुलगा सरकारी अधिकारी होईल. आंतरपिढीतील उर्ध्वगामी गतिशीलतेची ही उदाहरणे आहेत.

**४) पिढी अंतर्गत गतिशीलता** (Intragenerational Social Mobility) : एकाच व्यक्तिच्या जीवनात घडून येणारी स्तंभीय गतिशीलता म्हणजे पिढी अंतर्गत गतिशीलता होय. शिक्षक म्हणून काम करणारी व्यक्ति पुढील काही वर्षात मंत्रीपदावर गेली तर ती पिढी अंतर्गत उर्ध्वगामी गतिशीलता असते. पण आईवडीलांनी मिळविलेली संपत्ती मुलानी व्यसनापायी घालवून टाकली आणि नंतर त्यांना गरीबीत दिवस काढावे लागले तर ती पिढी अंतर्गत अधोगामी गतिशीलता ठरते.

- **सामाजिक गतिशिलता प्रभावीत करणारे घटक :**

समाजातील गतिशीलता प्रभावीत करणारे काही घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील. उदा. त्यात्या समाजातील स्तरीकरण व्यवस्थेचे स्वरूप ताठर आहे की खुले आहे. तसेच उद्योगधंद्याचा विकास आणि शहरीकरणाची वाढ, शिक्षणाच्या सोयी आणि प्रसार, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास, व्यावसायिक गतिशीलतेला वाव, दळणवळण आणि संपर्क माध्यमांची उपलब्धता यावरही गतिशीलता अवलंबून असते. समाजाची मूल्यव्यवस्था आणि तात्वीक दृष्टीकोन, तसेच भौगोलिक परिस्थिती या सर्व घटकावर त्या त्या समाजातील गतिशीलतेचे प्रमाण व स्वरूप अवलंबून असते.

- **शिक्षण आणि सामाजिक गतिशीलता** (Education and Social Mobility) :

शिक्षण व सामाजिक स्तरीकरणातील परस्परसंबंधाचा सामाजिक गतिशीलतेवर प्रत्यक्ष प्रभाव दिसून येतो. विद्यार्थ्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि त्यांचा शाळेतील प्रवेश, अभ्यासक्रमाची निवड, त्यांच्या आकांक्षा आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवसायातील पदार्पण यांचा संबंध असतो. विद्यार्थ्यांच्या आपल्या भावी आयुष्यातील आकांक्षा त्यांच्या वडीलांच्या व्यवसायाशी निगडीत असू शकतात. त्यामुळेच कनिष्ठ जातींच्या आणि खेड्यापाड्यातल्या विद्यार्थ्यांची ध्येये व आकांक्षा आणि उच्च जातीच्या व शहरी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा यात तफावत दिसून येते. वरीष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक चांगल्या शैक्षणिक सोयी सुविधा आणि योग्य मार्गदर्शनही मिळते. ज्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती

चांगली असते असे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन चांगली आर्थिक प्राप्ती असलेल्या प्रतिष्ठीत व्यवसायात पदार्पण करू शकतात. ज्या अशिक्षित लोकांनी शेती, व्यापार, व्यवसाय व उद्योगात चांगली आर्थिक प्राप्ती केली आहे त्यांची मुले उच्च शिक्षण घेताना दिसतात.

कनिष्ठ स्तरातील मुलांनी उच्च शिक्षण घेतले तर त्यांना चांगल्या वेतनाच्या नोकऱ्या मिळू शकतात. तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक पातळी उंचावते. शिवाय समाजात त्यांची प्रतिष्ठाही वाढते. कनिष्ठ आणि अस्पृश्य जातीतील मुलांचे भावनिक समायोजन याबाबत कांही समस्या असल्या तरी शिक्षण हाच त्यांना प्रतिष्ठा आणि उच्च सामाजिक दर्जा मिळवून देणारा मार्ग बनला आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांनाही समाजात चागला दर्जा मिळतो. कांही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली असते पण जर त्यांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण दिले नाही तर त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळत नाही.

विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांच्या गतिशीलतेचाही विचार करणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळात समाजात शिक्षकांना आदराचे स्थान होते. बहुसंख्य शिक्षक उच्च जातीतील असायचे पण आता वेगवेगळ्या प्रकारची सामाजिक पार्श्वभूमी असलेले तरूण शिक्षकी पेशात आले आहेत. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रातल्या इतकी आर्थिक प्राप्ती या व्यवसायात नसली तरी शिक्षणक्षेत्र, शिक्षक यांना समाजात मान्यता आणि प्रतिष्ठा आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष गुणवत्ता असणाऱ्या अतिहुशार शिक्षकांना संशोधनासाठी मोठे आर्थिक सहाय्य मिळते. परदेशात प्रशिक्षण, परिषदा आणि शैक्षणिक परिसंवादासाठी जाण्याची संधी मिळते. विशिष्ट विद्याशाखेतील तज्ज्ञ म्हणून मान्यता मिळते. सहाजिकच त्यांचा दर्जा आणखी उंचावतो.

भारतासारख्या शेतीप्रधान देशातील सर्व लोकांना पाश्चिमात्य शिक्षणातूनच अनेक गोष्टी समजल्या. या शिक्षणातून स्वातंत्र्य, मानवता, समता या विचारांची ओळख झाली. ब्रिटीशांच्या काळात धर्म, जात, लिंग, याबाबतचे भेदाभेद न मानता शिक्षण घेण्याची संधी कांही लोकांना मिळाली. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर जातीव्यवस्थेची व्यावसायिक बाजू कमकुवत होत गेली. व्यवसाय हा एक स्तरीकरणाचा आधार बनला. आधुनिक शिक्षणामुळे व्यवसायांच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. आपल्या जातींचे पारंपारिक व्यवसाय सोडून देऊन अधिक कायदेशीर अशा नवीन व्यवसायाकडे लोक वळू लागले. लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारली. उच्च दर्जा असलेल्या कुटुंबाशी वैवाहिक संबंध पाश्चिमात्य जीवनशैली, सुधारणावादी दृष्टीकोन यांच्या आधारे लोकांना समाजात प्रतिष्ठा मिळाली. उर्ध्वगामी गतिशीलतेचा लोक अनुभव घेऊ लागले.

ब्रिटिश राजवटीच्या सुरूवातीच्या काळात नवीन शिक्षण पद्धतीचे आर्थिक व इतर फायदे उच्च जातीनाच मिळाले. पण नंतरच्या काळात मध्यम व कनिष्ठ जातीनी मोठ्या प्रमाणात शिक्षणाकडे धाव घेतली. कांही शहरात धर्म व जातींच्या निकषावर मंडळांची स्थापना झाली. त्यांनी शिक्षण संस्थांची स्थापना करून शिष्यवृत्त्या आणि विद्यार्थी वस्तीगृहांची सोय केली. विशिष्ट जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये त्यांनी चांगली कामगिरी केली. मात्र विद्यार्थी प्रवेश, शिक्षक भरती यात गुणवत्तेपेक्षा इतर घटकांना महत्त्व दिले. कांही संस्थांनी उच्च दर्जाचे शिक्षण व गुणवत्ता यांना प्राधान्य दिले. पब्लिक स्कूल, कान्व्हेट स्कूल आणि तंत्रनिकेतने सुरू झाली. त्यातून शिक्षणव्यवस्थेत नवी श्रेणी रचना आकार घेऊ लागली. उच्च दर्जाच्या शिक्षणातील संधीबाबत वरिष्ठ वर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांच्यात स्पर्धा सुरू झाली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात स्वावलंबनाने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालली आहे. नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी सायंप्रशाला व महाविद्यालयांची सोय झाली. स्वाध्याय महाविद्यालये, बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली आहे. आपली शैक्षणिक पात्रता वाढवून पूर्वीपेक्षा वरच्या पदावर जाण्याची संधी त्यांना मिळत आहे. स्वकष्टावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा आता उपलब्ध आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात शिक्षणाचा सार्वत्रीक प्रसार झाला. घटनेने नागरीकांना अनेक हक्क प्रदान केले. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत व सक्तीचे करण्याचे धोरण स्विकारल्यामुले खेड्यापाड्यात शिक्षणाच्या सुविधा मिळाल्या. आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यासाठी फी माफीची सोय केल्यामुळे सर्व जातींच्या गरीब मुलांना शिक्षण मिळू लागले. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनुसूचित जाती जमाती व इतर मागास वर्गीयांच्या शिक्षणाकडे सरकारने खास लक्ष पुरविले. अनेक सेवाभावी शिक्षणसंस्थांनी देशभर शिक्षण प्रसाराचे काम हाती घेतले आहे. अशा संस्थांना सरकार अनुदान देते.

### ३.२.४.१ अ) स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :

१) कोणत्या स्तरीकरणात गतिशीलतेला वाव असतो?

२) स्तंभीय सामाजिक गतिशीलतेचे दोन प्रकार कोणते आहेत?

४) व्यवसायांच्या अनेक संधी कशामुळे उपलब्ध झाल्या?

४) भारतात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार कोणत्या काळात झाला?

### ३.२.४ ब) शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन :

सामाजिक परिवर्तन हे सर्व मानवी समाजांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सर्व समाजात साध्या अवस्थेपासून प्रगत औद्योगिक अवस्थेपर्यंत सातत्याने बदल घडून आले आहेत. वेगवेगळ्या समाजातील परिवर्तनाची गती व प्रमाण यात थोडाफार फरक असेल पण कोणत्याही स्वरूपाचे परिवर्तनच घडून येत नाही असा समाजच सापडत नाही. स्थैर्य आणि परिवर्तन ही समाजाची सापेक्ष अशी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक समाज जसा स्थीर असतो तसाच तो गतिशीलही असतो. त्यामुळेच तर समाजशास्त्राच्या प्रारंभ काळापासून सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासाकडे समाजशास्त्रज्ञानी लक्ष दिले आहे.

ऑगस्त कॉम्त यांनी समाजात स्थैर्य निर्माण करणाऱ्या घटकांच्या अभ्यासाइतकेच समाजात परिर्वतन घडवून आणणाऱ्या घटकांच्या अभ्यासाला महत्त्व दिले होते. कॉम्त नंतरच्या हर्बर्ट स्पेन्सर, एमिल डुरखाईम, कार्लमार्क्स, मॅक्सवेबर या समाजशास्त्रज्ञानी परिवर्तनाचे चिंतन व संशोधन यात योगदान दिले आहे. आधुनिक समाजशास्त्रज्ञानी तर परिवर्तनाच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष दिले आहे.

- **सामाजिक परिवर्तनाची संकल्पना :**

सामाजिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी त्याबाबतच्या कांही व्याख्यांचा अभ्यास करणे

आवश्यक आहे.

**१) हॅरी जॉन्सन :**''मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय.''

(In its basic Sence Social Change means change in Social Structure - Harry Johnson)

**२) टिशेलर व्हायटन व हंटर :** समाजच्या सामाजिक संघटनात दर्जे, संस्था आणि सामाजिक संरचनेत घडून येणाऱ्या बदलांचा सामाजिक परिर्वतनात समावेश होतो.

(Social change consists of alterations in society's social organization, statues, institutions and social structure.)

**३) चंद्रकांत खंडागळे :** सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजरचनेच्या विविध घटकांतील परस्परसंबंधात व त्यांच्या कार्यात होणारे परिवर्तन होय.

(Social change means change in relationships among the various components of social structure and their functions.)

**४) मॉरिस गिन्सबर्ग** यांच्या मते 'अभिवृत्ती आणि श्रद्धा यांच्यात होणाऱ्या बदलांचाही सामाजिक परिवर्तन या संज्ञेत समावेश केला जाणे आवश्यक आहे. कारण या घटकामुळेच सामाजिक संस्था टिकून रहातात आणि त्यांच्या बरोबरच त्या बदलतात.

(Term social change must also include changes in attitudes and beliefs in so far as they sustain insittutions and change with them.)

याशिवाय आणखी काही समाजशास्त्रज्ञानी सामाजिक परिवर्तन या संकल्पनेच्या व्याख्या केल्या आहेत. पण त्या सर्व व्याख्यांचा आशय समान असाच आहे. या व्याख्यांच्या अभ्यासावरून असे म्हणता येईल की,

१) समाजाच्या रचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

२) समाज रचनेच्या घटकांच्या कार्यातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

३) सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, सामाजिक संबंध यातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

तसेच सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रीक स्वरूपाची घटना आहे. प्रत्येक समाजात परिवर्तनाची गती भिन्न असते. भिन्न परिवर्तन अटळ, अपरिहार्य अशी बाब आहे.

- **शिक्षण व सामाजिक परिवर्तन (Eucation and Social Change) :**

समाजात बदल घडवून आणण्यासाठी लोक एकत्र येऊन संघटीतपणे प्रयत्न करतात तेव्हा सामाजिक शक्ती निर्माण होते. या शक्तीना राजकीय, औद्योगिक, धार्मिक अशा नांवाने संबोधले जाते. विविध क्षेत्रामध्ये नवीन विचार व नवीन मूल्यांचे प्रवर्तन होऊन क्रांती घडून येते त्यातून समाज रचनेच्या विविध

घटकात जो बदल घडून येतो त्याला समाजशास्त्रज्ञ सामाजिक परिवर्तन म्हणतात.

आधुनिक काळात शिक्षण ही देखील एक महत्त्वाची व्यवस्था मानली गेली आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा शिक्षणाबरोबरच इतर क्षेत्रातील विचारवंतांनी व्यक्त केली आहे. शिक्षणातील या समर्थ्यांचा शोध आजच्या काळात लागला आहे असे नाही. प्राचीन काळापासून अनेक विचारवंतांनी शिक्षणाला तत्त्वज्ञानाचे क्रियाशील अंग मानले आहे. आपली तात्त्वीक विचारसरणी लोकांच्या मनात रूजविण्यासाठी त्यांनी शिक्षणाचा आधार घेतला. भारतात इंग्रजांचे राज्य स्थिर झाल्यानंतर त्यांना राज्यकारभारासाठी आवश्यक असणारा नोकरवर्ग निर्माण करण्यासाठी शिक्षणाचाच वापर केला. त्यानंतर नवराष्ट्रनिर्मितीसाठी महात्मा गांधीनी मूलोद्योगी शिक्षणाचा पुरस्कार केला. शिक्षण विषयक आयोगानी देशातील समस्या, त्यांची सोडवणूक आणि देशाचा विकास या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा उपयोग कसा करून घ्यावा याचा आढावा घेतला आहे. थोडक्यात शिक्षण ही सामाजिक परिवर्तन घडून आणणारी प्रभावी शक्ती आहे हे सर्वमान्य झाले आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात शिक्षणाची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सामाजिक परिवर्तनाच्या स्विकारासाठी मदत :** समाजात जेव्हा कांही बदल घडून येतात तेव्हा विविध संस्थांची रचना व कार्यपद्धती बदलत असते. त्यावेळी कांही लोकांचे अशा बदलाबरोबर सहजपणे समायोजन होते. मात्र कांही लोकांना अशा बदलाबरोबर जुळवून घेणे कठीण होते. अशावेळी चांगले बदल सर्व लोकांनी स्विकारावेत हे शिक्षणाचे उद्दिष्ट्य बनते. भारतात बहुसंख्य लोकांना कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेत झालेल्या बदलाशी सुसंगती निर्माण करणे कठीण झाले होते. मात्र जे थोडे सुशिक्षित लोक होते त्यांनी अशा बदलाचे फायदे ताबडतोबीने ओळखले होते. नंतरच्या काळात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला आणि अशा बदलाचे महत्त्व आणि आवश्यकता लोकांना पटली. सध्याच्या काळात सामान्यता हे सर्वत्र मान्य झाले आहे की, समाजामध्ये जेव्हा कांही बदल घडवून आणण्याची गरज असते तेव्हा त्या बदलाला अनुकूल अशी मानसिकता लोकांमध्ये निर्माण करणे आवश्यक असते. किंबहूना तसे झाले नाही तर त्या बदलाला विरोध होणे अपरिहार्य असते. थोडक्यात शिक्षणामुळे सामाजिक बदलाला अनुकूल अशी पार्श्वभूमी समाजात निर्माण होते आणि बदलाचा स्विकार होतो.

**२) परिवर्तनाच्या विरोधावर मात :** समाजातील कांही घटकांची समाजातील नवीन उपक्रमांचा स्विकार करण्यासाठी मदत होते. मात्र काही घटक अशा स्विकृतीला प्रतिकार करतात. अशा प्रतिकारातून पुढे जाण्यासाठी शिक्षण हा एक उत्तम मार्ग आहे. शिक्षणाच्या माध्यमातून लोकांना सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व पटवून सांगितले जाते. त्यामुळे लोक आपले पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा टाकून देतात आणि कांही नावीन्यपूर्ण बाबींचा स्विकार करण्यास सिद्ध होतात.

**३) बदलाचे विश्लेषण :** समाजात होणाऱ्या प्रत्येक बदलामुळे नेहमीच व्यक्ति आणि समाज यांची प्रगती होते असे नाही. जेव्हा एखाद्या बदलामुळे त्या समाजातील सामाजिक मूल्यात अपेक्षीत बदल होतात

तेव्हाच समाजाची प्रगती होते असे मानले जाते. म्हणूनच परिवर्तनाबाबत विश्लेषण टीका आणि मूल्यमापन होणे गरजेचे असते. केवळ सुशिक्षित व्यक्तिच याबाबतची उचित अशी टीका करून कांही विधायक सूचना करू शकते. केवळ शिक्षणामुळेच व्यक्तित बुद्धी कौशल्याचा वापर करण्याची त्यातून चांगले आणि त्यांच्यातला फरक स्पष्ट करण्याची आणि कांही मूल्यांची प्रस्थापना करण्याची क्षमता निर्माण होते. परिवर्तनाबाबतचे विश्लेषण आणि टीका यातून अनिष्ठ स्वरूपाच्या बदलांना प्रतिबंध केला जातो आणि योग्य अशा बदलांना प्रोत्साहन दिले जाते. सर्वच समाजात केवळ सुशिक्षीत आणि बुद्धीप्रामाण्यवादी लोकांच्या प्रयत्नातून ते शक्य होते.

**४) नवीन बदलांचा प्रारंभ :** सुशिक्षीतांचा वर्ग सातत्याने समकालीन समाजाचे विश्लेषण करीत असतो आणि वारंवार सुधारणाबाबत सूचना करीत रहातो. त्यामुळे तर सामाजिक सुधारणेच्या चळवळींना प्रारंभ होतो. भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतरच सामाजिक सुधारणेच्या चळवळी गतिमान झाल्याचा अनुभव आहे. सुशिक्षीत तरूणांनी पाश्चिमात्य समाजांचा अभ्यास केला आणि आपल्या देशातील संस्थाबरोबर तुलना केली आणि त्यानंतर आपल्या समाजातील अनेक अनिष्ठ सामाजिक रूढी परंपरांच्या विरोधात लोकमत जागृत झाले. उदा. बालविवाह, विधवा पुनर्विवाहास बंदी, सतीची चाल, स्त्रियांच्या हक्काबाबतची असमानता या बाबतची जाणीव जागृती लोकांमध्ये झाली. केवळ शिक्षणामुळेच लोकांना या संदर्भातील बदलाची गरज समजून आली आणि अशा प्रकारे सर्व समाजातील सुशिक्षित वर्गच सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा प्रारंभ करून त्यांना मार्गदर्शन करीत असतो आणि नियंत्रणही करतो.

**५) सामाजिक बदलाचे नेतृत्त्व :** सामाजिक परिवर्तन योग्य दिशेने नेण्यासाठी समस्याबाबतची परिपूर्ण जाण असलेल्या समर्थ नेतृत्त्वाची गरज असते आणि असे नेतृत्त्व केवळ शिक्षणातूनच घडविले जाते. समाजकल्याणाच्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे त्यादृष्टीने शिक्षण झाले तरच ते चांगले आणि वाईट यातील फरक समजून घेऊ शकतील. भारतातील शिक्षणाकडून अशी अपेक्षा केली जाते की, त्यातून सामाजिक परिवर्तनाच्या प्रत्येक टप्प्यावर समर्थ नेतृत्त्व निर्माण झाले पाहिजे. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी तशी गरज आहे.

**६) सामाजिक परिवर्तनासाठी लोकशिक्षण :** योग्य पद्धतीने संघटीत केलेली व्यवस्थाच लोकांमध्ये सामाजिक बदल स्विकारण्याची क्षमता निर्माण करू शकते. शिक्षणाच्या प्रभावातूनच व्यक्ति त्यांच्या चालीरिती आणि परंपरांचे विश्लेषण करू शकतात. त्यावर टिका करून सामाजिक सुधारणेच्या चळवळींना सहकार्य करू शकतात. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व रशिया इ. देशात जे क्रांतीकारक सामाजिक बदल घडून आले आहेत त्यात शिक्षण व्यवस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**७) ज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगती :** नवनवीन संशोधन आणि शोध हे सर्वस्वी शिक्षणावरच अवलंबून असतात. कारण केवळ सुशिक्षित व्यक्तिच सर्व क्षेत्रातील नाविन्याचा शोध घेऊ शकतात. अभौतीक संस्कृतीच्या प्रगतीसाठी ही अशाच लोकांचे सहाय्य मिळते. ज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लागतात.

आणि समाजाकडून होणाऱ्या टीकेला त्यातून उत्तर मिळते. त्यानंतर मात्र लोकांना सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता पटते अशा प्रकारे ज्ञानाच्या क्षेत्रात बदल घडवून आणून शिक्षण सामाजिक परिवर्तनाला हातभार लावीत असते.

वरील सर्व मुद्यावरून हे स्पष्ट होते की, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक आणि शाळा यांच्यात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची प्रचंड शक्ती आहे. दोषपूर्ण शिक्षण पद्धतीमुळे समाजात कांही प्रश्न निर्माण होतात. योग्य दिशेने समाजात बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण व्यवस्थेकडे लक्ष देण्याची गरज असते. शिक्षण ही सामाजिक परिवर्तनाची एकमेव शक्ती नसली तरी समाजाच्या विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून योग्य दिशेने, प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या ज्या ज्या शक्ती व संस्था आहेत त्यांना शिक्षण उत्तम प्रकारे सहकार्य देऊ शकते. शिक्षणातूनच बदलाचे भाष्यकार आणि समाजसुधारणेचे नेतृत्त्व यांची जडणघडण होत असते.

**३.२.४.१ ब) स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) समाजात स्थैर्य निर्माण करणाऱ्या घटकांच्या अभ्यासइतके महत्त्व परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांना कोणी दिले?

२) मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल असे कोणी म्हटले आहे?

३) भारतातील लोकांना कोणत्या दोन संस्थात झालेल्या बदलाशी सुसंगती निर्माण करणे कठीण झाले होते?

४) सुशिक्षीत वर्ग कोणत्या चळवळी सुरू करतो?

५) आधुनिकीकरणाची कोणतीही एक व्याख्या द्या.

**३.३ सारांश (Let us sumup) :**

शिक्षण व समाज आंतरसंबंध या तिसऱ्या प्रकरणात आपण शिक्षण आणि समाजातील महत्त्वाच्या प्रक्रिया आणि व्यवस्था यांच्यातील परस्परसंबंध व प्रभावाचा अभ्यास केला आहे. पहिल्या घटकाच्या अभ्यासातून आपणास हे समजून आले आहे की, कुटुंबात व्यक्तीच्या समाजीकरणाची सुरवात होत असली तरी इतर अनेक माध्यमातून व्यक्तिचे समाजीकरण होत असेल तरी व्यक्तिच्या परिपूर्ण समाजीकरणासाठी शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणातून व्यक्तिवर जे संस्कार होतात. व्यक्तिला जी कौशल्ये प्राप्त होतात त्यातून व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास तर होतोच शिवाय व्यक्ति एक समाज उपयुक्त घटक बनते.

दुसऱ्या घटकामध्ये सामाजिक स्तररचनेच्या अभ्यासातून स्तररचनेचे निकष व प्रकार समजून येतात. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा या सर्वांनाच हव्याशा वाटणाऱ्या बाबी मिळविण्यासाठी शिक्षण हा एक मार्ग आहे.

आणि शिक्षणामुळे समाजाच्या पारंपारिक स्तररचनेवर कसा प्रभाव पडतो हे समजते.

तिसऱ्या घटकामध्ये आधुनिकीकरण प्रक्रियेचे स्वरूप समजून येते. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रगत विचारसरणी यांचा प्रसार शिक्षणाच्या माध्यमातून होतो. शिक्षणामुळे समाजाच्या आधुनिकीकरणाला चालना मिळते. कृषीप्रधान विकसनशील समाजांचे विविध क्षेत्रातील आधुनिकीकरण घडवून आणताना शिक्षणाची कशी मदत झाली आहे हे समजून येते.

चौथ्या घटकाच्या 'अ' भागात शिक्षण आणि गतिशीलता यांचा परस्परसंबंध लक्षात येतो. समाजातील सर्व व्यक्ति पूर्वी पेक्षा वरचे स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात असतात. त्यामुळे गतिशीलता निर्माण होते. समाजातील अनेक स्थाने पूर्वी वंशपरंपरेने मिळत होती. पण आता व्यक्तिच्या कर्तृत्वाला महत्त्व आले आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना वरिष्ठ वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी शिक्षणाचा मोठा आधार मिळाला आहे. हे समजून येते. ब भागात शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांचा आंतर संबंध समजून येतो. कोणत्याही समाजात बदल होण्यास अनेक घटक जबाबदार असले तरी नियोजनबद्ध पद्धतीने समाजात अपेक्षीत बदल घडवून आणण्यात शिक्षण कसे सहाय्य करते हे समजून येते. थोडक्यात शिक्षण व समाज यांचा आंतरसंबंध परस्परप्रभाव या बाबींचेआकलन या प्रकरणाच्या अभ्यासातून होते.

## ३.४ पारिभाषीक संज्ञा :

1) Sociolization - समाजीकरण.

2) Stratification - स्तरीकरण.

3) Modernization - आधुनिकीकरण.

4) Mobility - गतिशीलता

5) Closed Stratification - बंद स्तरीकरण

6) Upward Social Mobility - उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलता

7) Downward Social Mobility - अधोगामी सामाजिक गतिशीलता.

8) Social Values - सामाजिक मूल्ये.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

### ३.२.१.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) समाजीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ति आपली संस्कृती आत्मसात करते.

२) व्यक्तिच्या परिपूर्ण समाजीकरणासाठी औपचारिक शिक्षणाची गरज असते.

३) ज्ञानदान व कौशल्ये निर्मिती ही शाळेची मूलभूत कार्ये आहेत.

४) समाजीकरण हे शाळेचे महत्त्वाचे कार्य आहे असे डुरखाईमने म्हटले आहे.

**३.२.२.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) समाजात सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांचे वाटप विषम पद्धतीने झालेले आहेत.

२) वर्ग, पक्ष आणि दर्जा समूह ही स्तरीकरणाची परिमाणे मॅक्स वेबर यांनी सांगितली आहेत.

३) भारतातील जाती व्यवस्था हे बंद स्तरीकरण आहे.

४) भारतातील पारंपारिक स्तररचनेत शिक्षणामुळे बदल झाले आहेत.

**३.२.३.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आधुनिकीकरण प्रक्रियेचा गाभा धर्मनिरपेक्ष असतो असे द. ना. धनागरे यांनी म्हटले आहे.

२) राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंधांचा विकास करण्याच्या हेतूने युनो सारखी संस्था स्थापन झाली आहे.

३) शिक्षण हे भारतातील आधुनिकीकरणाचे प्रभावी साधन आहे असे योगेंद्रसिंग यांचे मत आहे.

४) पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांचा आधुनिक श्रेष्ठजनामध्ये समावेश होतो.

**३.२.४.१ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) खुल्या स्तरीकरणात गतिशीलतेला वाव असतो.

२) स्तंभीय सामाजिक गतिशीलतेचे उर्ध्वगामी व अधोगामी असे दोन प्रकार आहेत.

३) आधुनिक शिक्षणामुळे व्यवसायांच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत.

४) भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला.

५) आधुनिकीकरण म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात इष्ट व विवेकी परिवर्तन घडून येणे होय.

**३.२.४.२ ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ऑगस्ट कॉम्ट यांनी समाजात स्थैर्य निर्माण करणाऱ्या घटकांच्या अभ्यासाइतके महत्त्व परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांना दिले आहे.

२) मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल असे हॅरी जॉन्सन यांनी म्हटले आहे.

३) भारतातील लोकांना विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था या दोन संस्थात झालेल्या बदलाशी सुसंगती निर्माण करणे कठीण झाले होते.

४) सुशिक्षित वर्ग सामाजिक सुधारणेच्या चळवळी सुरू करणे.

## ३.६ स्वाध्याय

१) समाजीकरणाची उद्दिष्टे विशद करा.

२) सामाजिक स्तरीकरणाची परिणामे विशद करा.

३) आधुनिकीकरणाच्या संदर्भात शिक्षणाच्या कार्याची चर्चा करा.

४) शिक्षण व सामाजिक गतिशीलता यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

५) सामाजिक परिवर्तनातील शिक्षणाच्या भुमिकेची चर्चा करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


1) A sociological Approach to Indian Education : Dr. S S. Mathur.

2) Papers in the Sociology of Education Edited by : M. S. Gore, I.P. Desai, Suma Chitnis.

3) B. V. Shah, K. B. Shah : Sociology of Education Rawat Publications.

4) S. S. Chandra, Rajendra K. Sharma : Sociology of Education Atlantic Publishers, New Delhi.

5) डॉ. म. बा. कुंडले : शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

६) डॉ. सर्जेराव साळुंखे : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे -२.


❈ ❈ ❈

**सत्र १ : घटक ४**

# शिक्षणाचा अलिकडील काळातील विकास आणि शिक्षणासमोरील आव्हाने
# (Recent Development of Education and Challenges before Education)

**अनुक्रमणिका**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय-विवेचन

- ४.३.१ मूलोद्योगी शिक्षण आणि सामाजिक विकास
- ४.३.२ उच्च शिक्षण : व्यवस्था आणि कारभार
- ४.३.३ उच्च शिक्षण : समस्या आणि आव्हाने
- ४.३.४ शिक्षण आणि खाजगीकरण

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.१ उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास;

- मूलोद्योगी शिक्षण व सामाजिक विकास यांचे आकलन होईल.
- उच्च शिक्षणामधील व्यवस्था व कारभार यांचे स्वरूप समजावून घेता येईल.
- उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने स्पष्ट करता येतील.
- शिक्षण व खाजगीकरण यांच्यातील संबंधाचे स्वरूप विशद करता येईल.

## ४.२ प्रास्ताविक :

विद्यार्थी मित्रानो, शिक्षण आणि समाज या पेपरच्या अभ्यासक्रमातील चौथा घटक हा ''शिक्षणाचा अलिकडील काळातील विकास आणि शिक्षणासमोरील आव्हाने'' असा आहे. या घटकात तुम्हाला भारतात अलिकडील काळात जो शिक्षणाचा विकास घडून आलेला आहे त्याचे अध्ययन करावयाचे आहे. तसेच भारतातील शिक्षणासमोर जी अनेक आव्हाने आहेत ती देखील तुम्हाला समजावून घ्यावयाची आहेत. कोणताही समाज नेहमी स्थिर नसतो. त्यामध्ये सतत परिवर्तन होत असते. या परिवर्तनास अनेक घटक जबाबदार असतात. त्यापैकी एक महत्त्वाचा घटक असतो तो म्हणजे समाजात सुरू असलेली विकास प्रक्रिया हा होय. समाज आपल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात जसे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतो. हा विकास बऱ्याच प्रमाणात शिक्षण क्षेत्रातील विकासावर अवलंबून असतो. समाजाचा आर्थिक-सामाजिक विकास घडून येण्यासाठी समाजातील शिक्षण क्षेत्राचा विकास होणे गरजेचे असते. भारतीय समाजदेखील याला अपवाद नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने नियोजनबद्धपणे आपला आर्थिक-सामाजिक विकास घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू केले. हा विकास साध्य होण्यासाठी देशाचा प्रथम शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे हे ओळखून राज्यकर्त्यांनी त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. शैक्षणिक विकासाचे विविध कार्यक्रम व योजना सुरू केल्या. त्यासाठी प्रचंड निधी खर्च केला. यातूनच भारतात शैक्षणिक विकास घडून येण्यास चालना मिळाली. हा विकास तुम्हाला या घटकात समजावून घ्यावयाचा आहे. त्याचबरोबर शैक्षणिक विकासाच्या प्रक्रियेतून कांही नवीन प्रश्न, समस्या व आव्हाने शिक्षणक्षेत्रात निर्माण झालेली आहेत. या बाबींचाही अभ्यास तुम्हाला येथे करावयाचा आहे.

## ४.३ विषय विवेचन

भारतातील शिक्षणाचा अलिकडील काळात झालेला विकास व शिक्षणासमोरील आव्हाने यांचा ऊहापोह या घटकात केला जाणार आहे. हा ऊहापोह करताना आपण या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात मूलोद्योगी शिक्षण व सामाजिक विकास यांची चर्चा केलेली आहे. दुसऱ्या विभागात भारतातील उच्च शिक्षणाच्या संदर्भात ज्या विविध व्यवस्था निर्माण केलेल्या आहेत त्या व्यवस्था व उच्च शिक्षणाविषयीचा कारभार यांचा अभ्यास केलेला आहे. तिसऱ्या विभागात उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने यांची मीमांसा केलेली आहे. तर शेवटच्या चौथ्या विभागात शिक्षण व खाजगीकरणाची प्रक्रिया या विषयीचे विवेचन केलेले आहे. आता या चार विभागांचे क्रमशः विवेचन पाहू या.

### ४.३.१ मूलोद्योगी शिक्षण आणि सामाजिक विकास (Basic Education and Social Development)

शिक्षणाची अनेक उद्दिष्टे आहेत. सामाजिक विकास घडवून आणणे हे त्यापैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. परंपरागत भारतात शिक्षण हे केवळ उच्च जातींनाच घेता येत होते. स्त्रीशुद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे बहुसंख्यांक भारतीय जनता ही अडाणी व निरक्षर राहिली. त्यामुळे भारतीय समाजाची म्हणावी तशी प्रगती वा विकास होऊ शकला नाही. शिक्षणाभावी भारतीय समाज मागासलेला

राहिला. पुढे ब्रिटिश राजवटीत शिक्षण हे स्त्रीशुद्रासह सर्वांना खुले झाले. तथापि, ब्रिटिश राजवटीतील शिक्षण हे केवळ साक्षरतेचे शिक्षण होते. ब्रिटिशांचे भारतातील प्रशासन व्यवस्थितपणे चालावे यासाठी आवश्यक असणारे कारकून निर्माण करणे हे ब्रिटिश सत्तेचे शैक्षणिक उद्दिष्ट होते आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच ब्रिटिशांनी भारतात शिक्षणप्रसार करण्यावर भर दिला. भारतीय व्यक्ती व समाज यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणारे शिक्षण ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेले नव्हते. ब्रिटिशांच्या शिक्षणपद्धतीतील ही उणिव तत्कालीन अनेक समाजसुधारकांना तसेच राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांना जाणवली होती. महात्मा गांधी हे त्यापैकीच एक होते. महात्मा गांधी हे एक थोर विचारवंत होते. त्यांनी मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांविषयी आपले मौलिक विचार मांडलेले आहेत. शिक्षणाबाबतही त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत व्यापक आहे. त्यांच्या मते व्यक्तीस केवळ लिहिण्यावाचण्यास शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे. ''माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा सर्वांगिण विकास करणे म्हणजे शिक्षण होय.'' अशी त्यांनी शिक्षणाची व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात शिक्षणाद्वारे व्यक्तीचा व समाजाचाही विकास झाला पाहिजे. शिक्षणामुळे व्यक्ती ही चारित्र्यवान, स्वावलंबी, समाजाभिमूख व देशप्रेमी झाली पाहिजे. तिला स्वतःचा निर्वाह चालविण्याचे व जीवनातील समस्या सोडविण्याचे ज्ञान व कौशल्य शिक्षणातून मिळाले पाहिजे. यासंदर्भात त्यांनी '3H' ही संकल्पना मांडली. 3H म्हणजे Head (डोके), Heart (हृदय) आणि Hand (हात) होय. शिक्षणाद्वारे व्यक्तिचे डोके, हृदय व हात यांचा (म्हणजेच बौद्धिक, भावनिक व शारीरिक) विकास घडून आला पाहिजे. आपल्या या शैक्षणिक कल्पनेस मूर्त रूप देण्यासाठी गांधीजीनी एक विशेष योजना मांडली व ती म्हणजे मूलोद्योगी शिक्षण (Basic Education) योजना होय.

या ठिकाणी तुम्ही मूलोद्योगी शिक्षणाची योजना पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेणार आहात.

१) मूलोद्योगी शिक्षण योजनेचा प्रारंभ व नाव

२) मूलोद्योगी शिक्षण योजनेची उद्दिष्टे

३) मूलोद्योगी शिक्षण योजनेची तत्त्वे

४) मूलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये

५) मूलोद्योगी शिक्षण योजनेतील अभ्यासक्रम

६) मूलोद्योगी शिक्षणाचे शालेय वेळापत्रक

७) मूलोद्योगी शिक्षण देणारे शिक्षक व अध्यापन पद्धती

८) मूलोद्योगी शिक्षण योजनेचे गुणदोष

वरील प्रत्येक मुद्याचे आता सविस्तर विवेचन करू या.

## १) मूलोद्योगी शिक्षण योजनेचा प्रारंभ व नाव

दि. २२ आणि २३ ऑक्टोबर १९३७ रोजी वर्धा येथील मारवाडी हायस्कूलचा रजत जयंती समारंभ आयोजित केलेला होता. यानिमित्ताने महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण संमेलन वर्धा येथे आयोजित केले. या संमेलनास विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, डॉ. झाकीर हुसेन, नरेंद्र देव, प्रा. के. टी. शहा इत्यादीसह अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक, राष्ट्रीय नेते हजर होते. या संमेलनात गांधीजींनी आपली शिक्षणविषयक एक योजना मांडली. या योजनेवर सविस्तर विचार करण्यासाठी **डॉ. झाकीर हुसेन** यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने शिक्षणविषयक योजनेचा अभ्यासक्रम तयार करून फेब्रुवारी १९३८ च्या हरिपुरा येथील काँग्रेस अधिवेशनात मांडला. काँग्रेसने हा आराखडा मंजूर केला. पुढे ही शिक्षण योजना कांही मोजक्या शिक्षणसंस्थांमधून राबविली गेली. पुढे **बा. ग. खेर** यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात कांही महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविल्या. या शिफारसीनुसार पुढे गांधीजीप्रणीत ही शिक्षणविषयक योजना सर्वत्र सुरू करण्यात आली.

महात्मा गांधीजींनी सुचविलेली ही शिक्षण योजना 'नई तालीम' मूलभूत किंवा मूलोद्योगी तालीम, बुनियादी तालीम इत्यादी नावांनी ओळखली जाते. ही योजना वर्धा येथे मांडण्यात आल्याने तिला वर्धा योजना असेही म्हणतात. महात्मा गांधीजी तिला ''ग्रामोद्योगी राष्ट्रीय ग्रामशिक्षण'' योजना असे म्हणत असत. इंग्रजीत या योजनेस Basic Education म्हटले जाते. Basic शब्दाचा अर्थ मूलभूत असा आहे. तथापि, या शिक्षण योजनेत उद्योग-व्यवसायास अग्रक्रम दिलेला असल्याने 'मूलभूत शिक्षण' याऐवजी 'मूलोद्योगी शिक्षण' हेच नाव अधिक लोकप्रिय झालेले आढळते.

## २) मूलोद्योगी शिक्षण योजनेची उद्दिष्टे

या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

**अ) आदर्श नागरिक निर्मिती :** आपल्या हक्क व कर्तव्याविषयी अत्यंत जागरूक असणारे आदर्श नागरिक निर्माण करणे हे पहिले उद्दिष्ट आहे. डॉ. झाकीर हुसेन म्हणतात की, मूलोद्योगी शिक्षणातून सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या आदर्श विद्यार्थी निर्माण झाले पाहिजेत.

**ब) संस्कृती प्रेम :** मुलोद्योगी शिक्षणामधून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीविषयी प्रेम निर्माण करणे हे एक उद्दिष्ट आहे. ब्रिटिश शिक्षणपद्धतीमुळे भारतीय विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक आदर्शांचा व परंपरांचा विसर पडत चाललेला होता. म्हणून मूलोद्योगी शिक्षणातून विद्यार्थ्यांना आपल्या महान संस्कृतीची ओळख करून देणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले गेले.

**क) व्यक्तिमत्त्व विकास :** मूलोद्योगी शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे हे ही एक उद्दिष्ट मानले गेले. गांधीजी म्हणत पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक विकास होतो. हा विकास एकांगी ठरतो. मुलोद्योगी शिक्षणातून बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक व आध्यात्मिक विकासही साधला जाईल.

**ड) आर्थिक स्वावलंबन :** मूलोद्योगी शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यास आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे हे एक उद्दिष्ट आहे. गांधीजींच्या मते विद्यार्थ्याने शिक्षण घेत घेतच एखाद्या हस्तव्यवसायाचे कौशल्य आत्मसात करावे. म्हणजे शिक्षण पूर्ण झाल्यावर तो उद्योगव्यवसाय करून आपला निर्वाह चालवू शकेल. शिक्षण चालू असताना विद्यार्थी जे उत्पादन करतील त्यातून शाळेचा खर्च अंशतः तरी भागला पाहिजे असे गांधीजींचे मत होते.

**ई) सर्वोदय समाजाची निर्मिती :** समाजातील सर्वच घटकांचे हित साध्य होईल अशाप्रकारचा समाज निर्माण करणे हे मूलोद्योगी शिक्षणाचे एक प्रधान उद्दिष्ट आहे असे गांधीजी म्हणत. त्यासाठी केवळ व्यक्तिगत हिताचा विचार न करता संपूर्ण समाजाच्या हिताचा विचार करणारे निस्वार्थी, त्यागी, सेवाभावी, समाजप्रेमी विद्यार्थी मूलोद्योगी शिक्षणातून घडले पहिजेत असा त्यांचा आग्रह होता. थोडक्यात सर्वांचा अभ्युदय करणारे शिक्षण ते मूलोद्योगी शिक्षण असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता.

**फ) नैतिक गुणांचा विकास :** शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचा नैतिक विकास करणे हे ही एक उद्दिष्ट मानले आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना चारित्र्यनिर्मितीचे शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांवर सत्य, अहिंसा, प्रेम, नम्रता, सेवा, त्याग, प्रामाणिकपणा, दयाळूपणा, निष्ठा, बांधिलकी, संयम, परोपकार, निस्वार्थीपणा इत्यादी मूल्यांचे संस्कार शिक्षणाच्या माध्यमातून झाले पाहिजेत असे गांधीजी म्हणत. थोडक्यात सुसंस्कारीत / सुसंस्कृत असे नीतीमान विद्यार्थी घडविणे हे मूलोद्योगी शिक्षणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानलेले आहे.

### ३) मूलोद्योगी शिक्षण योजनेची तत्त्वे

मूलोद्योगी शिक्षण योजना ही कांही निश्चित अशा तत्त्वांवर आधारलेली आहे. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे :

**अ) सामान्यांना शिक्षण :** समाजातील केवळ मूठभर उच्चवर्णियांना शिक्षण न देता समाजातील सर्वसामान्य जनतेस शिक्षण देऊन शहाणे व उद्योगी करणे हे या योजनेचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. देशातील सर्वसामान्यांना शिक्षण मिळाले तरच ते उद्याच्या स्वतंत्र भारताचे जागरूक नागरिक बनतील असे गांधीजींना वाटत होते. म्हणूनच त्यांनी सर्वांना शिक्षण हे तत्त्व मूलोद्योगी योजनेत स्वीकारले.

**ब) निःशुल्क व सक्तीचे शिक्षण :** मूलोद्योगी शिक्षण हे निःशुल्क (मोफत) व सक्तीचे असावे हेही या योजनेचे एक तत्त्व आहे. भारतातील सर्वसामान्य जनता ही गरीब असून ती दीर्घकाळापासून शिक्षणापासून वंचित राहिलेली आहे. त्यामुळे शिक्षणासाठी खर्च करणे तिला शक्य नाही तसेच शिक्षण घेण्याची तिला प्रेरणाही नाही. त्यामुळे ती स्वतःहून शिक्षण घेण्यास तयार होणार नाही याची गांधीजींना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी आपल्या योजनेत शिक्षण हे मोफत व सक्तीने देण्याचे तत्त्व स्वीकारले.

**क) स्वावलंबी शिक्षण :** 'स्वावलंबनातून शिक्षण' हे या योजनेचे आणखीन एक महत्त्वाचे तत्त्व आहे. विद्यार्थ्यांना एखाद्या हस्तोद्योगाचे शिक्षण देऊन स्वावलंबी बनविले तरच ते शिक्षण घेऊ शकतील. शिवाय शिक्षण पूर्ण झाल्यावर स्वतःच्या पायावर उभे राहून आपला चरितार्थ चालवू शकतील. म्हणून मूलोद्योगी शिक्षणात स्वावलंबनाचे तत्त्व स्वीकारण्यात आले होते.

**ड) सामाजिक शिक्षण :** विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षण देणे हे देखील एक तत्त्व या योजनेत अंतर्भूत आहे. शिक्षणामुळे विद्यार्थी हा सामाजिक जीवनात योग्यपणे सहभागी होऊन आपली सामाजिक कर्तव्ये पार पाडण्यास समर्थ बनला पाहिजे अशी अपेक्षा या योजनेत असल्याने विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षण देण्याचे तत्त्व या शिक्षणात स्वीकारलेले दिसते.

**ई) कृतीशिल शिक्षण :** विद्यार्थ्यांना कृतीशिल किंवा कार्यप्रवण बनविणारे शिक्षण देणे असे एक तत्त्व या योजनेत आहे. लेखन, वाचन, श्रवण, मनन, चिंतन इत्यादी कौशल्यांबरोबरच कृती/क्रिया करणे या कौशल्यास प्राधान्य देण्याचे तत्त्व या योजनेत महत्त्वाचे मानलेले आहे. गांधीजींच्या मते खरे शिक्षण हे ज्ञानइंद्रियाबरोबरच कर्म इंद्रियांच्या वापरातून म्हणजेच कृती करण्यातून मिळते. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यास एखाद्या उद्योग-व्यवसायाचे म्हणजेच कृती करण्याचे शिक्षण देणे आवश्यक ठरते.

**फ) बालकेंद्रीत शिक्षण :** मूलोद्योगी शिक्षणाच्या केंद्रस्थानी बालक (७ ते १४ वर्षे वयोगटातील) आहे. या बालकांना कृतीच्या माध्यमातून शिक्षण देण्याचे तत्त्व या योजनेने स्वीकारलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे या योजनेत बालकांच्या मानसिकतेचा (Psychology) विचार केलेला दिसतो. मुलांचे कोवळे वय विचारात घेऊनच त्यांना पेलेल/झेपेल अशा पद्धतीने हसतखेळत शिक्षण देण्याचे तत्त्व या योजनेत आहे. बालकांना शिक्षण हे निरस व कंटाळवाणे न होता ते आनंददायी होईल अशा पद्धतीने देण्यावर ही योजना भर देते.

**ग) स्वाश्रयी शिक्षण :** ही योजना स्वाश्रयी तत्त्वावर भर देते. म्हणजे विद्यार्थ्यांनी श्रम करून उत्पादीत केलेला माल विकून जो पैसा येईल त्यातून शाळेचा खर्च व शिक्षकांचा पगार भागविला गेला पाहिजे. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहण्याची पाळी येऊ नये असे गांधीजींना वाटत असे. थोडक्यात शाळेचा खर्च विद्यार्थ्यांच्या श्रमातून भागविला पाहिजे असे तत्त्व गांधीजींच्या या योजनेत आहे.

**घ) सांस्कृतिक उपक्रमांचा अंतर्भाव :** मूलोद्योगी शिक्षणात विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या अंतर्भावाचे तत्त्व ही स्वीकारलेले आहे. शाळेमध्ये विविध सण, समारंभ, उत्सव, थोर व्यक्तींच्या जयंत्या, वादविवाद, चर्चा, सभा, संमेलने, शिबीरे, श्रमदान इत्यादी उपक्रम राबवावेत व त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग व पुढाकार असावा, ज्यामुळे त्यांना आपल्या संस्कृतीची ओळख तर होईलच शिवाय त्यांच्या अंगच्या सुप्त कलागुणांना वावही मिळेल.

**च) समवायाचे तत्त्व :** मूलोद्योगी शिक्षण योजना ही समवायाच्या तत्त्वावर आधारलेली आहे. म्हणजे या योजनेत विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे शिक्षण हे समवाय तत्त्वाद्वारे देणे अभिप्रेत आहे. मानवी जीवन व निसर्ग यासंबंधीच्या सर्व बाबी विद्यार्थ्यांना एक समवायच्छेदेकरून कृतीच्या माध्यमातून शिकविणे अभिप्रेत आहे.

## ४) मूलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये

**अ) कालावधी :** मुलोद्योगी शिक्षणाचा कालावधी ७ वर्षाचा असून यात ७ ते १४ वर्षे वयोगटातील मुलामुलींना शिक्षण देणे अभिप्रेत आहे.

**ब) निःशुल्क व सक्ती :** मूलोद्योगी शिक्षण हे निःशुल्क व सक्तीचे आहे. प्रत्येक बालकास सक्तीने व मोफत शिक्षण देणारी ही योजना आहे.

**क) माध्यम :** मूलोद्योगी शिक्षण हे विद्यार्थ्यांत त्यांच्या मातृभाषेतून दिले पाहिजे.

**ड) हस्तव्यवसाय :** संपूर्ण शिक्षण हे एखाद्या मूलभूत व्यवसायाशी संबंधित असावे. हा व्यवसाय कोणता असावा हे विद्यार्थी व समाज यांच्या गरजा विचारात घेऊन ठरवावे. निवडलेल्या विषयाचे शास्त्रीय व सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवावे. या व्यवसायाच्या शिक्षणातून पुढे विद्यार्थ्यास आपला चरितार्थ चालविता आला पाहिजे.

**ई) जीवनाभिमुखता :** विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे जीवनाभिमुख असावे. म्हणजे त्यांना दिले जाणारे शिक्षण हे त्यांच्या जीवनाशी निगडीत असावे. त्यांचे कुटुंब, समुदाय (गांव), प्रदेश, राष्ट्र इत्यादीशी हे शिक्षण संबंधित असावे.

**फ) सहशिक्षण :** इ. ५ वी पर्यंतचे शिक्षण हे सहशिक्षण असावे. म्हणजे मुलामुलींना इ. ५ वी पर्यंत एकत्र व समान शिक्षण द्यावे. त्यानंतर मुलींना गृहविज्ञान हा ऐच्छिक विषय ठेवण्याचे स्वातंत्र्य असावे.

ग) इंग्रजी भाषा, धर्म, पाठ्यपुस्तके, बाह्य परीक्षा इत्यादींना शिक्षणात स्थान नसावे.

**५) मूलोद्योगी शिक्षण योजनेतील अभ्यासक्रम**

वैयक्तिक तसेच सामाजिक विकासाच्यादृष्टीने उपयुक्त ठरेल असा अभ्यासक्रम या योजनेमध्ये तयार केलेला आढळतो. या अभ्यासक्रमात पुढील विषयांचा समावेश केलेला आहे.

**अ) मूलभूत हस्तव्यवसाय :** यामध्ये शेती, सुतकताई, विणकाम, सुतारकाम, कुंभारकाम, चर्मोद्योग, कागद उद्योग, मत्स्योत्पादन, फलोत्पादन, बागकाम, गृहविज्ञान, स्थानिकदृष्ट्या महत्त्वाचा असा व्यवसाय इत्यादीचा अंतर्भाव आहे. स्थानिक गरजा व पर्यावरण यांना अनुसरून हस्तव्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

**ब) भाषा :** विद्यार्थ्याला त्याच्या मातृभाषेचे ज्ञान देणे व ज्यांची मातृभाषा हिंदी नाही त्यांना हिंदी भाषा शिकविणे.

**क) गणित :** जीवनात आवश्यक असणारी गणिती कौशल्ये शिकविणे.

**ड) सामाजिक विज्ञाने :** इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे विषय शिकविणे.

**ई) सामान्य विज्ञान :** निसर्गातील घटकांचा अभ्यास, वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, आरोग्यशास्त्र, खगोलशास्त्र, शास्त्रज्ञांच्या जीवनकथा इत्यादी शिकविणे.

**फ) कला :** गीत, संगीत, चित्रकला इत्यादी शिकविणे.

**ग) शारीरिक शिक्षण :** खेळ, व्यायाम, कवायत इत्यादी शिकविणे

वरील सर्व विषय हे केवळ बंदीस्त वर्गात व पुस्तकांच्या माध्यमातून न शिकविता कृतीच्या माध्यमातून शिकविणे अभिप्रेत आहे. शिक्षकांनी शिकविण्याचे काम यंत्रवत न करता प्रायोगिक पद्धतीने शिकवावे.

अनुभवातून सुधारणा करीत जीवनाभिमुख शिक्षण द्यावे. ज्याचा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संबंध नाही असे ज्ञान त्यांना देऊ नये असे गांधीजींना वाटे.

### ६) मूलोद्योगी शिक्षणाचे शालेय वेळापत्रक

मूलोद्योगी शिक्षण देणाऱ्या शाळेचे वेळापत्रक निश्चित केलेले आहे. वर्षभरात शाळेच्या कामाचे दिवस २८८ तर प्रत्येक महिन्यात २४ दिवस असावेत अशी अपेक्षा आहे. दररोज साडेपाच तास अध्ययन–अध्यापनाचे काम चालावे असे सुचविले आहे. या साडेपाच तासांची विभागणी पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | विषय | वेळ |
|---|---|---|
| १. | हस्तव्यवसाय | ३ तास २० मिनिटे |
| २. | संगीत, चित्रकला व गणित | ४० मिनीटे |
| ३. | मातृभाषा | ४० मिनीटे |
| ४. | सामाजिक विज्ञाने व सामान्य विज्ञान | ३० मिनीटे |
| ५. | शारीरिक शिक्षण | १० मिनीटे |
| ६. | मधली सुट्टी | १० मिनीटे |

### ७) मूलोद्योगी शिक्षण देणारे शिक्षक व अध्यापन पद्धती

मूलोद्योगी शिक्षण योजनेत शिक्षकाला महत्त्वाचे स्थान आहे. या शिक्षकाला समवाय तत्त्वानुसार विविध विषय शिकवावयाचे असल्याने त्याला त्या सर्व विषयांचे ज्ञान असणे आवश्यक ठरते. या योजनेत हस्तव्यवसाय हा प्रमुख विषय असून त्याची निवड स्थानिक गरजा व पर्यावरणाला अनुसरून करावयाची असल्याने संबंधित शिक्षकासही स्थानिक गरजा व पर्यावरणाचे यथार्थ ज्ञान असणे अपेक्षित असल्याने असे ज्ञान असणारा शिक्षकच या योजनेत नेमला गेला. पुरुषापेक्षा महिला शिक्षकास प्राधान्य दिले गेले. या योजनेत शिक्षकांच्या प्रशिक्षणाचाही विचार केलेला दिसतो. हे प्रशिक्षण दीर्घकालीन व अल्पकालीन अशा दोन प्रकारचे आहे. सद्या अध्यापनाचे काम न करणाऱ्या व्यक्तीसाठी म्हणजेच भावी शिक्षकांसाठी दीर्घकालीन (३ वर्षाचे) प्रशिक्षणाची तरतूद आहे तर शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्यांसाठी सेवांतर्गत असे. अल्पकालीन (१ वर्षाचे) प्रशिक्षणाची तरतूद आहे. व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान २ वर्ष अध्यापन कार्य केल्याचा अनुभव असणाऱ्या शिक्षकास अल्पकालीन प्रशिक्षणास प्रवेश मिळेल तर हायस्कुलची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस दीर्घकालीन प्रशिक्षणास प्रवेश मिळेल. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीस मूलोद्योगी शिक्षणातील सर्व विषयांचे ज्ञान दिले जाई. तसेच हस्तव्यवसायाचेही प्रशिक्षण दिले जाई.

मूलोद्योगी शिक्षणात सामान्य अध्यापन पद्धती ऐवजी वेगळी अध्यापन पद्धती वापरली जाई. हस्तव्यवसायास प्राधान्य असल्याने शिक्षकाला उपक्रम व अनुभव या आधारे आपली अध्यापन पद्धती

विकसित करता येत असे. कमी वेळेत अधिक ज्ञान देण्याचा प्रयत्न होई. प्राथमिक वर्गात विद्यार्थ्यांना मातृभाषेचे ज्ञान दिले जाई. पुढे लेखन-वाचन कौशल्ये शिकविली जात. त्याबरोबरच एखाद्या हस्तव्यवसायाची कौशल्येही शिकविली जात. बहुतेक विषय हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिकवले जात. जे विषय अशापद्धतीने शिकविता येत नसत ते अन्य पद्धतीने शिकविले जात. सामाजिक विज्ञाने, सामान्य विज्ञान, गणित हे विषय समवाय पद्धतीने शिकविले जात. हस्तव्यवसाय, नैसर्गिक पर्यावरण, सामाजिक परिस्थिती यांच्या माध्यमातून विविध विषयांत समवाय निर्माण केला जाई. विद्यार्थ्यास हस्तव्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य होते. अशाप्रकारे सात वर्षात विद्यार्थी एका हस्तव्यवसायाचे व इतर विषयांचे ज्ञान मिळविल व हे ज्ञान त्याला भावी जीवनात स्वावलंबी बनविण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा होती.

### ८) मूलोद्योगी शिक्षण योजनेचे गुणदोष

महात्मा गांधीप्रणित ही योजना स्वातंत्र्यपूर्व काळात १९३७ ते १९४० या कालावधीत अनेक प्रांतात राबविली गेली. गांधीजींच्या मते भारतासारख्या खेड्यांच्या देशात आर्थिक-सामाजिक विकास घडून आणणारी ही एक उत्कृष्ट योजना होती. ते म्हणत मूलोद्योगी शिक्षण ही मी देशाला दिलेली सर्वोत्तम देणगी आहे. त्यामुळे या योजनेच्या गुणदोषांची चर्चा करणे आवश्यक आहे.

**मूलोद्योगी शिक्षणाचे गुण पुढीलप्रमाणे :**

**१) शिक्षण प्रसारासाठी उपयुक्त :** मूलोद्योगी शिक्षण हे मोफत व सक्तीचे असल्याने गरीब व परंपरेने अशिक्षित असलेल्या जनतेत शिक्षणप्रसार करण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशी योजना होती.

**२) व्यवसाय शिक्षण :** या शिक्षणात व्यवसाय शिक्षणावर विशेष भर दिला असल्याने विद्यार्थ्यांना लहानपणातच एखाद्या व्यवसायाची कौशल्ये आत्मसात करता येतात व भावी जीवनात स्वतःच्या पायावर उभे राहणे म्हणजेच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे शक्य होते. परिणामी, बेरोजगाराची समस्या व्यक्तीला भेडसावत नाही.

**३) स्वआश्रयी शिक्षण** : या योजनेत विद्यार्थी शिकत असताना समाजोपयोगी वस्तूंचे उत्पादन करतात व त्यातून अर्थाजन करतात. या अर्थाजनातून शाळेचा खर्च, शिक्षकांचे वेतन भागविले जाते. त्यामुळे शिक्षण क्षेत्र स्वआश्रयी/स्वावलंबी बनते. शिक्षणक्षेत्रास शासन व समाजातील दानशूर व्यक्तींवर पैशासाठी अवलंबून राहावे लागत नाही. विद्यार्थी हा स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतःच भागवितो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण होतो.

**४) सामाजिक विकासास चालना :** मूलोद्योगी शिक्षण हे सामाजिक विकासास चालना देणारे आहे. कारण या शिक्षणात समाजाच्या गरजांना प्राधान्य दिलेले आहे. स्थानिक लोकांच्या गरजा, तेथील सामाजिक परिस्थिती, नैसर्गिक पर्यावरण इत्यादींचा विचार करून अभ्यासक्रम शिकविला जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये स्वविकासाबरोबरच समाज विकासाचीही प्रेरणा निर्माण होण्यास मदत होते.

**५) नैतिक विकास :** मूलोद्योगी शिक्षणातून विद्यार्थ्यांवर स्वावलंबन, परोपकार, प्रामाणिकपणा, दयाळूपणा, प्रेम, निष्ठा, बांधिलकी, सत्य, अहिंसा, संयम इत्यादी सद्गुणांचे संस्कार करणे अभिप्रेत

असल्याने विद्यार्थ्यांचा नैतिक विकास घडून येतो. त्यांच्या ठिकाणी आदर्श नागरिकांचे गुण निर्माण होतात. असे नागरिक हे देशाच्या व समाजाच्या विकासात भरीव योगदान देऊ शकतात.

**६) स्वायत्तता :** मूलोद्योगी शिक्षणात विद्यार्थी व शिक्षकांना मोठी स्वायत्तता लाभते. आपल्या आवडीनुसार हस्तव्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यास लाभते. बंदिस्त वर्गात न शिकता नैसर्गिक वातावरणात मुक्तपणे हसतखेळत हस्तव्यवसायाच्या माध्यमातून विविध विषय शिकता येतात. बाह्य परीक्षा, साचेबंद पाठ्यपुस्तके यांचा जाच विद्यार्थ्यांना सोसावा लागत नाही. ''सब घोडे बारा टक्के'' असे न करता प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या स्वाभाविक गतीनुसार शिकविले जाते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेतून मधेच गळत नाही. शिक्षकांनाही अध्यापनाचे कार्य स्वायत्तपणे करता येते. कोणत्यातरी विशिष्ट पद्धतीनेच अध्यापन न करता आपणास येणाऱ्या अनुभवातून शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धती अवलंबू शकतात. शिवाय वेगवेगळ्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या पद्धतीही वापरू शकतात.

**७) कृतीशिल शिक्षण :** मूलोद्योगी शिक्षण हे प्रत्यक्ष कृतीवर भर देणारे असल्याने ते अधिक फायदेशीर ठरते. प्रत्येक विषय कृतीच्या माध्यमातून शिकविला जातो. त्यामुळे तो विद्यार्थ्यांना चटकन समजू शकतो. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता कृतीद्वारे ज्ञानप्राप्ती यावर भर असल्याने हे ज्ञान जीवनातील समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त ठरते.

**८) श्रमास महत्त्व :** मूलोद्योगी शिक्षणात श्रमास महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण घेताना विद्यार्थी बौद्धिक श्रमाबरोबरच शारीरिक श्रमही मोठ्या आवडीने करतो. केवळ पुस्तकी ज्ञान घेतलेल्या पांढरपेशीय व बुद्धिजीवी व्यक्तीप्रमाणे त्याला शारीरिक श्रमाची लाज वाटत नाही. बालपणापासून उत्पादक कार्ये करण्याची सवय विद्यार्थ्यांना मूलोद्योगी शिक्षणामुळे लागते. त्यामुळे शारीरिक श्रमास प्रतिष्ठा व महत्त्व प्राप्त होते. गांधीजींच्या मते श्रमप्रतिष्ठा हा मूलोद्योगी शिक्षणाचा मोठा गुण आहे.

**मूलोद्योगी शिक्षणाचे दोष**

मूलोद्योगी शिक्षणाचे वरीलप्रमाणे कांही गुण/फायदे असले तरी हे शिक्षण पूर्णतः निर्दोष नाही. यामध्ये कांही दोष देखील आहेत. टिकाकारांच्या मते या शिक्षणातील प्रमुख दोष पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मर्यादित योजना :** मूलोद्योग शिक्षण ही अनेक दृष्टीने मर्यादित अशी योजना ठरते. कारण ही योजना केवळ प्राथमिक शिक्षणापुरती मर्यादित असून तिच्यात माध्यमिक व उच्च शिक्षणाचा विचार केलेला नाही. शिवाय ही योजना केवळ ग्रामीण भागासाठी उपयुक्त असून शहरी भागासाठी उपयुक्त नाही असे टिकाकार म्हणतात. तसेच जेथे विद्यार्थी संख्या कमी आहे, तेथेच ही योजना राबविणे शक्य आहे. जेथे विद्यार्थी संख्या जास्त आहे तेथे ही योजना राबविणे कठीण आहे. प्रत्येक विषय हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिकविण्यावर ही योजना भर देते तथापि, हे अनेक विषयांच्या बाबतीत शक्य नाही. एकंदरीत ही शिक्षण योजना व्यापक नसून मर्यादित आहे हा तिचा प्रमुख दोष म्हणता येतो.

**२) आदर्श योजना :** मूलोद्योगी शिक्षण ही अत्यंत आदर्शवादी योजना आहे. ती कल्पनारम्यतेवर आधारलेली असल्याने वास्तविकता/व्यावहारिकता यापासून खूपच दूर आहे असेही अनेकांना वाटते. ही योजना व्यवहारात शंभर टक्के साकार करणे कठीण आहे.

**३) सदोष अभ्यासक्रम व वेळापत्रक :** मूलोद्योगी शिक्षणाच्या अभ्यासक्रमात व वेळापत्रकात हस्तव्यवसायावर अतिरिक्त भर दिलेला असून अन्य विषयांना पुरेसा न्याय दिलेला नाही. विज्ञान-तंत्रज्ञान, गणित, सामाजिक विज्ञाने यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी पर्याप्त वेळ दिलेली नाही. वर्षातील २२८ दिवस शालेय शिक्षण चालावे ही अपेक्षाही ७ ते १४ वयोगटातील बालकांच्यादृष्टीने डोईजड वाटते.

**४) अवास्तव अपेक्षा :** मूलोद्योगी शिक्षणात विद्यार्थी व शिक्षकाकडून अनेक अवास्तविक अपेक्षा केलेल्या आहेत. उदा. विद्यार्थ्यांनी उत्पादन करून शाळेचा खर्च व शिक्षकाचे वेतन भागवावे. तसेच शिक्षकांचे विविध व्यवसायाची कौशल्ये व विविध विषयांचे ज्ञान मिळवावे. प्रत्येक विषय हस्तव्यवसायाच्या माध्यमातूनच शिकवावा इत्यादी. या अपेक्षा प्रत्यक्ष व्यवहारात पूर्ण होण्याची शक्यता नाही.

**५) कालविसंगत :** मूलोद्योग शिक्षण हे कालविसंगत आहे. कारण त्यामध्ये सुतकताई, विणकाम यासारख्या हस्तव्यवसायावर खूपच भर दिलेला आहे. तथापि, आज विज्ञान व तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे पूर्वीच्या सर्वच हस्तव्यवसायाचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण (यांत्रिकीकरण व स्वयंचलन) घडून आलेले आहे. त्यामुळे कारखान्यात यंत्राद्वारे कमी वेळात व कमी श्रमात अधिकाधिक व सुबक उत्पादन होत आहे. अशा स्थितीत हस्तव्यवसायाच्याद्वारे उत्पादन करण्याचा आग्रह धरणे हे कालविसंगत ठरते.

**६) इंग्रजी भाषा व धर्म यांकडे दुर्लक्ष :** मूलोद्योगी शिक्षणात इंग्रजी भाषा व धार्मिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केलेले आहे. आज इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे माध्यम ठरली आहे. तसेच आधुनिक काळातील बहुतेक सर्व प्रकारचे ज्ञान हे इंग्रजीमध्येच ग्रंथबद्ध झालेले आहे. शिवाय आजच्या माहिती-तंत्रज्ञान यंत्रणेतही इंग्रजीचेच प्राबल्य आहे. अशा स्थितीत इंग्रजी भाषेच्या अभ्यासास प्राथमिक स्तरावरील शिक्षणात स्थान नसणे ही बाब मान्य होणारी नाही. त्याचबरोबर मूलोद्योगी शिक्षणात धार्मिक शिक्षणासही स्थान दिलेले नाही ही बाबही अनेकांना दोषपूर्ण वाटते. कारण धार्मिक शिक्षणातून व्यक्तीवर नैतिकतेचे/सद्‌गुणांचे संस्कार करता येतात. सर्वच धर्म हे नैतिकतेचे शिक्षण देतात. व्यक्तीच्या वर्तनास वळण देण्याचे, त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य धर्म प्रभावीपणे करतो. त्यामुळे धार्मिक शिक्षण आवश्यक आहे असे कांही विद्वानांना वाटते. मूलोद्योगी शिक्षणात धर्माचे हे महत्त्व दुर्लक्षित केलेले आहे. मूलोद्योगी शिक्षणातील वरील उणिवा/दोष असल्याने हे शिक्षण अनेकांना कालबाह्य स्वरूपाचे वाटू लागले. हे शिक्षण १९६५ पर्यंत कसेबसे टिकून राहिले व त्यानंतर ते बंद झाले.

वरीलप्रमाणे मूलोद्योगी शिक्षणात अनेक दोष असले तरी त्याचे महत्त्व नाकारता येत नाही. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे हे तत्त्व स्वातंत्र्यानंतर देशाने राज्यघटनेत स्वीकारलेले आहे. कोठारी आयोगानेही 'कार्यानुभव' हा विषय अभ्यासक्रमात असावा अशी जी शिफारस केली होती तिचे मूळ मूलोद्योगी शिक्षणातच आढळते. आज सुशिक्षिताची बेरोजगारी सतत वाढत आहे व ती दूर करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणावर भर देण्याची गरज प्रतिपादन केली जात आहे. यावरून मूलोद्योगी शिक्षणात व्यावसायिक शिक्षणावर दिला जाणारा भर कसा योग्य आहे हे लक्षात येते. मूलोद्योगी शिक्षणात श्रमास दिली जाणारी प्रतिष्ठा ही गोष्टही सार्वत्रिक स्वरूपात स्वीकारार्हच ठरते.

## ४.३.२ उच्च शिक्षण : व्यवस्था आणि कारभार (Higher Education : Systems and Governance)

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या दुसऱ्या विभागात तुम्ही आता उच्च शिक्षणासाठी असलेल्या विविध व्यवस्थांचा अभ्यास करणार आहात. तसेच त्यांचा उच्च शिक्षणासंबंधीचा कारभार कसा चालतो हे ही अभ्यासणार आहात.

तत्त्वतः शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया मानली जाते. तथापि, औपचारिक शिक्षण म्हणजेच शाळा-महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण हे कालबद्ध स्वरूपाचे असते. हे कालबद्ध शिक्षण विविध स्तरांत विभागलेले आढळते. साधारणपणे पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण इत्यादी स्तरांत किंवा पातळ्यामध्ये शिक्षण प्रक्रिया विभागलेली आढळते. या प्रत्येक स्तरावरील शिक्षण देण्यासाठी विविध व्यवस्था निर्माण केलेल्या आहेत. या व्यवस्थांच्याद्वारे त्या त्या स्तरावरील शैक्षणिक कारभार चालवला जातो. या ठिकाणी तुम्ही भारतातील उच्च शिक्षणाच्या संदर्भात निर्माण केलेल्या विविध व्यवस्थांचा व त्यांच्या कारभाराचा अभ्यास करणार आहात. उच्च शिक्षण हा शिक्षण प्रक्रियेतील अंतिम व सर्वोच्च असा स्तर आहे. ''साधारणपणे महिविद्यालय आणि विद्यापीठ या शैक्षणिक संस्थामधून दिले जाणारे शिक्षण म्हणजे उच्च शिक्षण होय.'' दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येते की, ''पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर (Graduate & Post-Graduate levels) दिले जाणारे शिक्षण हे उच्च शिक्षण ठरते.'' भारतात प्राचीन काळापासून उच्च शिक्षणाची उज्ज्वल परंपरा आहे. बौद्ध काळात भारतात नालंदा, तक्षशिला, वल्लभी, नालंदा, विक्रमशीला इत्यादी विद्यापीठे स्थापन झालेली होती व त्यामधून दिले जाणारे उच्च शिक्षण घेण्यासाठी देशोविदेशातून विद्यार्थी येथ असत. मात्र आधुनिक काळातील उच्च शिक्षणाचा प्रारंभ ब्रिटिश राजवटीत झाला. **चार्लस वूडच्या** खलित्यातील शिफारसीनुसार १८५७ मध्ये कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे विद्यापीठे स्थापन करण्यात आली. तसेच प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते सुरू करून शिक्षण संचालक, उपसंचालक इत्यादींची नियुक्ती केली गेली. प्रत्येक विद्यापीठाच्या क्षेत्रात येणारी महाविद्यालये ही त्या विद्यापीठाशी संलग्न केलेली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्च शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन आयोग स्थापन केला. या आयोगाच्या शिफारशीनुसार उच्चशिक्षणासाठी विविध व्यवस्था निर्माण करण्यात आल्या. पुढे १९६४ मध्ये प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय ह्या तीनही स्तरावरील शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी डॉ. डी. एस. कोठारी आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या शिफारशींचीही अंमलबजावणी करण्यात आली. आज भारतात उच्च शिक्षणाच्या संदर्भात असलेल्या विविध व्यवस्था पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) शिक्षण मंत्रालय** (Ministry of Education) : ब्रिटिश काळात शिक्षणाचा कारभार पाहण्यासाठी सरकारने शिक्षण खाते (Education Department) सुरू केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण खात्याचे रूपांतर शिक्षण मंत्रालयात करण्यात आले. भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षणाचे व्यवस्थापन पाहण्यासाठी केंद्रीय व्यवस्था (Federal System) व राज्य व्यवस्था State System) अशा दोन व्यवस्था निर्माण केल्या. १९५७ मध्ये स्वतंत्र असे केंद्रीय शिक्षण आणि शास्त्रीय संशोधन मंत्रालय निर्माण केले गेले. पुढे

१९५९ मध्ये कारभाराच्या सोयीसाठी या मंत्रालयाचे शिक्षण मंत्रालय व शास्त्रीय संशोधन मंत्रालय निर्माण केले गेले. पुढे १९५९ मध्ये कारभाराच्या सोयीसाठी या मंत्रालयाचे शिक्षण मंत्रालय व शास्त्रीय संशोधन व सांस्कृतिक व्यवहार असे दोन स्वतंत्र विभाग केले गेले. शिक्षणाच्या व्यवस्थापनाचे कार्य तीन स्तरावर सुरू झाले. १) केंद्र शासन, २) राज्य शासन, ३) स्थानिक स्वशासन. यापैकी उच्च शिक्षणाचे व्यवस्थापन केंद्र तसेच राज्य शासन स्तरावर केले जाते. केंद्र शासनाचे जे विविध विभाग किंवा मंत्रालये आहेत त्यापैकी शिक्षण मंत्रालय हे एक महत्त्वाचे मंत्रालय आहे. राजीव गांधींच्या पंतप्रधान पदाच्या काळात शिक्षण मंत्रालयास **''मनुष्यबळ विकास मंत्रालय (Human Resources Development Ministry)"** असे व्यापक नाव देण्यात आले आहे. या मंत्रालयास एक कॅबिनेट दर्जाचा मंत्री व त्याच्या मदतीस राज्यमंत्री व गरजेनुसार उपमंत्री नेमला जातो. त्यांची नेमणूक पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती करतात. या मंत्र्यांना तांत्रिक व प्रशासकीय सल्ला व साहाय्य देण्यासाठी सचिव, उपसचिव, संयुक्त सचिव, सहसचिव व अन्य कर्मचारी असतात. उच्च शिक्षणाच्या संदर्भत हे केंद्रीय मंत्रालय पुढील प्रमुख कार्ये पार पाडते.

१) उच्च शिक्षणासंबंधीची धोरणे ठरविणे.

२) देशातील विविध प्रकारच्या विद्यापीठांच्या प्रश्नांचा व अडचणींचा विचार करणे.

३) आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शिक्षणासंबंधीच्या प्रश्नांचा विचार करणे.

४) केंद्रीय विद्यापीठांचे व्यवस्थापन करणे.

५) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक व सांस्कृतिक विभागाशी संपर्क ठेवून विविध उपक्रम राबविणे इत्यादी.

या मंत्रालयास साहाय्यक अशा विविध संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १) केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ, २) विद्यापीठ अनुदान आयोग, ३) अखिल भारतीय माध्यमिक शिक्षण परिषद, ४) अखिल भारतीय प्राथमिक शिक्षण परिषद, ५) अखिल भारतीय महिला शिक्षण परिषद, ६) राष्ट्रीय ग्रामीण उच्च शिक्षण परिषद, ७) केंद्रीय समाज कल्याण मंडळ ह्या प्रमुख संघटना आहेत. त्यापैकी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ व विद्यापीठ अनुदान आयोग या दोन संघटना उच्च शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यापीठ अनुदान आयोगाची चर्चा पुढे सविस्तरपणे केलेली आहे.

केंद्र शासनाप्रमाणेच राज्य शासनामध्येही शिक्षण मंत्रालय असून त्याचा कारभार पाहण्यासाठी एक कॅबिनेट दर्जाचा मंत्री व एक राज्यमंत्री असतो. त्यांची नियुक्ती मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यपाल करतात. त्यांना तांत्रिक सल्ला व साहाय्य देण्यासाठी सचिव, उपसचिव, सहसचिव व इतर कर्मचारी वर्ग असतो. आपापल्या राज्यातील उच्च शिक्षणाचा कारभार पाहण्याचे काम हे मंत्रालय करते. राज्याचे शैक्षणिक धोरण व त्यातील बदल व सुधारणा तसेच शिक्षणासाठी लागणारी आर्थिक तरतूद मंत्रीमंडळाकडून मंजूर करून घेण्याचे प्रमुख काम हे मंत्रालय करते. मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या उच्च शैक्षणिक धोरणाची कार्यवाही करण्याचे काम उच्च शिक्षण संचालनालय करते. या संचालनालयाचे काम पाहण्यासाठी एक उच्च शिक्षण संचालक व कांही सहसंचालक नियुक्त केलेले असतात.

**ब) विद्यापीठ अनुदान आयोग** (University Grants Commission) : उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील ही एक महत्त्वाची व्यवस्था आहे. या आयोगाची स्थापना स्वातंत्र्योत्तर काळात झाली असली तरी ब्रिटिश राजवटीतच लहान स्वरूपात त्याचा प्रारंभ झालेला दिसतो. भारतातील शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या सार्जंट समितीच्या शिफारशीनुसार इ.स. १९४५ मध्ये 'विद्यापीठ अनुदान समिती स्थापन केली होती. मात्र १९४९ मध्ये तिचे कार्य बंद झाले. पुढे डॉ. राधाकृष्णन आयोगाच्या शिफारशीनुसार इंग्लंडमधील विद्यापीठ अनुदान मंडळाच्या धर्तीवर इ.स. १९५३ मध्ये निर्मिती केली. २८ डिसेंबर १९५३ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. मौलाना आझाद यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. संसदेने केलेल्या 'विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६' नुसार आयोगाची प्रत्यक्ष स्थापना झाली. हा आयोग एक स्वायत्त शैक्षणिक संस्था असून त्याचा कारभार मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत येतो.

**रचना :** या आयोगास एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असून इतर १० सदस्य असतात. अध्यक्षाची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते. इतर सदस्य केंद्रशासनाद्वारे नेमले जातात. त्यापैकी तीन सदस्य विद्यापीठांच्या कुलगुरूमधून व तीन सदस्य केंद्रशासनाच्या अधिकारी वर्गामधून नियुक्त केलेले असतात. ऊर्वरीत सदस्य हे नामांकित शिक्षणतज्ज्ञ असतात. आयोगाला मदत करण्यासाठी सचिव, उपसचिव, सहसचिव व अन्य कर्मचारी वर्ग असतो.

आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून त्याची विभागीय कार्यालये सहा आहेत. ती पुणे, हैद्राबाद, भोपाळ, कोलकत्ता, गोहट्टी व बंगळूर या शहरांत आहेत.

**कार्ये :** विद्यापीठीय शिक्षणाचा विकास व एकसुत्रीकरण करणे तसेच परीक्षा व संशोधन यांच्याबाबतच्या दर्जाचे निर्धारण करून त्यांचा विशिष्ट दर्जा टिकविण्यास मदत करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजणे हे या आयोगाचे सर्वसाधारण कर्तव्य आहे. या अनुषंगाने हा आयोग पुढील कार्ये पार पाडतो.

१) देशातील विद्यापीठांच्या आर्थिक गरजांची पाहणी व चौकशी करणे.

२) विद्यापीठांना विविध प्रकारची अनुदाने (grants) देणे.

३) विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्यादृष्टीने उपाय सुचविणे.

४) एखाद्या सामान्य किंवा विशेष उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी विद्यापीठांचे अनुदान निर्धारित करण्याच्यादृष्टीने केंद्र व राज्य शासनास सल्ला देणे.

५) नवीन विद्यापीठ स्थापन करणे व विद्यापीठांच्या कार्यक्रमांचा विस्तार करणे याबाबतचा सल्ला (विचारल्यास) शासनास देणे.

६) देशातील तसेच परदेशातीलही विद्यापीठीय शिक्षणाबाबतची माहिती संकलीत करून ती विद्यापीठांना पुरविणे.

७) केंद्रशासन, राज्यशासन, एखादे विद्यापीठ यांनी विचारलेल्या एखाद्या प्रश्नावर सल्ला देणे.

८) उच्च शिक्षणाचा विस्तार व प्रसार करण्यासंबंधीची कार्ये पार पाडणे. इत्यादी.

विद्यापीठ अनुदान आयोग ही संस्था केवळ अनुदान वा निधी पुरविण्याचे काम करीत नसून ती उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचेही प्रयत्न करते. देशातील विद्यापीठे व महाविद्यालये यांना इमारत, ग्रंथालय, वसतीगृहे, शिक्षकांची निवासस्थाने, प्रयोगशाळा इत्यादीसाठी आयोग भरीव निधी पुरवितो. तसेच प्राध्यापकांनी संशोधन करावे म्हणून, तसेच त्यांचे संशोधन प्रकाशित व्हावे म्हणूनही हा आयोग अनुदान देतो. शिक्षकांची गुणवत्ता वाढावी, नव्या ज्ञानाची त्यांना ओळख व्हावी म्हणूनही हा आयोग रिफ्रेशर व ओरिएंटेशन कोर्सेसची सुविधा उपलब्ध करून देतो. देशात व परदेशात होणाऱ्या परिषदा, चर्चासत्रे, प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा इत्यादीत प्राध्यापकांनी सहभागी व्हावे म्हणूनही हा आयोग त्यांना अर्थसाहाय्य व मार्गदर्शन पुरवितो.

**क) विविध विद्यापीठे :** उच्च शिक्षणाच्या संदर्भातील आणखीन एक महत्त्वाची संस्था म्हणजे विद्यापीठ (University) ही होय. ऑक्टोबर २०१७ पर्यंत भारतात विविध प्रकारच्या विद्यापीठांची संख्या पुढीलप्रमाणे होती.

१) केंद्रीय विद्यापीठे (Central Universities) ४७ आहेत.

२) राज्य विद्यापीठे (State Universities) ३७० आहेत.

३) मुक्त विद्यापीठे (Open Universities) १० आहेत.

४) अभिमत विद्यापीठे (Deemed Universities) १२३ आहेत.

५) खाजगी विद्यापीठे (Private Universities) २३७

भारतात ब्रिटिश राजवटीत इंग्लंडमधील ऑक्सफर्ड व केंब्रीज विद्यापीठांच्या धर्तीवर १८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास ही विद्यापीठे स्थापन झाली. त्यानंतर इतरही कांही विद्यापीठे स्थापन झाली. प्रारंभी ही विद्यापीठे केवळ संलग्नस्वरूप (Affiliating) विद्यापीठे होती. आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना संलग्न करून घेणे, त्यांचे अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांच्या पात्रतेचे नियम करणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन त्यांना पदव्या देणे अशी कामे ही विद्यापीठे करीत. बदलत्या परिस्थितीनुसार पुढे विद्यापीठातून पदव्युत्तर अध्ययन-अध्यापनाचे व संशोधनाचे कार्य सुरू झाले. आज भारतात कला, वाणिज्य, विज्ञान, कृषी, वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा, व्यवस्थापन, माहिती-तंत्रज्ञान इत्यादी विद्याशाखांचे अध्ययन-अध्यापन व संशोधन करणारी विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यांचा कारभार पाहणारी यंत्रणा पुढीलप्रमाणे आहे.

**१) कुलपती :** विद्यापीठे ही शासनाने केलेल्या कायद्यान्वये स्थापन होतात म्हणून शासन व विद्यापीठ यांना जोडणारा दुवा म्हणून राज्याचे राज्यपाल (Governer) हेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती (Chancellor) असतात. राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची (Vice-Chancellor) नियुक्ती करणे व विद्यापीठांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम कुलपती करतात.

**२) कुलगुरूः** राज्यांचे घटनात्मक प्रमुख म्हणून संपूर्ण राज्याचा कारभार (प्रशासन) चालविणाऱ्या राज्यपालांना कुलपती म्हणून सर्व विद्यापिठांचा कारभार पाहणे शक्य नसते. म्हणून प्रत्येक विद्यापीठाचा शैक्षणिक व प्रशासकीय कारभार पाहण्यासाठी कुलपतीकडून प्रत्येक विद्यापीठासाठी एक कुलगुरू नेमला

जातो. कुलगुरूंना साहाय्य करण्यासाठी कुलपतीकडून प्रत्येक विद्यापीठासाठी एक कुलगुरू नेमला जातो. कुलगुरूंना साहाय्य करण्यासाठी प्रकुलगुरू (Pro-Vice Chancellor) हे पद निर्माण केले असून त्याची नियुक्ती कुलगुरू करतात. कुलगुरूंना त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामात मदत करण्यासाठी कुलसचिव उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, अधिक्षक व अन्य प्रशासकीय सेवकवर्ग नियुक्त केलेला असतो. तसेच वित्तिय व्यवहार पाहण्यासाठी 'वित्त व लेखा अधिकारी' तर परीक्षांचे आयोजन व निकाल लावण्याचे काम करण्यासाठी 'संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ' असेही अधिकारी नियुक्त केले जातात.

**३) विविध मंडळे :** विद्यापीठाचा कारभार पाहण्यासाठी विविध मंडळे स्थापन केलेली असतात. त्यापैकी कांही प्रमुख मंडळे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) अधिसभा** (Senate) : विद्यापीठातील या मंडळावर, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षणसंस्था चालक, प्राथमिक शिक्षक, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी द्वारे निवडून दिलेले सदस्य असतात. हे मंडळ म्हणजे विद्यापीठाची आमसभा (General Assembly) असून ते पुढील कार्ये पार पाडते.

१) महाविद्यालयांच्या संलग्नेतेची शिफारस राज्यसरकारकडे करणे.

२) संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सेवाशर्थी ठरविणे.

३) विद्यापीठाच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) विद्यापीठाच्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.

५) विद्यापीठाद्वारे दिल्या जाणाऱ्या सन्माननीय पदव्यांना मान्यता देणे.

६) विद्यापीठाचे नियम परिनियम बनविणे व त्यामध्ये बदल करणे.

**२) व्यवस्थापन परिषद** (Management Council) : ही परिषद विद्यापीठ यंत्रणेचे व्यवस्थापन पाहण्याचे कार्य करते. तिच्यावर शिक्षक, संस्थाचालक, प्राचार्य तसेच इतरही कांही घटकांचे प्रतिनिधी सदस्य म्हणून निवडले जातात. विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहाराचे व्यवस्थापन करणे, विद्यापीठातर्फे करार करणे, विद्यापीठाचे अंदाजपत्रक तयार करणे, महाविद्यालयांच्या संलग्नतेबाबत शिफारशी करणे, महाविद्यालयांचे पर्यवेक्षण करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे इत्यादी महत्वपूर्ण कार्ये ही परिषद पार पाडते. एकंदरीत ही परिषद म्हणजे विद्यापीठाचे कार्यकारी मंडळच आहे.

**३) विद्वत् परिषद** (Academic Council) : हे मंडळ शैक्षणिकदृष्ट्या सर्वात महत्वाचे असून त्यावर प्राध्यापक वर्गातून निवडलेले सदस्य असतात. हे मंडळ १) अभ्यासक्रमात बदल/ सुधारणा करणे २) परीक्षेबाबतचे नियम बनविणे. ३) परीक्षांची समकक्षता ठरविणे. ४) महाविद्यालयांची स्थापना व संलग्नतेला मान्यता देणे. ५) पाठ्यपुस्तकांना मंजूरी देणे, ६) विद्यापीठांतर्गत संशोधनास चालना देणे. ७) विद्यापीठास शैक्षणिक कार्याबाबत मार्गदर्शन करणे इ. कामे पार पाडते.

**४) अभ्यास मंडळे** (Board of Studies) : विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या प्रत्येक विषयासाठी एक अभ्यास मंडळ असते. संबंधित विषय शिकविणाऱ्या व निर्धारित अटींची

पूर्तता करणाऱ्या प्राध्यापकांतून या मंडळाचे सदस्य निवडले जातात. तर कांही सदस्य हे नियुक्त केले जातात. या सदस्यामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड केली जाते. हे मंडळ १) पदवी व पदव्युत्तर वर्गाचे अभ्यासक्रम तयार करणे, त्यामध्ये सुधारणा करणे २) क्रमीक पुस्तके व संदर्भग्रंथ याबाबत शिफारशी करणे ३) प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी मंडळ किंवा समिती नियुक्त करणे, ४) उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणाऱ्या परीक्षकांची व परिनिरीक्षकांच्या नावाची शिफारस करणे इ. कामे पार पाडते.

**ड) महाविद्यालये** (Colleges) : उच्च शिक्षणाच्या संदर्भातील सर्वात खालच्या स्तरावर असणारी व्यवस्था म्हणजे महाविद्यालय होय. इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय ही व्यवस्था आहे. प्रारंभी महाविद्यालयात पदवीचे तर विद्यापीठात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण दिले जाई. तथापि, वाढत्या विद्यार्थी संस्थेचा विचार करून कांही महाविद्यालयातून पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण देणे सुरू केलेले आहे. प्रत्येक महाविद्यालय हे एखाद्या विद्यापीठाशी संलग्न असते व संबंधित विद्यापीठाने निर्धारित केलेले अभ्यासक्रम शिकविण्याचे काम ते करते. मात्र कांही महाविद्यालये ही स्वायत्त असून ती आपला अभ्यासक्रम स्वतःच तयार करतात व राबवितात. देशात सद्या विविध प्रकारची महाविद्यालये आहेत. उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, कृषी, कायदा, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यक, संगणक, माहिती तंत्रज्ञान, अवकाश अशा विविध विद्याशाखातील अनेक विषयांचे शिक्षण दिले जाते. यातील कांही महाविद्यालये ही शासकीय असून कांही महाविद्यालये ही खाजगी शिक्षणसंस्थामार्फत चालविली जातात. त्यापैकी कांही महाविद्यालयांना शासनाकडून वेतन व वेतनेतर खर्चासाठी अनुदान दिले जाते तर कांही महाविद्यालये ही विनाअनुदान तत्त्वावर चालविली जातात. महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन चालविण्यासाठी प्राचार्य असतो व त्याची निवड विद्यापीठ नियुक्त निवड समितीद्वारे मुलाखत घेऊन केली जाते. त्याच्या मदतीस प्रबंधक, अधीक्षक, वरिष्ठ व कनिष्ठ लेखनिक, शिपाई इ. प्रशासकीय कर्मचारी असतात. महाविद्यालयात अध्यापनाचे काम करण्यासाठी विषयानुरुप विविध विभाग असतात. प्रत्येक विभागात कांही शिक्षक असतात. त्यापैकी एकाची विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती केली जाते. या शिक्षकांची नियुक्तीही विद्यापीठ निवड समितीद्वारे मुलाखत घेऊन केली जाते. महाविद्यालयीन तसेच विद्यापीठीय शिक्षक हे सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक अशा तीन श्रेणीत विभागलेले असतात. हे शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याबरोबरच त्यांच्या अंगच्या सुप्तगुणांचा विकास करण्याचेही कार्य करीत असतात. त्यासाठी महाविद्यालयात अनेक अभ्यासक्रमपूरक असे उपक्रम राबविले जातात. त्यासाठी क्रीडा मंडळ, सांस्कृतिक मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) सहल विभाग, वकृत्त्व मंडळ इत्यादींची स्थापना केलेली असते.

**ई) स्वायत्त संशोधन संस्था** (Autonomous Research Institutions) : उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अध्यापनाबरोबरच संशोधनासही महत्वाचे स्थान दिले जाते. पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना तसेच सेवेत असणाऱ्या प्राध्यापकांनाही संशोधन करता यावे म्हणून प्रत्येक विद्यापीठात एम. फील व पी. एच. डी. या पदव्या संपादनाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्याशिवाय केवळ संशोधन कार्य करण्यासाठी अनेक स्वायत्त संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्यापैकी कांही प्रमुख संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भारतीय ऐतिहासिक संशोधन परिषद** (Indian Council of Historical Research) : ही नवी दिल्लीत असून तिची स्थापना १९७२ मध्ये झाली. ऐतिहासिक संशोधनाच्या प्रगतीचा आढावा घेऊन इतिहासाच्या वैज्ञानिक लेखनास प्रोत्साहन देण्याचे काम ही संस्था करते. तसेच व्यक्तिगत संशोधकांना ही संस्था अर्थसहाय्य देते. फेलोशिप देऊन भाषांतराचे व प्रकाशनाचे काम करते.

**२) भारतीय तत्त्वज्ञान संशोधन परिषद** (Indian Council of Philosophical Research) हिची १९७७ मध्ये स्थापना झाली असून तिची नवी दिल्ली व लखनौ येथे कार्यालये आहेत. तत्त्वज्ञान व त्याच्याशी संलग्न अभ्यास विषयातील संशाधनाच्या प्रगतीचा आढावा घेणे, त्याबाबतचा अहवाल तयार करणे, तत्त्वज्ञानविषयक संशोधन पुरस्कृत करणे, संशोधन प्रकल्प व कार्यक्रम यासाठी अर्थसहाय्य करणे इ. कामे ही संस्था करते.

**३) भारतीय प्रगत अध्ययन संस्था** (Indian Institute of Advanced Studies) ही संस्था १९६५ मध्ये सिमला येथे स्थापन झाली आहे. मानव्यविद्या, सामाजिक विज्ञाने व नैसर्गिक विज्ञाने यांच्या प्रगत अध्ययनासाठी निवासी स्वरूपाची ही संस्था आहे. ही संस्था म्हणजे विद्वान अभ्यासकांचा एक समुदाय असून हा समुदाय ज्ञानाच्या नवनवीन क्षेत्रात संशोधन करीत असतो. समकालीन प्रश्नांचा संकल्पनात्मक विकास व आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन याबाबतचे संशोधन करण्यासाठी हे विद्वान विदेशातही जातात.

**४) भारतीय सामाजिक विज्ञाने संशोधन परिषद** (Indian Council of Social Sciences Research) : १९६९ मध्ये नवी दिल्ली येथे ही संस्था स्थापन केलेली आहे. सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करण्याचे काम ही संस्था करते. सामाजिक विज्ञानातील संशोधनाच्या प्रगतीचा आढावा घेणे, संशोधन कार्यासंदर्भातील शिफारसी शासनाकडे सादर करणे, संशोधन प्रकल्प व कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे, व्यक्ती व संस्थांना सामाजिक विज्ञानाच्या अभ्यासक्षेत्रात संशोधन करण्यासाठी अनुदान देणे इ. कार्ये ही संस्था करते.

**५) राष्ट्रीय ग्रामीण संस्था परिषद** : १९९५ मध्ये केंद्रशासनाने स्थापन केलेली ही स्वायत्त संस्था आहे. स्वयंसेवी संस्था व शिक्षणसंस्था यांच्या सामूहिक प्रयत्नातून गांधीवादी तत्त्वज्ञानावर आधारीत असे उच्च शिक्षण ग्रामीण भागात देण्याचे कार्य ही संस्था करते. संशोधन हे ग्रामीण व सामाजिक विकासाचे साधन व्हावे यासाठी ही संस्था प्रोत्साहन देते. या संस्थेला केंद्रशासनाकडून निधी मिळतो.

या सर्व संस्था स्वायत्त असून त्या उच्च शिक्षणातील संशोधनास चालना देण्याचे कार्य करतात.

**फ) भारतीय तंत्रज्ञान संस्था** (Indian Institutes of Technology – IITs) ह्या भारतातील तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण देणाऱ्या स्वायत्त संस्था आहेत. खडगपूर (पश्चिम बंगाल) येथे पहिली IIT ही संस्था स्थापन झाली. त्यानंतर मुंबई (१९५८) चेन्नई व कानपूर (१९५९), दिल्ली (१९६३), गोहट्टी (१९९४) येथे IIT स्थापन केल्या गेल्या. २००१ रुडकी विद्यापीठास IIT चा दर्जा दिला. २००८-०९ मध्ये गांधीनगर, जोधपूर, हैद्राबाद, इंदोर, पाटणा, भूवनेश्वर, रोपड व मंडी यामध्ये नवीन IIT सुरू केल्या. याचकाळात बनारस हिंदू विद्यापीठाच्या तंत्रज्ञान संस्थेला IIT चा दर्जा दिला. २०१५-१६ मध्ये तिरूपती, पालक्काड, भिलाई, गोवा, जम्मू, धारवाड येथेही IIT स्थापन केली. तसेच आयएसएम धनबादलाही IIT

चा दर्जा दिला. अशाप्रकारे आज देशात २३ IIIs आहेत. इ. १२ वी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संयुक्त प्रवेश परीक्षेद्वारे IIT प्रवेश दिला जातो. पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश मिळविण्यासाठी ग्रॅज्युएट, ॲपट्यीट्यूड टेस्ट इन इंजनिअरिंग म्हणजेच गेट (GATE) ही परीक्षा देऊन तिच्यात पात्रताधारक (qualify) व्हावे लागते. IITs मध्ये प्रवेश मिळविणे हे गुणवत्तेचे व सन्मानाचे मानले जाते.

**संरचना :** IITs चा कारभार हा Institute of Technology Act-1961 नुसार चालतो. भारताचे राष्ट्रपती हे सर्व IITs चे पदसिद्ध प्रमुख आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली 'आयआयटी कॉन्सिल' असून तिच्यामध्ये केंद्रीय तंत्रशिक्षणमंत्री, सर्व आयआयटीचे अध्यक्ष व संचालक, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष, सीएसआयआरचे डायरेक्टर जनरल, आयआयएससीचे अध्यक्ष, आयआयएससीचे अध्यक्ष व संचालक, संसदेचे तीन सदस्य (खासदार), मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा संयुक्त सचिव आणि केंद्रशासनाने नियुक्त केलेले तीन सदस्य इत्यादींचा समावेश आहे. या कौन्सिलच्या नियंत्रणाखाली प्रत्येक आयआयटीसाठी एक नियामक मंडळ असते. या मंडळाच्या नियंत्रणाखाली संचालक असतो व तोच आयआयटीचा शैक्षणिक व कार्यकारी प्रमुख असतो. त्याच्या मदतीसाठी उपसंचालक, अधिष्ठाता (Dean), विभागप्रमुख, प्रबंधक (Registrar), विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, हॉटेल मॅनेजमेंट समितीचा अध्यक्ष इत्यादी असतात. प्रबंधक हा आयआयटीचे दैनंदिन प्रशासन पाहतो. विभागप्रमुखाच्या मदतीस गरजेप्रमाणे कांही प्राध्यापक असतात.

तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च शिक्षण देण्यासाठी देशात १७ प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केलेली आहेत. तंत्रशिक्षणासाठी गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांना IITs च्या पातळीवर आणण्यासाठी संपूर्ण अनुदानित दर्जा दिला आहे. त्यांना आता National Institute of Technology असे म्हणतात. IIT शी समकक्ष अशा शैक्षणिक व्यवस्था असणाऱ्या या संस्था अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण देतात.

**ग) भारतीय व्यवस्थापन संस्था** (Indian Institutes of Management – IIMs) : IITs प्रमाणेच व्यवस्थापन विषयाचे पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण देण्यासाठी भारतीय व्यवस्थापन संस्था म्हणजेच IIMs ची स्थापना केलेली आहे. सद्या देशात अशा २० संस्था आहेत. पहिली संस्था १९६१ मध्ये कोलकता येथे सुरू केली. त्यानंतर अहमदाबाद, बंगलोर, लखनौ, कोझीकोडा, इंदोर, शिलाँग, रोहटक, रांची, रायपूर, तिरुचिरापल्ली, काशीपूर, उदयपूर, नागपूर, विशाखापट्टणम, बुद्धगया, अमृतसार, संबळपूर, सिरमौर आणि जम्मू या शहरात सुरू झाल्या. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना एक सामाईक प्रवेश चाचणी (Common Admission Test – CAT) आणि मुलाखत याद्वारे प्रवेश दिला जातो.

### **४.३.३ उच्च शिक्षण : समस्या आणि आव्हाने** (Higher Education : Problems and Challenges)

या चौथ्या अध्ययन घटकाच्या तिसऱ्या विभागात आता तुम्ही उच्च शिक्षणातील समस्या व त्यासमोरील आव्हाने अभ्यासणार आहात. भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रात अनेक समस्या व आव्हाने आहेत. भारतीय शिक्षण क्षेत्र देखील याला अपवाद नाही. विशेषतः उच्च शिक्षणाचे क्षेत्र आज अनेक

समस्यांनी ग्रस्त असून त्याच्यासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. या समस्यांची सोडवणूक करणे व या आव्हानांना समर्थपणे तोंड देणे उच्च शिक्षणाच्या विकासासाठी आवश्यक आहे. त्यासाठी या समस्यांचा व आव्हानांचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणे अनिवार्य ठरते. या समस्या व आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

**१) उच्च शिक्षणाच्या विस्ताराची समस्या**

भारतात उच्च शिक्षणाचा दिवसेंदिवस विस्तार होत चाललेला आहे आणि हा विस्तार एका दृष्टिने समस्या ठरलेला आहे. भारतात ब्रिटिश काळात आधुनिक उच्च शिक्षणाचा प्रारंभ झाला असे शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना शासकीय नोकरी व प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामुळे भारतीय लोक उच्च शिक्षणाकडे आकर्षित झाले. तथापि, हे शिक्षण केवळ उच्चवर्णीयांना व त्यातही श्रीमंतानाच घेणे शक्य असल्याने उच्च शिक्षितांची व त्यातही श्रीमंतानाच घेणे शक्य असल्याने उच्च शिक्षितांची संख्या अत्यल्पच राहिली. बहुसंख्यांक लोक शिक्षणापासून वंचितच राहिले. स्वातंत्र्यानंतर अनेक विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन झाली. अगदी तालुका स्तरापर्यंत महाविद्यालये पोहचली. परिणामी, सामान्य लोकांनीही नोकरी व प्रतिष्ठा मिळविण्यासाठी उच्च शिक्षण घेणे सुरू केली. त्यातूनच उच्च शिक्षण घेणाऱ्यांची व ते देणाऱ्या शिक्षण संस्थांचीही संख्या वाढत चालली. १९४८-४९ मध्ये देशात सुमारे २० विद्यापीठे व ५०० महाविद्यालये होती. तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे अडीच ते तीन लाख होती. आज सुमारे ७५० पेक्षा जास्त विद्यापीठे व लाखो महाविद्यालये असून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कांही कोटीच्या आसपास आहे. व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ही पाच कोटीहून अधिक आहे. या वाढत जाणाऱ्या संख्येमुळे आज आपल्या समोर असे एक आव्हान वा प्रश्न निर्माण झाला आहे की, उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकास उच्च शिक्षण द्यावयाचे का? या प्रश्नास दोन उत्तरे आहेत.

१) लोकशाही तत्त्वानुसार कोणत्याही पात्रताधारक विद्यार्थ्यास उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश न देणे अन्यायकारक ठरेल. २) एवढ्या मोठ्या संख्येने उच्च शिक्षणाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठे, महाविद्यालये, ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य, फर्निचर, शिक्षक इत्यादी शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध करून देणे आर्थिकदृष्ट्या देशाला पेलणार नाही. आता या दोन्ही गोष्टींचा मेळ कसा घालायाचा ही एक मोठी समस्या वा आव्हान आहे. आणखीन एक महत्वाचा मुद्दा म्हणजे उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या व विविध क्षेत्रात/व्यवसायात असणाऱ्या कर्मचाऱ्यांची/नोकरांची गरज यांचाही मेळ कसा घालावयाचा हा ही प्रश्न आहे. कारण आज उच्च शिक्षण घेऊन दरवर्षी लाखो विद्यार्थी बाहेर पडत आहेत. मात्र त्या सर्वांनाच नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सुशिक्षितांची बेकारी वाढत आहे. अशा बेकार तरुणांमध्ये प्रचंड असंतोष, असमाधान व वैफल्य निर्माण होत असून हे बाब समाजासाठी नक्कीच धोकादायक आहे. म्हणून कांही लोक असे म्हणतात की, उच्च शिक्षण सरसकट सर्वांनाच न देता गरजेप्रमाणे कांही निवडक व्यक्तींनाच द्यावे. कोठारी आयोगाने यासंबदर्भात म्हटलेच आहे की, आपल्याकडे सर्वांनाच उच्च देण्यासाठी लागणारा पुरेसा निधी नाही व उच्च शिक्षण घेऊन दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो स्नातकांना रोजगार पुरविण्याची क्षमताही नाही. म्हणून त्या त्या क्षेत्रातील मनुष्यबळाच्या गरजा ध्यानात घेऊन गुणवत्तेवर आधारित निवडक व्यक्तीनांच उच्च शिक्षण देणे इष्ट ठरेल. मानवी हक्काच्या सनदेतही उच्च शिक्षणाचा हक्क मूलभूत न मानता विद्यार्थ्यांच्या पात्रतेवर अवलंबून असलेला हक्क मानला आहे. अशाप्रकारच्या विचारसणीनुसार बहुतेक

शिक्षणसंस्थांनी प्रवेश संख्या मर्यादित ठेवण्यासाठी परीक्षेतील गुणांची, वयाची इ. अटी घातलेल्या आहेत. तरीही या अटींची पूर्तता करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने त्यांच्या प्रवेशांचा प्रश्न आव्हानात्मक बनला आहे. यासंदर्भात आणखीन एक चिंतनिय मुद्दा आहे व तो म्हणजे प्रवेशाच्या अटींच्या विरोधात सामान्य जनता म्हणते की, आजवर उच्चवर्णीयांनी/ उच्चवर्गियांनी/ श्रीमंतानीच उच्च शिक्षण घेतले. आज आम्ही उच्च शिक्षण घेण्यास निघालो तर प्रवेशासाठी अटी घातल्या जातात हे अन्यायकारक आहे. यावर उत्तर आहे. पण सामान्य जनतेस दुखविण्यास राज्यकर्ते तयार नाहीत. परिणामी, मागणीनुसार विद्यापीठांची व महाविद्यालयांची संख्या वाढविली जात आहे. यातून देशावरील आर्थिक ताण वाढत आहे.

अशाप्रकारे उच्च शिक्षणाचा विस्तारही एक समस्या बनली आहे. तथापि, या समस्येस दुसरी बाजूही आहे व ती पण तेवढीच महत्त्वाची आहे. भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढत असली तरी ही वाढ विकसित देशांच्या तुलनेने खूपच कमी आहे. आज भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सुमारे १२ टक्क्याच्या आसपास आहे. इतर देशात हे प्रमाण खूपच जास्त आहे. उदा. दक्षिण कोरियात व ऑस्ट्रेलियात ८०%, ब्रिटनमध्ये ५२% फ्रान्समध्ये ५१%, अमेरिकेत ५०%, जर्मनीत ४७% तर इस्त्राईलमध्ये ३०% असे आहे. हे पाहता अनेक विद्वान म्हणतात की, भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढविले पाहिजे. त्यानुसार भारताने २०२० ते २०२५ पर्यंत उच्च शिक्षणाचे प्रमाण २० ते २५% इतके वाढविण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी माजी पंतप्रधान मनमोहनसिंगांनी सुमारे १५०० विद्यापीठे लागतील असे म्हटले होते. सध्या सुमारे ५५० विद्यापीठे आहेत. आणखीन ९५० विद्यापीठे स्थापण्यासाठी लागणारा पैसा कोठून व कसा उभा करावयाचा हा मोठा गहन प्रश्न आहे. कोठारी आयोगाने शिक्षणावर सुमारे ६% खर्च करावा असे सूचविले होते. आजपर्यंत आपण शिक्षणावर ४.१% पेक्षा अधिक खर्च करू शकलेलो नाही. अशा स्थितीत उच्च शिक्षणाचे प्रमाण २० ते २५% पर्यंत कसे वाढवावयाचे ही एक समस्या/आव्हान आहे.

**२) माध्यमाची समस्या :** उच्च शिक्षणाच्या संदर्भातील आणखीन एक महत्त्वपूर्ण समस्या म्हणजे उच्च शिक्षणाचे माध्यम भारतीय भाषा असावी की इंग्रजी भाषा ही होय. उच्च शिक्षणाच्या माध्यमाची ही समस्या किंवा प्रश्न ब्रिटिश राजवटीपासून चर्चीला जात आहे. पण दुर्दैवाने हा प्रश्न आजही समाधानकारकपणे सुटलेला नाही. **थॉमस मेकॉले** या इंग्रज अधिकाऱ्याने भारतीयांना पाश्चिमात्त्य शिक्षण इंग्रजी माध्यमातून द्यावे असा प्रस्ताव मांडला. त्यास कांही भारतीयांना विरोध केला. तथापि, प्रशासनात खालच्या स्तरावरील 'कारकूनी' कामे करण्यासाठी इंग्रजी भाषा जाणणारे भारतीय उपलब्ध व्हावेत यासाठी शाळा–महाविद्यालयातील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे हे धोरण ब्रिटिश सरकारने स्वीकारले. पुढे **वूडच्या** खलित्यातही प्राथमिक शिक्षण देशी भाषांमधून तर उच्च शिक्षण इंग्रजीतून देण्याची शिफारस केली. **सॅडलर आयोगानेही** (१९१७) उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषाच असावे असे सूचविले. त्यामुळे ब्रिटिश राजवटीत उच्च शिक्षणाचे माध्यम मुख्यतः इंग्रजीच राहिले. तथापि, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी व इतरही कांही भारतीयांनी उच्च शिक्षण देशी भाषांतून देण्याचा आग्रह धरला. परिणामी, विसाव्या शतकात स्थापन झालेल्या कांही विद्यापीठातून (उदा. उस्मानिया विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ इ.) देशी भाषांतून शिक्षण देणे सुरू झाले.

स्वातंत्र्यप्राप्तनंतर उच्च शिक्षण देशी भाषांतून देण्याच्या मागणीने जोर धरला. डॉ. राधाकृष्णन विद्यापीठ आयोग (१९४८), राष्ट्रीय एकात्मता समिती (१९६२), कुलगुरूंची परिषद (१९६२), भारतीय शिक्षण आयोग (१९६४), घटकराज्यांच्या शिक्षणमंत्र्यांची १० वी परिषद (१९६७), लोकसभेने नेमलेली शिक्षण समिती (१९६७), माजी केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ. त्रिगुण सेन इत्यादींनी उच्च शिक्षण देशी भाषांतूनच द्यावे असे आग्रहाने सांगितले. याचा परिणाम म्हणून अनेक विद्यापीठांनी देशी भाषांचा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकार केला. तर कांही विद्यापीठांनी शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच ठेवले, मात्र विद्यार्थ्यांना देशी भाषांतून उत्तरपत्रिका लिहिण्याची मुभा दिली. देशातील विविध विद्यापीठात दुवा म्हणून कोणतीतरी एक भाषा असावी असाही विचार पुढे आला व त्यातून सुमारे ३८% भारतीय हिंदी भाषा बोलतात म्हणून कांही विद्वानांनी (उदा. पंडित नेहरू) इंग्रजीबरोबर हिंदीचा 'दुवा भाषा (Link Languages) म्हणून स्वीकार करण्याचे सूचविले. अशाप्रकारे 'देशी भाषा विरुद्ध इंग्रजी भाषा हा वाद आजही चालू असून दोन्हीही पक्ष आपल्याच मताचे समर्थन करताना दिसतात.

देशी भाषांचे पुरस्कर्ते म्हणतात की, विचार करण्याचे व ते व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम ही मातृभाषाच आहे. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक या दोघांनाही वरील दोन्ही बाबतीत इंग्रजी भाषाही अडचणीची ठरते. विद्यार्थ्यांचा वेळ व श्रम हे ज्ञानप्राप्तीऐवजी इंग्रजी भाषा शिकण्यावरच खर्च होतात. अध्ययन घटकांचे विश्लेषण व स्पष्टीकरण इंग्रजीतून प्रभावीपणे करणे बऱ्याच शिक्षकांना जमत नाही. ते अगदीच कामचलाऊ पद्धतीने इंग्रजीतून कसेतरी शिकवितात. परिणामी, विषयाचे विद्यार्थ्यांना पर्याप्त आकलन होत नाही. त्यामुळे केवळ पाठांतर करून उत्तीर्ण होणारे पदवीधर तयार होतात. म्हणून खरोखरच ज्ञानी व व्यासंगी पदवीधर घडवावयाचे असतील तर त्यांना मातृभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे. 'इंग्रजीशिवाय प्रगती नाही' हा विचार अर्धसत्य आहे. कारण फ्रान्स, रशिया, जर्मनी, जपान, स्पेन या देशांनी इंग्रजी माध्यम न स्वीकारताही आपली प्रगती घडवून आणलेली आहे. थोडक्यात विद्यार्थ्यांना शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतूनच देणे इष्ट ठरते.

याउलट इंग्रजीचे पुरस्कर्ते म्हणतात की, आज सर्वच विद्याशाखात जे नवनवीन ज्ञान निर्माण होत आहे ते इंग्रजी भाषेतच ग्रंथबद्ध होत आहे. हे नवे ज्ञान मिळवावयाचे असेल तर इंग्रजीशिवाय तरणोपाय नाही. इंग्रजी भाषेतील ग्रंथसंपदा देशी भाषांत अनुवादीत करणे ही गोष्ट अत्यंत खर्चिक व वेळखाऊ आहे. शिवाय अनुवाद अचूक व योग्य पद्धतीने होईलच याची खात्री नसते. म्हणून इंग्रजी मूळ ग्रंथ वाचून ज्ञान मिळविणे उपयुक्त ठरते. उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यानी किमान चार-पाच इंग्रजी ग्रंथांचे अध्ययन करून जागतिक स्तरावरील ज्ञान मिळविणे अपेक्षित असते. त्याऐवजी देशी भाषेतील एखादेच अनुवादीत पुस्तक वाचून विद्यार्थी ज्ञान मिळवेल तर तो अर्धवट ज्ञानी ठरेल. हे टाळावयाचे असेल तर त्याने इंग्रजीतूनच शिक्षण घेणे इष्ट ठरते. शिवाय परकीय विद्यापीठांशी दुवा साधण्यासाठीही इंग्रजीच अनिवार्य ठरते. आज माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातही इंग्रजीचाच बोलबाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय विद्यार्थ्यांना गतिशिल (mobile) व जागतिक (global) व्हायचे असेल तर इंग्रजीतूनच शिक्षण देणे गरजेचे आहे. त्याशिवाय ते परदेशातील रोजगाराच्या संधीचा लाभ उठवू शकणार नाहीत. थोडक्यात, उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच हवे.

अशाप्रकारे भारतात उच्च शिक्षणाच्या माध्यमाची समस्या असून ते सोडविण्याचे मोठे आव्हान आपल्यापुढे आहे.

**३) विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीची समस्या :** विद्यार्थ्यांमधील विशेषतः महाविद्यालयीन-विद्यापीठीय विद्यार्थ्यांमधील बेशिस्त ही एक उच्च शिक्षणातील गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ भारतातच आहे असे नसून अगदी इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशातही आहे. भारतातील उच्च शिक्षण हे काल-विसंगत आहे. शाळा-महाविद्यालयातून मिळणारे शिक्षण व व्यावहारिक गरजा यांचा मेळ बसत नाही. पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊनही विद्यार्थ्याला आपला निर्वाह चालविण्यासाठी पर्याप्त उत्पन्न देणारा रोजगार/नोकरी मिळत नाही. विद्यार्थी प्रवाहपतीतासारखे पुढे पुढे शिकत राहतात. आपल्या शिक्षणाचा व्यावहारिक उपयोग नाही हे त्यांना कळते. त्यामुळे ते शिक्षणाविषयी उदासिन व बेफिकीर बनतात. यातूनच त्यांच्यात बेशिस्त येते. वर्गात न बसणे, गोंधळ करणे, विनयभंग करणे, गटबाजी करून गटागटात संघर्ष करणे, अभ्यास न करता कॉपी करून उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी प्रसंगी प्रश्नपत्रिका चोरणे, परीक्षकांना पैसे देऊन उत्तीर्ण होण्याचा व गुण वाढवून घेण्याचा प्रयत्न करणे, संप करणे, वर्ग बंद पाडणे, इमारती व फर्निचरची नासधूस करणे, परीक्षांवर बहिष्कार घालणे, अशी गैरकृत्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांकडून घडत आहेत. विद्यार्थ्यांच्या या बेशिस्तीस शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय असे विविध घटक/कारणे जबाबदार आहेत. शिक्षण म्हणजे सुसंस्कार. मात्र आजही शिक्षणपद्धतीही विद्यार्थ्यांवर नैतिकतेचे, आदर्शांचे, मूल्यांचे, देशप्रेमाचे, सामाजिक बांधिलकीचे, जबाबदार नागरिकत्त्वाचे, कर्तव्यनिष्ठेचे संस्कार करण्यात कुचकामी ठरलेली आहे. परिणामी, विद्यार्थी बेशिस्त बनलेले आहेत. उच्चशिक्षण घेऊनही बेकारीची पाळी येते हा अनुभव त्यांना अस्वस्थ करतो व कळतनकळतपणे बेशिस्त, विपथगामी व गुन्हेगारही बनवितो. आज समाजात भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशिलेबाजी, अप्रामाणिकपणा प्रचंड वाढला आहे. निष्कलंक व चारित्र्यवान व्यक्ती अभावानेच आढळतात. त्यामुळे कोणाचा आदर्श ठेवायचा हा विद्यार्थ्यांपुढे प्रश्न आहे. राजकीय नेतृत्त्व हे स्वार्थी, सत्तालोलपू आहे. ते विद्यार्थ्यांचा वापर स्वतःचे आर्थिक व राजकीय हितसंबंध साधण्यासाठी करून घेते. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या विद्यार्थी संख्येचा विधायक कामासाठी कसा वापर करून घ्यावयाचा याची दृष्टी, धोरण व नियोजन शासनाकडे नाही. हे सर्व घटक विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्त निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहेत. विद्यार्थ्यांची ही बेशिस्त नष्ट करून त्यांना वैयक्तिक व सामाजिक हितसंबंध साध्य करण्यासाठी कसे प्रवृत्त करावयाचे हे एक मोठे आव्हान देशासमोर आहे.

**४) गुणवत्तेची समस्या :** देशातील उच्च शिक्षण हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आहे का या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने नाही असेच द्यावे लागते. 'जेथे विद्येचा मोठ्या प्रमाणावर लय (नाश) होत आहे ते महाविद्यालय.' असे **विनोबा भावे** म्हणत ते आज अक्षरशः खरे ठरत आहे. आजचे शिक्षण हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. अनेक विद्यापीठांचे अभ्यासक्रम कालबाह्य असे आहेत. अभ्यासक्रमात ठराविक कालानंतर सुधारणा/बदल केले जातात हे खरे. पण तेच ते अध्ययन घटक आलटून पालटून व किरकोळ फेरफार करून अभ्यासक्रमात समाविष्ट केले जातात. शिक्षक देखील नवनवीन ग्रंथाचे वाचन करून विद्यार्थ्यांना विषय समजावून देण्यापेक्षा परिक्षेत गुण कसे मिळतील यावरच अधिक भर देतात. कारण परीक्षेतील 'गुण म्हणजेच गुणवत्ता' असेच सर्वजन मानीत आहेत. परिणामी, सर्वच शिक्षण प्रक्रिया ही परीक्षा केंद्रीत/परिक्षाभिमूख बनली आहे. विद्यापीठे ही परीक्षा घेणारी व पदवी देणारी केंद्रे बनली आहेत. त्यामुळे ज्ञानार्जन व ज्ञानदान पूर्णपणे दुर्लक्षिले जात आहे. विद्यार्थी हा प्रवेश घेणे, परीक्षा देणे, उत्तीर्ण होणे, पदवी मिळविणे व त्याधारे एखादी नोकरी मिळविणे यामध्ये अडकला असून यालाच तो शिक्षण मानीत आहे. महाविद्यालय व विद्यापीठातून

मिळणारे शिक्षण व्यवहारात कुचकामी ठरत आहे उदा. इलेक्ट्रीकल/इलेक्ट्रॉनिक्स मध्ये बी.ई./बी.टेक. वा एम.ई./एम.टेक. झालेला विद्यार्थी हा स्वतःच्या घरातील इलेक्ट्रीकल-इलेक्ट्रॉनिक्स उपकरणेसुद्धा दुरूस्त करू शकत नाही ही शोकांतिका आहे. कारण विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान देण्यावरच भर दिला जातो व ज्ञानाच्या उपयोजनाकडे दुर्लक्ष केले जाते. यालाच सामान्य व्यक्ती पुस्तकी ज्ञान म्हणून हिणविते. उच्च शिक्षणाची गुणवत्ता निम्न दर्जाची आहे याची अनेक कारणे आहेत. कारण अनेक महाविद्यालयाकडे व विद्यापीठाकडे पर्याप्त दर्जेदार शैक्षणिक साधन सामग्री नाही. इमारती, ग्रंथालये, प्रयोगशाळा, व्यासंगी व तळमळीचे शिक्षक, शिक्षणप्रसाराची तळमळ असलेले शिक्षणसंस्थाचालक, शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी आस्था असणारे राज्यकर्ते इत्यादींची मोठी उणिव आहे. शिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्या पूर्वीच्या शिक्षणमहर्षींची जागा आता धंदेवाईक शिक्षण सम्राटांनी घेतली आहे. शिक्षण वा ज्ञान ही एक कमोटीडी (विक्रीयोग्य वस्तू) असून विद्यार्थी हा ग्राहक आहे असे हे शिक्षणसम्राट मानतात. त्यामुळे त्यांच्यादृष्टीने शिक्षण हे नफा देणारा धंदा/व्यवसाय बनला आहे. परिणामी, शिक्षणाचा बाजार झाला आहे. या बाजारात गुणवत्तेचा गळा घोटला जात आहे. त्यामुळेच जगातील दर्जेदार विद्यापीठाच्या यादीत भारतातील एकही विद्यापीठ नाही. उच्च शिक्षणाची गुणवत्ता निम्न असण्याचे आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षक भरतीची प्रक्रिया हे आहे. शिक्षक भरतीच्या प्रक्रियेत अनेक अपप्रवृत्ती प्रभाव टाकतात. उदा. वशिला, पैसा, दबाव इत्यादी. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे उमेदवार डावलून किमान पात्रता असणारे उमेदवार शिक्षक म्हणून निवडले जातात. हे शिक्षक अध्यापन ही 'सेवा' न मानता पोट भरण्याचा एक व्यवसाय मानतात. कांही शिक्षक विद्वान व व्यासंगी असतात. मात्र त्यापैकी अनेकजण आपल्या व्यक्तिगत करिअर विकासाकडेच लक्ष देतात व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीकडे दुर्लक्ष करतात. परिणामी, विद्यार्थी हा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहतो. अर्थात याला कांही शिक्षक, महाविद्यालये, विद्यापीठे व शिक्षणसंस्थाचालक सन्माननिय अपवाद आहेत. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. अशांचे प्रमाण वाढविणे व त्याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे एक मोठे आव्हान आहे.

**५) असमानतेची समस्या :** उच्च शिक्षणाच्या संदर्भातील आणखीन एक महत्त्वाची समस्या म्हणजे असमानता होय. ब्रिटिशपूर्व काळात बहुसंख्यांक लोकांना (स्त्रीशुद्रांना) शिक्षणाचा हक्क नव्हता. हा हक्क त्यांना ब्रिटिश राजवटीत मिळाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणप्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. तथापि, उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सुमारे १२ टक्क्याच्या आसपास आहे. आणि या १२ टक्क्यामध्येही मोठ्या प्रमाणावर असमानता आहे. म्हणजे भारतीय समाजातील सर्व घटकांमध्ये उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण असमान आहे. कांही घटकांत उच्च शिक्षणाचे प्रमाण जास्त तर कांही घटकात ते अत्यल्प आहे. लिंग, धर्म, जात-जमात, वर्ग/आर्थिक स्तर इत्यादींच्या आधारे ही असमानता दाखविता येते. पुरुषांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण जास्त तर तुलनेने स्त्रियांमध्ये ते कमी आहे. जैन, ख्रिस्ती इत्यादी धार्मिक समुदायात उच्च शिक्षणाचे प्रमाण इतर धार्मिक समुदायांच्या तुलनेत (उदा. हिंदू, इस्लाम) जास्त आहे. उच्च जातींच्या तुलनेत अनुसूचित जाती व जमातीत उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. तसेच उच्च व मध्यम वर्गांच्या तुलनेतही कनिष्ठ वर्गात उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे. तसेच शहरांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण जास्त व ग्रामीण भागात/खेड्यांत ते कमी आहे. विविध घटकांत असलेली ही उच्च शिक्षणाची जी असमानता आहे त्याला विविध कारणे जबाबदार आहेत. उदा. आर्थिक पाठबळ नसणे, शैक्षणिक प्रेरणांचा

अभाव असणे, उच्च शिक्षणाच्या सुविधांची पुरेसी उपलब्धता नसणे ही त्यापैकी कांही प्रमुख कारणे आहेत. उच्च जातीच्या तुलनेत अनुसूचित जाती-जमातींना दारिद्र्यामुळे व शैक्षणिक प्रेरणांच्या अभावामुळे उच्च शिक्षणापर्यंत पोहचणे शक्य होत नाही. बहुसंख्य पालक हे मुलींना उच्च शिक्षण देण्यापेक्षा त्यांचा विवाह करून देणे अधिक पसंत करतात. ते मुलींचा विवाह जमेपर्यंत त्यांना शिकवितात व विवाह जमताच शिक्षण अर्ध्यावर सोडून त्यांचा विवाह लावून देतात. उच्च शिक्षणाच्या सुविधा शहरात अधिक आहेत. त्यामुळे शहरी मुलांमुलींना उच्च शिक्षण घेणे अधिक सोयीचे असते. याउलट ग्रामीण भागात उच्च शिक्षण सुविधा पुरेशा प्रमाणात नसल्याने ग्रामीण मुलामुलींना शहरांत येऊन शिक्षण घेणे गैरसोयीचे व आर्थिकदृष्ट्या न परवडणारे ठरते. म्हणून ग्रामीण भागात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आढळते. उच्च शिक्षणात असणारी ही असमानता ही देशांपुढील एक समस्या आहे. ही समस्या सोडवून सर्व घटकांचा समान सहभाग उच्च शिक्षणात निर्माण करणे हे एक आव्हान आहे.

**६) राजकीय हस्तक्षेपाची समस्या :** भारतात उच्च शिक्षणातच नव्हे तर सर्व स्तरावरील शिक्षणात राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आधुनिक काळात राजकारण सर्वव्यापी व सर्वस्पर्शी बनले आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात राजकारणाचा व राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप वाढत आहे. भारतातील उच्च शिक्षणाचे क्षेत्रही याला अपवाद नाही. उच्च शिक्षणातील राजकीय हस्तक्षेप विविध तऱ्हेने होत आहे. भारतात शैक्षणिक धोरणे ठरविण्याचा व त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार शासनास आहे. ज्या राजकीय पक्षाचे सरकार असेल तो पक्ष आपले राजकीय हितसंबंध कसे साध्य होतील यादृष्टीने शैक्षणिक धोरण आखण्याचा व राबविण्याचा प्रयत्न करतो व त्यानुसार शिक्षणक्षेत्रात हस्तक्षेप करतो. शिक्षणसंस्थांना शासनाकडून अनुदान/अर्थसाहाय्य दिले जाते. त्यामुळे या संस्थांना शासनाची मर्जी सांभाळणे भाग पडते. शासन जे शैक्षणिक धोरण ठरविल, जे निर्णय घेईल त्यानुसारच शैक्षणिक कामकाज करावे लागते. अनुदान मिळण्यात अडचणी येऊ नयेत म्हणून त्यांना राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप नाईलाजाने मान्य करावा लागतो. राजकीय हस्तक्षेपाचे आणखीन एक उदहरण म्हणजे उच्च शिक्षणसंस्थांमध्ये विविध पदावर होणाऱ्या नियुक्त्या व निवडणूका होय. उच्च शिक्षणसंस्थांचे शैक्षणिक व प्रशासकीय प्रमुख उदा. विद्यापीठांचे कुलगुरू, संशोधन संस्थांचे संचालक, वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता, महाविद्यालयांचे प्राचार्य, इत्यादींच्या नियुक्त्या करताना मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप होतो. राज्यकर्ती मंडळी आपल्या मर्जीतील व्यक्तींची अशा पदावर नियुक्ती व्हावी म्हणून सतत प्रयत्न करतात. विद्यापीठात ज्या विविध मंडळांच्या/समित्यांच्या स्थापनेसाठी निवडणूका होतात, त्यामध्ये ही पक्षीय राजकारण शिरलेले आहे. अधिसभा, व्यवस्थापन समिती, अभ्यास मंडळे यांच्या सदस्य निवडीसाठी होणाऱ्या निवडणूकांमध्ये विविध राजकीय पक्षांद्वारे/त्यांच्या नेत्यांद्वारे उमेदवार उभे केले जातात. आपलेच उमेदवार निवडून यावेत म्हणून प्रसंगी गैरकृत्यांचाही अवलंब केला जातो. सत्तारूढ राजकीय पक्ष आपल्या पक्षातील मातब्बर नेत्यांना (विशेषतः ज्यांना मंत्रीपद, एखाद्या महामंडळाचे अध्यक्ष वा सदस्य पद मिळालेले नाही अशांना) खूष ठेवण्यासाठी त्यांना महाविद्यालये (विशेषतः व्यावसायिक शिक्षण देणारी) स्थापन करण्याची परवानगी देतात. असे महाविद्यालय ज्या परिसरात काढले जाते तेथे त्याची गरज आहे का हे देखील बऱ्याचदा विचारात घेतले जात नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यात बहुतेक शिक्षणसंस्था ह्या राजकीय नेत्यांच्याच आहेत. त्यांनी आपले राजकीय वजन वापरून विनाअनुदान तत्त्वावर अशी अनेक महाविद्यालये मिळविलेली आहेत. यातूनच

महाराष्ट्रात डी.एड., बी.एड., एम.बी.ए., पॉलीटेक्नीक, इंजिनिअरिंग इत्यादी महाविद्यालये मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहेत. प्रारंभी भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारून व देणग्या (डोनेशन) घेऊन या शिक्षणसंस्थाचालकांनी प्रचंड माया जमविली आहे. तथापि, या महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यांना बाजारात नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे उच्च शिक्षितांची बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याचाच परिणाम म्हणून आज विद्यार्थ्यांचा व पालकांचा या महाविद्यालयाकडील ओढा कमी होत चालला आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्येअभावी अनेक महाविद्यालये बंद पडली असून कांही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शैक्षणिकदृष्टिकोनाऐवजी राजकीय दृष्टिकोणातून शिक्षणसंस्था व त्यांच्या शाखा वाढविण्याचे जे काही दुष्परिणाम होतात ते सर्व आज महाराष्ट्रात तीव्र स्वरूपात दिसून येत आहेत. उच्च शिक्षणातील राजकीय हस्तक्षेपाचा आणखीन एक मार्ग म्हणजे विद्यार्थी संघटना होय. आज उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी संघटनांचे प्रमाण मोठे आहे. यापैकी बहुतेक संघटना ह्या कोणत्याना कोणत्या राजकीय पक्षांशी संलग्न आहेत. त्यामुळे राजकीय पक्षाचे नेते हे विद्यार्थी संघटनांवर वर्चस्व गाजविताना दिसतात. आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राजकीय नेते विद्यार्थी संघटनांचा वापर (खरे तर गैरवापर) करतात. विद्यार्थी संघटनादेखील विद्यार्थ्यांचे हितसंबंध साध्य करण्याकडे दुर्लक्ष करून राजकीय नेत्यांच्या दबावाला/हस्तक्षेपाला बळी पडतात. परिणामी, आज देशातील अनेक विद्यापीठे ही राजकारणाचे अड्डे बनलेले असून विद्यार्थी हे मोर्चा, घेराव, बंद, आंदोलने, अशा मार्गांचा अवलंब करून शिक्षण प्रक्रियेत बाधा निर्माण करीत आहेत. वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या प्रभावाखाली असलेल्या वेगवेगळ्या विद्यार्थी संघटना ह्या परस्परांना विरोधक मानून संघर्ष करीत आहेत. यातून अनेकदा हिंसाचार माजून कांही विद्यार्थी बळी पडल्याचेही उदाहरणे पाहावयास मिळत आहेत. खरे तर शिक्षणासारखे सेवेचे क्षेत्र पवित्र असून ते स्वायत्त असावयास हवे. पण दुर्दैवाने ते राजकीय हस्तक्षेपाने ग्रासले असून त्याचे दुष्परिणाम विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना भोगावे लागत आहेत. म्हणून शिक्षणक्षेत्र हे राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त ठेवणे हेही एक मोठे आव्हान बनले आहे.

**७) स्तरीकरणाची समस्या :** आज भारतातील अनेक राज्यांतील उच्च शिक्षणक्षेत्रात श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वावर आधारलेले अनौपचारिक स्तरीकरण निर्माण झालेले असून ही एक गंभीर समस्या बनली आहे. हे स्तरीकरण महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी, विद्याशाखा, विषय इत्यादी घटकांच्या संदर्भात दिसून येते. एकाच विद्यापीठाशी संलग्न असलेल्या व समान अभ्यासक्रम राबवित असलेल्या महाविद्यालयापैकी कांही महाविद्यालये ही अनुदानित तर कांही विनाअनुदानित आहेत. म्हणजे कांहीना शासकीय अनुदान मिळते तर कांहींना ते मिळत नाही. विद्यार्थी व पालकांचा ओढा हा अनुदानित महाविद्यालयांकडे असतो व तेथे प्रवेश न मिळाल्यास मग ते विनाअनुदानित महाविद्यालयाकडे वळतात. यातूनच अनुदानित महाविद्यालये श्रेष्ठ व विनाअनुदानित महाविद्यालये कनिष्ठ असे स्तरीकरण व्यवहारात निर्माण झाले आहे. अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार व शासनाने संमत केलेले पूर्ण वेतन वेळेवर मिळते. याउलट विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना हे वेतन दिले जात नाही. कागदोपत्री पूर्ण वेतन दिल्याचे दाखवून प्रत्यक्षात कमीच वेतन दिले जाते. ते ही वेळेवर मिळत नाही. त्यामुळे समान दर्जावर व समान काम करणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये शासनमान्य पूर्ण वेतन मिळणारे शिक्षक श्रेष्ठ व ते न मिळणारे शिक्षक कनिष्ठ असे स्तर निर्माण झालेले आहेत. शिक्षकांमध्ये होणारा हा श्रेष्ठ-कनिष्ठ असा

भेदभाव शिक्षणक्षेत्राच्यादृष्टिने हानिकारक आहे. शिक्षकांतील स्तरीकरणास आणखीन एक चिंताजनक असा पैलू आहे. आज शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे उच्च शिक्षणात पूर्ण वेळ शिक्षक, अर्धवेळ शिक्षक व तासिका तत्त्वावरील (C.H.B.) शिक्षक असे स्तरीकरण निर्माण झालेले आहे. या तीनही प्रकारच्या शिक्षकांसाठी निर्धारित पात्रता समानच आहे. पण दुर्दैवाने अर्धवेळ व तासिका तत्त्वांवरील शिक्षकांना अल्पवेतनावर काम करावे लागत असल्याने त्यांच्यात एकप्रकारचा न्यूनगंड निर्माण होऊन ते पूर्णवेळ शिक्षकांकडे असुयेने पाहतात. समाजही पूर्णवेळ शिक्षकांस श्रेष्ठ व अर्धवेळ व तासिका तत्त्वावरील शिक्षकांना कनिष्ठ मानतो. परिणामी, असे कांही शिक्षक पूर्णक्षमतेने व तळमळीने अध्यापनाचे काम करीत नाही. याचा शिक्षणाच्या दर्जावर/गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे. पण शासनाला याचा 'ना खेद ना खंत' आहे. शिक्षकाप्रमाणेच विद्यार्थ्यांमध्येही स्तरीकरण निर्माण झालेले आहे. एकाच वर्गाची अनुदानित तुकडी व विनाअनुदानित तुकडी निर्माण केली जाते. अनुदानित तुकडीत प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी शैक्षणिक शुल्क द्यावे लागते तर विनाअनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांना जादा शुल्क द्यावे लागते. विद्यार्थ्यांमधील हा भेदभाव न्याय नाही. उच्च शिक्षणात विद्याशाखा व विषय यांच्यासंदर्भातही स्तरीकरण निर्माण झालेले आहे. वैद्यक, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, माहिती-तंत्रज्ञान, संगणक इत्यादी विद्याशाखांना श्रेष्ठ तर कला, वाणिज्य, सामाजिकशास्त्रे या विद्याशाखांना कनिष्ठ मानले जात आहे. तसेच इंग्रजी विज्ञान, तंत्रज्ञान, गणित इ. विषय श्रेष्ठ तर विविध प्रादेशिक भाषा, हिंदी, संगीत, इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, शारीरिक शिक्षण यासारखे विषय कनिष्ठ असा समज (की गैरसमज) समाजात निर्माण झाला आहे. उच्च शिक्षणातील हे विविध प्रकारचे स्तरीकरण/भेदभाव नक्कीच चिंताजनक आहे. त्यामुळे उच्च शिक्षणातील सर्व घटकांना समान स्तरावर/दर्जावर आणणे हे ही एक महत्त्वाचे आव्हान आहे.

**८) आर्थिक समस्या :** उच्च शिक्षणाची आणखीन एक गंभीर समस्या आहे व ती म्हणजे आर्थिक समस्या होय. विकसित देशांच्या तुलनेत भारतात उच्च शिक्षणावर होणारा खर्च खूपच कमी आहे. कोठारी आयोगाने शिक्षणावर ६% खर्च करण्याची शिफारस केली होती. आझण केवळ ४% इतकाच खर्च शिक्षणावर करीत आहोत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रास विशेषतः उच्च शिक्षण क्षेत्रास आर्थिक समस्यांना मोठ्या प्रमाणावर तोंड द्यावे लागत आहे. वाढत्या लोकसंख्येची उच्च शिक्षणाची गरज पूर्ण करण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मात्र त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी देणे केंद्र व राज्य सरकारांना कठीण होत आहे. उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च केंद्र शासन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून विद्यापीठे व महाविद्यालयांना देते. त्यामध्ये राज्य सरकारेही कांही वाटा उचलतात. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व वेतनेतर खर्चासाठी शासन अनुदान देते. मात्र हा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे अनेक राज्यांत वेतनेतर अनुदानात हळूहळू कपात करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रंथालये, प्रयोगशाळा, खेळसाहित्य, फर्निचर, स्टेशनरी, सामाजिक-सांस्कृतिक असे अभ्यासक्रमेतर उपक्रम इत्यादीसाठी लागणारा पैसा विद्यापीठांना व महाविद्यालयांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. कारण शासकीय अनुदान मिळत नाही. मिळाले तरी ते अपुरे असते. पूर्वीसारख्या शिक्षणसंस्थांना श्रीमंताकडून देणग्या मिळेणाशा झाल्या आहेत. एका विशिष्ट मर्यादेपलीकडे शैक्षणिक शुल्क वाढविणे कठीण होत आहे. कारण पालक व विद्यार्थी वर्ग त्यास विरोध करतो. त्यामुळे अनेक विद्यापीठे व महाविद्यालये

आर्थिक कोंडीत सापडलेली आहेत. त्यांना पर्याप्त प्रमाणात शैक्षणिक साहित्य खरेदी करणे कठीण होत आहे. परिणामी, त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे कठीण होत आहे.

### **४.३.४ शिक्षण आणि खाजगीकरण** (Education and Privatization)

या चौथ्या घटकाच्या शेवटच्या विभागात आता तुम्ही शिक्षण आणि खाजगीकरण या उपघटकाचा अभ्यास करणार आहात. मानव समाजात सतत नवनवीन सामाजिक प्रक्रिया उदयास येत असतात व त्यांचा मानवी जीवनाच्या विविध अंगावर प्रभाव पडत असतो. खाजगीकरण ही अशीच एक सामाजिक प्रक्रिया असून तिचा मानवी जीवनाच्या विविध अंगावर प्रभाव पडलेला आहे. या ठिकाणी मात्र तुम्ही केवळ शिक्षणावर खाजगीकरणाचा काय प्रभाव पडला आहे हे अभ्यासणार आहात.

खाजगीकरण ही प्रक्रिया जागतिकीकरण व उदारीकरण या दोन प्रक्रियांशी संलग्न असणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे या तीन प्रक्रियांचा अर्थ थोडक्यात समजावून घेणे उचित ठरते.

**१) जागतिकीकरणाचा अर्थ :** एखाद्या देशाची अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्म करणे म्हणजे जागतिकीकरण होय. या प्रक्रियेत एखाद्या देशाचे आर्थिक व्यवहार हे त्या देशाच्या राजकीय व भौगोलिक सीमेच्या बाहेर विस्तारीत केले जातात असे दिपक नय्यर म्हणतात. तथापि, जागतिकीरकणास केवळ आर्थिक पैलू नसून इतरही अनेक पैलू (उदा. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इ.) आहेत. या सर्व पैलूंचा एकत्रित विचार करून जागतिकीकरणाची आपणास पुढीलप्रमाणे व्याख्या करता येईल. ''जगातील विविध लोक, राष्ट्रे वा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करून त्यांना मुक्तपणे जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक व्यवहार करण्यास वाव देईल अशी एकच व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.''

**उदारीकरणाचा अर्थ :** उदारीकरण म्हणजे एखाद्या गोष्टीवरील निर्बंध वा नियंत्रणे कमी किंवा शिथिल करणे अथवा काढून टाकणे होय. आर्थिक दृष्टिकोनातून उदारीकरण म्हणजे आर्थिक प्रक्रियांवर असणारे सरकारी निर्बंध, नियंत्रणे व नियमने कमी किंवा शिथिल करणे अथवा काढून टाकणे होय.

**खाजगीकरणाचा अर्थ :** खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे किंवा त्याच उद्योगातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाडेपट्टीने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय.

जगात १९८० च्या दशकात जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांचे वारे वाहू लागले. भारतात मात्र १९९१ मध्ये या प्रक्रियांची सुरुवात झाली. १९८०-९० या दशकात भारतात मोठी चलनवाढ झाली. परकीय चलनाचा साठा घटत गेला. अनिवासी भारतीयांच्या बँकेतील ठेवी कमी झाल्या. राजकीय अस्थिरतेमुळे जगात भारताची पत घसरून विदेशी कर्ज मिळविणे कठीण झाले. परिणामी, १९९१ मध्ये भारतात अर्थिक संकट उद्‌भवले. या संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या संस्थांनी भारतावर जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या तीन प्रक्रिया सुरू करण्याची अट घातली. या अटीनुसार **पी. व्ही. नरसिंहराव** सरकारने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर केले व या धोरणात या तीन प्रक्रियांचा स्वीकार केला. या तीन प्रक्रियांचा भारतीय समाजावर मोठा लक्षणीय प्रभाव पडला आहे. त्यापैकी खाजगीकरणाचा भारतातील

शिक्षणावर काय प्रभाव पडला ते तुम्ही येथे अभ्यासणार आहात. हा प्रभाव इष्ट तसेच अनिष्ट अशा दोन्ही प्रकारचा आहे.

**खाजगीकरणाचा शिक्षणावरील इष्ट प्रभाव**

**१) शिक्षणाचा विस्तार :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने शिक्षणप्रसारावर भर दिला. भारतासारख्या खंडप्राय व अफाट लोकसंख्या असलेल्या देशात शिक्षणाचा सर्वदूर प्रसार करणे ही गोष्ट मोठी खर्चिक होती. शिक्षण प्रसाराच्या कार्यात खाजगी क्षेत्राचा वाटा नगण्य होता. त्यामुळे त्यासाठी शांसनास पुढाकार घेणे भाग होते. त्यानुसार शासनाने देशभर शिक्षणसंस्था सुरू केल्या. एवढेच नव्हे तर शिक्षणप्रसाराचे कार्य करणाऱ्या खाजगी शिक्षणसंस्थांना अनुदान देणेही सुरू केले. तथापि, दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्येसाठी शैक्षणिक सोयीसुविधा पुरविणे शासनास आर्थिकदृष्ट्या अवघड होऊ लागले. अशातच १९९१ मध्ये भारताने खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणानुसार सार्वजनिक उद्योगांचे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरण होऊ लागले. उद्योगाप्रमाणेच शासनाने शिक्षणाचेही खाजगीकरण करण्यास प्रारंभ केला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कॉम्प्युटर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, टेलिकम्युनिकेशन, बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, स्पेस सायन्स इत्यादी नवीन अभ्यासक्रम सुरू झाले. तसेच विद्यार्थी संख्याही वाढू लागली. तथापि, हा वाढता भार शासकीय यंत्रणेस पेलेनासा झाला. म्हणून सरकारने अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली. अशाच प्रकारे बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण देण्यासाठीही सरकारने खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. परिणामी, खाजगी शिक्षणसंस्थांची संख्या वाढली. परिणामी, शिक्षणाचा विस्तार होण्यास मोठी चालना मिळाली. आणखीन एक महत्त्वाचा बदल घडून आला व तो म्हणजे जागतिकीकरणात उद्योगधंद्याची संख्या वाढली. पण त्यासाठी लागणारे तंत्रज्ञ पुरेसे उपलब्ध होत नव्हते. म्हणून या उद्योगांनी तंत्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम नोकर म्हणून घेतले व त्यांना नंतर आवश्यक ते प्रशिक्षण देणे सुरू केले. यामुळेही शिक्षणसंस्थांची संख्या वाढली व वाढत्या विद्यार्थी संख्येस शिक्षण देणे शक्य होऊ लागले. प्रशिक्षित तंत्रज्ञांची संख्या वाढली. महत्त्वाचे म्हणजे सरकार वरील आर्थिक भार कमी होण्यास मदत झाली. थोडक्यात, खाजगीकरणामुळे भारतात शिक्षणसंस्थांची संख्या वाढून शिक्षणाचा विस्तार होण्यास मोठी चालना मिळाली.

**२) विदेशी शिक्षणाचा लाभ :** खाजगीकरणामुळे भारतीय विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणाचा लाभ मिळू लागला. कारण जागतिकीकरणात भारतात उद्योगधंद्यांचे प्रमाण वाढले. औद्योगिक क्षेत्रास लागणारे तंत्रज्ञ निर्माण करणाऱ्या शिक्षणसंस्थांची संख्याही वाढली. त्यातून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने विदेशी विद्यापीठे भारतात येण्याचा प्रयत्न करू लागली. पण भारत सरकारच्या अनिश्चित धोरणामुळे अशी विद्यापीठे येऊ शकली नाहीत. तथापि, विदेशी विद्यापीठांनी भारतातील विद्यापीठांशी संपर्क साधून त्यांच्या माध्यमातून आपले अभ्यासक्रम भारतीय विद्यार्थ्यांना शिकविण्यास सुरुवात केली. विशेषतः भारतातील खाजगी व अभिमत विद्यापीठांनी विदेशी विद्यापीठांशी असा शैक्षणिक संपर्क प्रस्थापित केलेला आहे. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना विदेशी अभ्यासक्रम शिकणे शक्य झाले आहे. विदेशी विद्यापीठांना विद्यार्थ्यांची गरज आहे व भारतात विद्यार्थी संख्या विपूल आहे. त्यामुळे विदेशी विद्यापीठांचे भारतीय विद्यार्थ्यांकडे लक्ष वेधले आहे. यातूनच कांही विदेशी विद्यापीठांनी नवनवीन कल्पना घेऊन भारतात आपल्या

शाखा सुरू केल्या आहेत. या शाखेत भारतीय विद्यार्थी शिकतात व त्यांना भारतीय शिक्षकच शिकवितात. मात्र या शाखांमध्ये कांही कालावधीसाठी विदेशी शिक्षक येऊन अध्यापन करतात. भारतीय विद्यापीठांच्या तुलनेत विदेशी विद्यापीठांचे अभ्यासक्रम उच्च दर्जाचे असल्याने भारतीय विद्यार्थ्यांचा त्यांच्याकडे अधिक ओढा आहे.

**३) शैक्षणिक गुणवत्तेत वाढ :** खाजगीकरणामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासही चालना मिळाली आहे. शासकीय उद्योगधंद्याप्रमाणेच शासकीय शिक्षणसंस्थांची गुणवत्ताही उत्तरोत्तर ढासळत गेली. या संस्थातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच आपल्या कामाप्रती निष्ठा राहीली नाही. वेतनाची व सेवेची शाश्वती असल्याने त्यांनी शिक्षणाचा तळमळीने प्रसार करण्याचे तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे प्राथमिक शाळापासून ते विद्यापीठापर्यंतच्या शासकीय शिक्षणसंस्थांची गुणवत्ता नेहमीच निम्न दर्जाची राहिली. अर्थात, कांही सन्माननीय संस्था याला अपवाद होत्या. पण त्यांचे प्रमाण अल्पच होते. त्यामुळे प्रारंभी शासकीय शिक्षणसंस्थाकडे असलेला विद्यार्थी व पालकांचा ओढा उत्तरोत्तर कमी होऊ लागला. त्यामुळे अनेक शासकीय शाळांना विद्यार्थी मिळणे अवघड झाले. अशा स्थितीत शिक्षणाच्या खाजगीकरणाचे धोरण राबविणे सुरू झाले. त्यामुळे अनेक खाजगी व्यक्ती व संस्थांनी खाजगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे सुरू केली. विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रम सुरू केले. अद्ययावत अशा शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. उत्तमोत्तम शिक्षकांचा शोध घेऊन त्यांना आपल्या शिक्षणसंस्थामध्ये नेमले. नवीन गरजांनुसार नवनवीन अभ्यासक्रमही सुरू केले. आपल्या शिक्षणसंस्थांमधून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी म्हणून परिसर मुलाखतींचे (Campus Interview) आयोजन सुरू केले. या सर्वांचा परिणाम म्हणून खाजगी शिक्षणसंस्थातील शिक्षणाचा दर्जा उंचावला गेला. परिणामी, पालकांची व विद्यार्थ्यांची पहिली पसंती ही खाजगी शाळांना मिळू लागली. यातूनच अनेक शासकीय शिक्षणसंस्थांच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांना खाजगी शिक्षणसंस्थांशी स्पर्धा करणे भाग पडू लागले. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आपली गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न त्या करू लागल्या आहेत. अशाप्रकारे खाजगीकरणामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास मोठी चालना मिळाली आहे.

**४) इंग्रजी शिक्षणास महत्त्व :** आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यास मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा मानली जाते. विविध विद्याशाखांतील ज्ञान हे इंग्रजी भाषेतच ग्रंथबद्ध केले जाते. कॉम्प्युटर व इंटरनेट या माध्यमांची भाषा ही इंग्रजीच आहे. जागतिक स्तरावरील नोकऱ्या मिळविण्यासाठी इंग्रजी येणे अनिवार्य झाले आहे. त्यामुळे भारतीय पालक व विद्यार्थी हे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यास प्राधान्य देत आहेत. परिणामी, इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढविणे आवश्यक झाले. शिक्षणाचे खाजगीकरण झाल्याने अशा शाळा सुरू करणे सुलभ झाले. परिणामी, त्यांची संख्या वाढू लागली. पूर्वी अशा शाळा ह्या प्रामुख्याने शहरी विभागातच होत्या. खाजगीकरणामुळे त्या आता ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारत हा जागतिक व्यवस्थेशी जोडला गेला आहे. अशा स्थितीत जागतिक व्यवस्थेशी समायोजन साधण्यासाठी भारतीयांना इंग्रजी शिक्षण घेणे आवश्यक ठरत आहे. खाजगीकरणामुळे ही गोष्ट शक्य होऊ लागली आहे.

थोडक्यात, शिक्षणाचे खाजगीकरण केल्यामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाचा सखोल विस्तार होण्यास चालना मिळाली आहे.

**खाजगीकरणाचा शिक्षणावरील अनिष्ट प्रभाव**

**१) शिक्षणाचे व्यापारीकरण** : खाजगीकरणाचा पहिला अनिष्ट प्रभाव म्हणजे त्यामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण मोठ्या प्रमाणावर घडून आलेले आहे. जागतिकीकरणात नवनवीन अभ्यासक्रमांची सुरूवात झाली ते सुरू करण्यासाठी नवीन संस्था स्थापन करणे शासनास पुरेशा पैशा अभावी शक्य नव्हते. म्हणून शासनाने शिक्षणाच्या खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. परिणामी, अनेक खाजगी शिक्षणसंस्था सुरू झाल्या. या संस्थांना सरकारी अर्थसाहाय्य नसल्याने त्यांनी भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारले. शिवाय प्रवेशासाठी पालकांकडून प्रचंड रक्कमेच्या देणग्या घेणे सुरू केले. त्यामुळे समाजात शिक्षण प्रसार करणे हे उद्दिष्ट मागे पडून शिक्षण ही एक 'खरेदी-विक्री योग्य वस्तू' (Commodity) बनली आहे. यातूनच शिक्षणाचे बाजारीकरण/ व्यापारीकरण घडून आले आहे. चांगल्या शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळावा म्हणून पालक हजारो लाखो रुपये देणग्या म्हणून देऊ लागले आहेत. त्यामुळे शिक्षण हे प्रंचड महागले असून गरिबांना ते परवडेनासे झाले आहे. पैशाअभावी गरीब विद्यार्थी हे नवनवीन अभ्यासक्रमापासून विशेषतः व्यावसायिक अभ्यासक्रमापासून वंचित राहू लागले आहेत. त्यामुळे अशा अभ्यासक्रमातील उच्च शिक्षण ही श्रीमंताची मक्तेदारी बनले आहे. यातूनच देशात शैक्षणिक विषमता निर्माण झाली आहे. कारण गरीबांची मुले ही निम्न गुणवत्तेच्या सरकारी शाळांतून शिक्षण घेत आहेत तर श्रीमंताची मुले ही चांगल्या गुणवत्तेच्या खाजगी शाळांमधून शिक्षण घेत आहेत. थोडक्यात शिक्षणाच्या खाजगीकरणांमुळे शिक्षण देणे 'सेवा' न राहता पैसा मिळवून देणारा एक व्यापार म्हणजेच व्यवसाय बनला आहे. शिक्षणाचे असे व्यापारीकरण होण हा खाजगीकरणाचा मोठा अनिष्ट परिणाम आहे.

**२) निम्न दर्जाच्या शिक्षणसंस्था** : वाढत्या लोकसंख्येच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षणाचे खाजगीकरण आवश्यक असले तरी यातून निम्न दर्जाच्या असंख्य शिक्षणसंस्था स्थापन झालेल्या आहेत. कांही थोड्या शिक्षणसंस्था सोडल्या तर अनेक खाजगी शिक्षणसंस्थांकडे चांगल्या व पुरेशा शैक्षणिक सोयीसुविधा नाहीत. इमारत, क्रीडांगण, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षित व तज्ज शिक्षक, अध्ययन-अध्यापनाची आधुनिक साधने इत्यादींची कमतरता अनेक खाजगी शिक्षणसंस्थामध्ये आहे. या संस्थांना शासकीय आर्थिक मदत मिळत नाही. तसेच त्या स्वतःही पुरेसा पैसा उभा करू शकत नाहीत. बहुतेक खाजगी शिक्षणसंस्थाचालकांचा हेतू शिक्षणप्रसार हा नसून संस्थेच्या माध्यमातून पैसा कमावणे हाच आहे. त्यामुळे ते शैक्षणिक साहित्यावर पुरेसा खर्च करीत नाहीत. एवढेच नव्हे तर शिक्षक व इतर सेवकांना निर्धारित पगारही देत नाहीत. अनेक संस्थात पात्र शिक्षक नाहीत. पात्रताधारक व चांगले शिक्षक अशा संस्थामध्ये टिकून राहात नाहीत. त्यामुळे शिक्षक वरचेवर बदलले जातात. परिणामी, अशा खाजगी संस्थांतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. या संस्थांतून बाहेर पडणारे विद्यार्थी हे पदवीधारक असतात मात्र ते समाजाच्या गरजा पूर्ण करण्याएवढे गुणवत्ताधारक नसतात. म्हणून स्पर्धात्मक जगात ते समर्थपणे उभे राहू शकत नाहीत तसेच समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते उत्तम योगदान देऊ शकत नाहीत.

**३) पारंपरिक अभ्यासक्रमांकडे दुर्लक्ष :** खाजगीकरणाचा आणखीन एक अनिष्ट परिणाम म्हणजे त्याच्यामुळे भारतात पारंपरिक अभ्यासक्रमाकडे मोठे दुर्लक्ष होत आहे. जागतिकीकरणात भारतात उद्योग व सेवा क्षेत्रांचा मोठा विस्तार घडून आला. या विस्तारीत क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षणास महत्त्व आले. परंपरेने भारतीयांचा ओढा हा वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाकडे असून आता त्यामध्ये कॉम्प्युटर, इन्फॉर्मेशन-टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट, कम्युनिकेशन इत्यादी विषयांची भर पडली आहे. या नवीन विषयांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. कारण त्यामुळे रोजगार मिळणे शक्य होत आहे. तथापि, त्यामुळे कला, साहित्य, तत्त्वज्ञान, भाषा, वाणिज्य, सामाजिक शास्त्रे, अशा पारंपरिक अभ्यासक्रमांना गौण स्थान प्राप्त झाले आहे. हुशार विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे टाळीत आहेत. या अभ्यासक्रमांना गौणत्त्व येणे हे नक्कीच अनिष्ट आहे. कारण सुखी व संपन्न जीवनासाठी केवळ पोटाचा प्रश्न सुटणे पुरेसे नसून त्याच्या जोडीला उच्च अभिरूची, नैतिकता, सृजनशिलता, कलात्मकता, सामाजिक बांधिलकी, इत्यादींचीही गरज असते आणि या सर्व गोष्टी कला, साहित्य, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे इत्यादींच्या अभ्यासातून प्राप्त होत असतात. म्हणजेच सुखी व संपन्न जीवनासाठी या पारंपरिक अभ्यासक्रमांचे अध्ययन होणे गरजेचे ठरते. मात्र खाजगीकरणाच्या प्रक्रियेत खाजगी शिक्षणसंस्थांचालकांनी या अभ्यासक्रमांचे शिक्षण देणे जवळपास बंदच केले आहे. ते प्रामुख्याने व्यावसायिक अभ्यासक्रमावरच अधिक भर देत आहेत. कारण त्यामधूनच अधिक पैसा मिळत आहे. तथापि, केवळ पैशामुळेच सुख मिळते हा विचार एकांगी आहे. याचे भान सर्वांनीच ठेवायास हवे. मानवी जीवन सुखी व संपन्न होण्यासाठी कला, क्रीडा, साहित्य, भाषा, तत्त्वज्ञान यांचे अध्ययन होणे गरजेचे आहे.

**४) प्रादेशिक भाषांकडे दुर्लक्ष :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत इंगजी माध्यमातून शिक्षण घेण्यास प्राधान्य मिळू लागल्याने बहुतेक खाजगी शिक्षणसंस्थांतून इंग्रजी माध्यमाचा स्वीकार केलेला आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या जात आहेत. पालकही अशाच शाळांना प्राधान्य देत आहेत. परिणामी, प्रादेशिक भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळांना विद्यार्थी मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे अशा अनेक शाळांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मराठी माध्यमांच्या अनेक शाळा विद्यार्थी संख्येअभावी हळूहळू बंद होत असल्याचे दिसून येत आहे.

**५) गुणवत्ता वाढ नाही :** खाजगीकरणामुळे शैक्षणिक संस्थांची संख्या वाढली. त्यामुळे शिक्षणाचा परिमाणात्मक विकास घडून आला हे खरे आहे. परंतू, त्यामानाने शिक्षणाचा गुणात्मक विकास फारसा साध्य झालेला नाही असे खेदाने म्हणावे लागते. कारण खाजगीरकणामुळे भारतीय क्षेत्रातील जुन्याच अपप्रवृत्तींची तीव्रता अधिकच वाढली आहे. 'नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण' ही धारणा सार्वत्रिक बनली आहे. त्यामुळे ज्ञान मिळविण्यापेक्षा परिक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे व पदवी मिळविणे यास प्राधान्य दिले जाऊ लागले आहे. विविध विषयांचे मूलभूत ज्ञान देण्यापेक्षा विविध विषयांची केवळ माहिती देणे व त्याधारे परिक्षेत अधिकाधिक गुण मिळविणे यादृष्टीनेच शिक्षक शिकवित आहेत व विद्यार्थीही शिकत आहेत. त्यामुळे विद्यार्थी हे विद्यार्थी न राहता परिक्षार्थी बनले आहेत. परिक्षेतील गुण म्हणजेच गुणवत्ता मानले जाऊ लागले आहे. शिक्षणाद्वारे ज्ञानाचे संरक्षण व संवर्धन करणे, विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास करणे, त्यांच्यामध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी निर्माण करणे ही

शिक्षणाची उद्दिष्टे आज शिक्षणक्षेत्रातून जवळजवळ हद्दपार झालेली आहेत. शिक्षणसंस्था ह्या केवळ परीक्षा घेणाऱ्या व पदव्या देणाऱ्या कारखाने बनल्या आहेत. खाजगीकरणात या सर्व अपप्रवृत्ती उत्तरोत्तर वाढत चालल्या आहेत. या अपप्रवृत्तींना प्रतिबंध कसा करावयाचा हा मोठा गहन प्रश्न बनला आहे.

अशाप्रकारे खाजगीकरणाचा इष्ट–अनिष्ट प्रभाव शिक्षणक्षेत्रावर पडला आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१. महात्मा गांधीजींच्या शिक्षणविषयक योजनेवर सविस्तर विचार करण्यासाठी कोणाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली?

अ) विनोबा भावे ब) डॉ. झाकीर हुसेन क) नरेंद्र देव ड) के. टी. शहा

२. १८५७ मध्ये कोणती विद्यापीठे स्थापन करण्यात आली?

अ) मुंबई, दिल्ली व कानपूर ब) मद्रास, हैद्राबाद व बंगळूर

क) कलकत्ता, मुंबई व मद्रास ड) कलकत्ता, पुणे व नागपूर

३. कोणत्या शहरात पहिली 'आयआयटी' ही संस्था स्थापन झाली.

अ) खडगपूर ब) जमशेटपूर क) गोहट्टी ड) कानपूर

४. १९४८ मध्ये कोणता आयोग नेमला गेला?

अ) कोठारी ब) मुदलियार क) त्रिगुण सेन ड) डॉ. राधाकृष्णन

५. जून १९९१ मध्ये कोणत्या सरकारने नवीन आर्थिक धोरण जाहीर केले?

अ) राजीव गांधी ब) पी. व्ही. नरसिंहराव

क) डॉ. मनमोहनसिंग ड) अटलबिहारी वाजपेयी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. महात्मा गांधीनी केलेली शिक्षणाची व्याख्या सांगा.

२. मुलोद्योगी शिक्षण कोणत्या वयोगटातील बालकांसाठी होते?

३. UGC चे पूर्ण रूप द्या.

४. राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती कोण असतात?

५. खाजगीकरणाचा अर्थ सांगा.

## ४.५ सारांश

या चौथ्या घटकात तुम्ही चार उपघटकांचा अभ्यास केलेला आहे. पहिल्या उपघटकात महात्मा गांधीनी सुचविलेल्या मुलोद्योगी शिक्षणाचे स्वरूप अभ्यासलेले आहे. त्यादृष्टीने मुलोद्योगी शिक्षणाचा प्रारंभ व नाव, त्याची उद्दिष्टे, तत्त्वे, अभ्यासक्रम, शालेय वेळापत्रक, अध्ययन पद्धती व गुणदोष इत्यादींचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. दुसऱ्या उपघटकात उच्च शिक्षणासंदर्भातील व्यवस्था व कारभार याचे विवेचन केलेले आहे. यासंदर्भात केंद्रीय व राज्य स्तरावरील शिक्षण मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, विविध विद्यापीठे व त्यांचा कारभार पाहणारी यंत्रणा, महाविद्यालये, स्वायत्त संशोधन संस्था इत्यादींची सविस्तर चर्चा केलेली आहे. तिसऱ्या उपघटकात उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने यांची चर्चा केलेली आहे. त्यासंदर्भात उच्च शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचे माध्यम, विद्यार्थ्यांमधील बेशिस्त, उच्च शिक्षणाची गुणवत्ता, उच्च शिक्षणातील असमानता, राजकीय हस्तक्षेप, स्तरीकरण, आर्थिक तरतूद इत्यादी समस्यांचे स्वरूप विशद केलेले आहे. चौथ्या उपघटकात शिक्षण व खाजगीकरण याची चर्चा केलेली आहे. खाजगीकरणाच्या प्रक्रियेचे शिक्षणावर कोणते इष्ट व अनिष्ट परिणाम झालेले आहेत याची सांगोपांग चर्चा केलेली आहे.

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.**

१) ब   २) क   ३) अ   ४) ड   ५) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे**

१. माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मीक अंगातील उत्कृष्टतेचा सर्वांगिण विकास करणे म्हणजे शिक्षण होय.

२. मुलोद्योगी शिक्षण ७ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी होते.

३. University Grand Commission

४. राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती राज्यपाल असतात.

५. खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे किंवा त्याच उद्योगातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाडेपट्टीने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय.

## ४.७ स्वाध्याय

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मूलोद्योगी शिक्षणाची सविस्तर चर्चा करा.

२) उच्च शिक्षणातील व्यवस्था व कारभार यावर निबंध लिहा.

३) उच्च शिक्षणासमोरील समस्या व आव्हाने स्पष्ट करा.

४) शिक्षण व खाजगीकरण यांच्यातील संबंध विशद करा.

## ४.८ चिंतन आणि कार्य

- मूलोद्योगी शिक्षण योजनेतील दोष दूर करून तिची पुन्हा कशी अंमलबजावणी करता येईल याविषयी तुमचे विचार मांडा.
- उच्च शिक्षणासमोरील आव्हाने पेलण्यासाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना सूचवाल त्यावर एक टिपण तयार करा.
- खाजगीकरणाचा तुमच्या समुदायातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांवर काय प्रभाव पडलेला आहे याचे निरीक्षण करा व त्याबाबतची तुमची मते लिहून काढा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


- प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला लाटकार, प्राचार्य रा. तु. भगत आणि प्राचार्य चंद्रकुमार डांगे – उच्च शिक्षण : अभ्यासक्रम आणि समस्या, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर (१९८४).
- डॉ. रा. गो. प्रभुणे (संपादक) – शिक्षण प्रबोधन – शिक्षण मंडळ कराड (२०१०).
- चंद्रकुमार डांगे – भारत आणि जगातील शिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे (१९७८)
- मोहन जाधव, आरती भोसले व प्राची सरपोतदार – भारतीय शिक्षणाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- प्रा. चंद्रकांत खंडागळे – सामान्यज्ञान, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❑❑❑